

आदिवासींच्या समस्यांकडे पुरातन, सनातनी विचारपद्धतीने पाहणे आणि खोटया सहानुभूतीचे चतकोर त्यांच्या अंगावर भिरकावणे, अश्रूंपासून त्यांची वंचना करणे–माणूसकीच्या हक्कांपासून फसगत करण्याची ही रीत म्युझियम मधल्या तलवारीसारखी आहे. त्या सनातनी मूल्यांवर गंज चढून तलवार निकामी झाली आहे. संघर्षाचे मूल्य गमावलेल्या विचारांनी आजचे प्रश्न उलगडणार नाहीत.

म्हणून मन मोकळे ठेवून तुम्ही, अंबरसिंगानी तरुणांना आकर्षित केले आहे आणि स्नेहार्द्र प्रबोधनातून तुम्ही हा प्रकल्प उभा कराल, अशी मला उमेद आहे.

–बाबा आमटे


# माणूस

१२ फेब्रुवारी १९७२

पन्नास पैसे

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | १२ फेब्रुवारी १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | सदतीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## सप्रेम नमस्कार

□ २६ जानेवारी अंक आवडला. 'रसातळाला जाण्यापूर्वी' ही कथा खरोखरच कुठेतरी मनाला स्पर्श करून गेली. सिंध देश पुरवणी खूप नवीन वाटली. त्यातील सिंधू संस्कृतीची परंपरा हा लेख विशेष आवडला. त्या लेखाचे मूळ लेखक कोण ?

४ फेब्रुवारी, १९७२ — सुरेश बल्लाळ, सांगली.

[ 'सिंधू संस्कृतीची परंपरा' या लेखाचे लेखक आहेत श्री. ए. जे. उत्तम व अनुवादक आहेत श्री. प्रताप पुरुस्वामी. —संपादक. ]

□ २२ जानेवारीच्या विशेषांकातील पन्नालाल सुराणा यांनी सादर केलेल्या जयशंकर मिलच्या मालकांवरील 'भाऊसाहेब झाडबुके' लेख वाचला आणि अतिशय खंत वाटली.

शासन अशा व्यक्तींना शासन करण्यास असमर्थ ठरते कारण त्यांचे हात बांधलेले असतात आणि खेडोपाडींच्या गरीब जनतेला मात्र विनाकारण गरीबी व त्यातच मानहानी आणि जीविताविषयी नैराश्य सोसावे लागते. आपल्या आया-बहिणींच्या अब्रूवर जेव्हा घाला घातला जातो तेव्हा आपण तो उघड्या डोळ्यांनी पाहू शकत नाही व अन्यायाचा, जुलूम-जबरदस्तीचा काही प्रतिकार करू लागल्यास भाऊसाहेबांसारख्या माणसांकडून मारहाण किंवा घरांवरून नांगर फिरवला जाण्याची

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

भीती ! अशा परिस्थितीत गरीब जनता काहीच करू शकणार नाही का ?

भाऊसाहेबांची कहाणी सादर केल्याबद्दल अभिनंदन !

३० जानेवारी, १९७२ अविनाश इनामदार, मुंबई

---

## 'एका भाऊसाहेबांची कहाणी'
## सादरकर्ते : पन्नालाल सुराणा
## माणूस दिनांक २२ जानेवारी १९७२
## या लेखात जागेअभावी प्रसिद्ध होऊ न शकलेले
## एक पत्र

---

मे० माननीय बार्शी तालुका संपूर्ण महाराष्ट्र समिती, अध्यक्ष, पन्नालाल सुराणा साहेब यांचे सेवेत.

विनंती पत्रक : विषय : अन्यायाविरुद्ध व जुलुमाविरुद्ध गरीब शेतकऱ्यांस न्याय मिळणेबाबत.

मी पांडुरंग बापूराव बसाकरे, मौजे पुरी, ता. बार्शी, जि. सोलापूर, इलाखा मुंबई (महाराष्ट्र) कारणे आपल्या चरणी विनंती करतो, की गरीब शेतकऱ्यावर होणारा जुलुमी व गुंडगिरी अन्याय दूर करण्याबद्दल मी आपल्या चरणी विनंती करतो की, मी तालुका बार्शी पासून पूर्वेकडील दिशेस नऊ (९) मैल अंतरावर असणाऱ्या मौजे पुरी येथील गरीब शेतकऱ्याचा मुलगा आहे. माझे वडिलांचे नावावर जुना स. नं. ६९ चा १ मधील हिस्सा (ब) हा ३ एकराचा तुकडा आहे. ही जमीन वडिलार्जित असून ती बागायत आहे. यामध्ये हि. नं. (क) वर चुलत भावाने २३ गुंठ्यांचे अतिक्रमण केले म्हणून मी इ. स. १९६७ ला बार्शी दिवाणी कोर्टामध्ये दावा दाखल केला. त्यानंतर ताबडतोब पाच (५) महिन्यांचे आत दावा चालू असतानाच बार्शी तालुक्याच्या आमदार श्रीमती सौ. प्रभाताई यांचे पती शंकरराव उर्फ भाऊसाहेब मन्मथ झाडबुके व धी जयशंकर मिल्सचे सोल एजंट यांनी हिस्सा नं. (क) आणि (ड) ही जमीन आपले स्वतः-साठीच त्यांचे मेहुणे श्री. दत्तात्रय शिवलिंग दिवटे यांच्या नावावर खरेदी घेतली व माझ्या जमिनीत जाणे-येणेचा रस्ता तारेचे कुंपण घालून ताबडतोब बंद केला आहे. या करिता मी खालील अधिकाऱ्यांना दि. ४–१०–६८ रोजी रजिस्टर अर्जाने कळविले आहे.

१ : मे. कलेक्टर साहेब, जि. सोलापूर.

२ : मे. मामलेदार साहेब, तालुका बार्शी.

३ : मे. पोलीस सब इन्स्पेक्टर साहेब, पांगरी.

४ : मे. शेती मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

परंतु शेतीत येण्याजाण्याच्या रस्त्याची दाद अद्यापपर्यंत लागलेली नाही. वरील केलेल्या २३ गुंठ्याच्या अतिक्रमणाच्या दाव्याबद्दलचा बार्शी व सोलापूर कोर्टात–दोन्हींही ठिकाणी दावा (निकाल) माझ्यासारखा झाला म्हणून मी वरील २३ गुंठ्याची कोर्टामार्फत मागणी केली असता बार्शी कोर्टाने कमिशनर साहेबांना २३ गुंठे जमीन मोजून देण्याचा हुकूम दिला असतानादेखील अद्यापपर्यंत कमिशनरसाहेब आले नाहीत व माझी २३ गुंठे जमीन काढून मिळाली नाही. आणि वरचेवर जागा अतिक्रमण करीत चालले आहेत. तसेच जमिनीला पाणी देण्याचा पाट मोडून टाकला आहे व मोटेने पाणी देण्याचा विहिरीचा वरवंटा काढून टाकला आहे. मी त्यांना सामोपचाराने विचारले, की भाऊसाहेब आपण गरिबांना असा त्रास का देता ? तेव्हा मला म्हणाले, तुझी जमीन मला खरेदी दे. तू जर दिली तर मी घेणार आहे व नाही दिली तर मीच वहिवाटणार आहे. तू कसा वहिवाटणार आहेस हे मीच पहातो. असा माझ्यावर गुंडगिरी व जुलमी अन्याय होत आहे. मला या जमिनीशिवाय दुसरी जमीन नाही व ही जमीन बागायत आहे. या जमिनीच्या उत्पन्नावर अठरा माणसांचे कुटुंबाचा निर्वाह चालवीत होतो. या जमिनीशिवाय मला कोणत्याही दुसऱ्या प्रकारचे उत्पन्न नाही. माझा व सर्व कुटुंबाचा अन्नमय प्राण झाला आहे. तरी आपल्या राज्यात अधिक धान्य पिकवा अशी मोहीम चालू आहे. तरीपण मला या जमिनीत जाण्यास बंदी करीत आहेत. तेव्हा मी अधिक धान्य पिकवू कसे ? व १८ (अठरा) माणसांचे कुटुंबाचा निर्वाह भागविणार कसा ? म्हणून मी आपणाकडे विनंतीपत्रक पाठवून गरीब शेतकऱ्यास दाद मागत आहे. माझेवर गुंडगिरी होत आहे म्हणून मला माझ्या जीविताचीही भीती वाटत आहे. कारण माझ्यासारख्या बऱ्याच शेतकऱ्यांच्या दारकोंडचा करून, काही शेतकऱ्यांच्यात अतिक्रमण करून, दमदाटी करून एकूण माझे जमीनीचे चोहोबाजूने ७० एकर बागायत जमिनीचा एकच प्लॉट वेगवेगळ्या नावांच्या खात्यावर व त्यांच्या जवळच्या नातेवाईक लोकांचे नावावर खरेदी घेतला आहे. व या ७० एकरांमध्ये खाद्य अन्न न पिकविता वेगवेगळ्या तऱ्हेची फुलझाडे लावलेली आहेत. तरी या प्लाटमध्ये मी एकटा सापडलो आहे व माझ्यावर गुंडगिरी अन्याय होत आहे. तरी मला लवकरात लवकर जमिनी विषयीची पूर्ण चौकशी करून न्याय मिळावा ही आपल्या चरणी नम्र विनंती आहे.

दि. ६–१२–७१

**पांडूरंग बापूराव बसाकरे**

□ □ □



दिनांक ३० जानेवारीला धुळे जिल्ह्यात शहादे येथे भू-मुक्ती मेळावा यशस्वीरीत्या पार पडला. या मेळाव्याला सोमनाथहून बाबा आमटे यांचा आलेला हा संदेश–

# करुणेच्या स्पंदनांना धडक देणाऱ्या मेळाव्याच्या निमित्ताने

---

**प्रिय श्री. अंबरसिंग, गोविंदरावजी शिंदे, भाऊ मुंदडाजी आणि मेळाव्यासाठी जमलेल्या आदिम जातीच्या, उत्थान यात्रेत सामील झालेल्या तरुण स्नेहीजनांनो—**

भुकेच्या यक्ष प्रश्नावर केवळ चिंतन चिरकाल टिकत नाही, याची अनुभूती तुम्हाला आली याबद्दल धन्यवाद. तुम्ही आता पाऊल उचलले आहे समाजाची करुणा जागवण्याचे.

भूदानातून, सर्वोदयातून झेपावलेले हे नवं स्वप्न आहे. ममता आणि स्नेह यांनी भारावून जावून उभारलेला हा लढा आहे. आदिम जातीच्या उत्थानाची ही यात्रा आहे. शहाद्यातून एक ऊर्ध्वमुख अभियान आदिवासींच्या गहन जीवनातून उभे झालेले आहे.

आदिवासींच्या ज्या डोळ्यांत थकावट होती, परंपरेची लाचारी होती, त्यात अंबरसिंगसारख्यांनी एक नवी रोषणाई निर्माण केली आहे. ती चमक मला दिसली आहे. ती विलोभनीय आहे. मला तिचे किरण लोभावतात. पण मी अंथरुणावर

आहे. येऊ शकत नाही, याचा मला खेद होतो.

आदिवासींच्या समस्यांकडे पुरातन, सनातनी विचार पद्धतीने पाहणे आणि खोटया सहानुभूतीचे चतकोर त्यांच्या अंगावर भिरकावणे, अश्रूंपासून त्यांची वंचना करणे माणुसकीच्या हक्कापासून फसगत करण्याची ही रीत म्युझियममधल्या तलवारीसारखी आहे. त्या सनातनी मूल्यांवर गंज चढून तलवार निकामी झाली आहे. संघर्षाचे मूल्य गमावलेल्या विचारांनी आजचे प्रश्न उलगडणार नाहीत.

म्हणून मन मोकळे ठेवून तुम्हीं, अंबरसिंगानी तरुणांना आकर्षित केले आहे आणि स्नेहार्द्र प्रबोधनातून तुम्ही हा प्रकल्प उभा कराल, अशी मला उमेद आहे.

अंबरसिंगाच्या प्रत्येक शब्दात, हृदयाच्या प्रत्येक स्पंदनात आदिवासींच्या समस्यांचे समाधान (सोल्यूशन) लहरत असते आणि त्या शब्दांवर, स्पंदनावर तुमचे बारीक अवधान आहे, स्नेहाची पाखर आहे, म्हणून यश हे निश्चित आहे. ही मला अपेक्षा आहे आणि आदिवासींच्या स्नेहगर्द विश्वासाने, सहृदय प्रज्ञेने तुम्ही हा प्रकल्प हाताळाल, ही माझी श्रद्धा आहे. कारण या कार्यातील साहसाची कंपने प्रेममय आहेत आणि या संघर्षाला करुणेचे निनाद आहेत. तुम्ही त्याचे 'इनचार्ज' असल्याने कार्याच्या सफलतेत अडथळे येणार नाहीत. संशयाचे, संदेहाचे जीर्णशीर्ण किंतु या पतझडीत निखळतील. तुमच्या कामातून याचा इसार पूर्वीच मिळाला आहे.

करुणेने, शांतीने, समाधानाने जीवनात शीतलता निर्माण करण्याचे आश्वासन मला या क्रांतीतून दिसते आहे.

समाजाला यात मतिगुंग प्रेक्षकाची भूमिका करता येणार नाही. कुणा जातीविरूद्ध हा लढा नाही. तर अन्यायाविरुद्ध ही जागृती आहे. ती पोथीबद्ध असणार नाही. नव्या युगाची गतिमानता त्यात असेल.

अंबरसिंगाच्या कार्याला, व्यक्तिमत्त्वाला अंतर्बाह्य 'व्हिजन' आहे. संघर्षासाठी तो कटिबद्ध आहे. आपल्या उणीवांचीही खबरदारी त्याला आहे. आणि समाजाच्या भलाईवर, चांगुलपणावर त्याची श्रद्धा आहे. आपल्या लोकांना काय करावं हे तो सांगत नाही तर त्यांनी काय व्हावं, (व्हाट टू बी) स्वत:चा प्रतिमा कशी निर्माण करावी, हे तो सांगत असतो. संघर्षग्रस्त पण नव्या माणुसकीच्या संस्कृतीचे तो पाठ देत असतो. चैनीने सुस्तावलेल्या, गाफील नव्या पिढीला तो बघेगिरी सोडायला लावतो आहे. ही सगळी भूक नव्या संस्कृतीचे साहसायन विविध पैलूंनी प्रेरित करणारी आहे.

तुमचे हे काम स्नेहाला समर्पित आहे,

सामाजिक सेवेला, न्यायाला वचनबद्ध आहे.

आदिमानवाची रासायनिक प्रगती—वेगवेगळ्या संयुगांतून आकारणारी—मी पहात आलो आहे.

आदिवासींची ही जटिल समस्या अंबरसिंग त्याच्या विशास तळव्यात प्रेषिता-

सारखी पेलतो आहे. प्रवचन करणारे कुणाला तरी आध्यात्मिक गुंगी आणायला मदत करतात. पण ते कुणाच्याच जिव्हारी घाव करू शकत नाहीत. खडखडून जागे करू शकत नाहीत. पण प्रेषित प्रत्येकाच्या अंतरी खळबळ निर्माण करतो. आणि अनेकांना कार्यप्रवृत्त करत असतो. सेवेसाठी पागल करत असतो. त्या प्रेषिताला सत्कार पचवायचे असतात. निंदा नालस्ती, घृणा पचवायची शक्ती त्या छायेत असते. आपल्या मधुर आवाजाने भक्तिपर गीते आळवणाऱ्या अंबरसिंगाच्या आवाजात मेघगर्जनेचा गडगडाटही आहे आणि त्या स्नेहशांत हृदयात ज्वालामुखीही खळबळतो आहे, याची जाणीव सुस्तावलेल्या समाजाला होत आहे. अंबरसिंगाच्या डोळ्यांतली आसवे असहायतेची नाहीत, तर त्यातून माणुसकी पाझरते आहे. हे समाजाने वेळीच ओळखायला हवे.

सर्वोदयाचा संदेश आहे. अखेरच्या माणसापर्यंत प्रबोधन पोचवा. त्याला जीवन-रस मिळू द्या. अंत्योदय, हे प्रबोधन अखेरपर्यंत वाहून न्या. ज्यांना आधी गरज आहे, अशापर्यंत ते पाथेय पोचवा.

तुमच्या मेळाव्यातून ही संसर्गजन्य माणुसकीची लागण समाजाच्या सर्व थरांतून पाझरो.

मी इथे अंथरुणावर आहे. या क्षणी तिथे येऊ शकत नाही, याची वेदना आहे. त्या वेदनेचे निनाद तुमच्यापर्यंत पोचवत आहे. अखेर एका कवीच्या शब्दांत--

" यही नही जीवित हैं मिट्टीसे डरनेवालोसे
जीवित है वह उसे फूंक सोना करनेवालोसे " ॥

ही तरुण सेना, हा मेळावा असं एक आंदोलन आहे. तसे ते व्हावे हा माझा आग्रह आहे.

२१-१-७२ सोमनाथ

# तिकिट वाटप - एक धमाल करमणूक

नवकाँग्रेसच्या तिकीट वाटपाच्या निमित्ताने ठिकठिकाणी जे कुंभमेळे भरले होते, त्यात जे तमाशे झाले. तिकिटे मिळविण्यासाठी मत्रीमंडळांनी दिल्लीला ज्या वाऱ्या केल्या आणि या सर्व प्रकरणात काँग्रेसचे जे धिडवडे निघाले त्यामुळे आतापर्यंत मरगळून पडलेल्या विरोधी पक्षांना आता कुठे थोडी पालवी फुटू लागली आहे. तिकीट वाटपाबाबत काँग्रेसपक्षातच जसजसा असंतोष वाढू लागला आहे तसतशी विरोधी पक्षीयांमध्ये आता हळूहळू जान येऊ लागली आहे.

भारत-पाकिस्तान युद्धातील अभूतपूर्व विजयानंतर सर्व विरोधी पक्ष पार भुई-सपाट झाले होते. कुणालाच जान वाटत नव्हती. आणि सारेजण नवकाँग्रेसला 'वॉक ओव्हर' देण्याच्या मनस्थितीत होते. या युद्धाने पाकिस्तानचे जेवढे कंबरडे मोडले नसेल तेवढे आपले मोडल्यासारखे त्यांना वाटत होते. आता हा धक्का ओसरू लागला आहे. आणि काँग्रेसमधल्या अंतर्गत भानगडी जशा खदखदू लागल्या तसे हे पक्ष आक्रमक पवित्रे घेऊ लागले आहेत.

निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा पुण्यातली रामभाऊ म्हाळगींची जागा तरी आपण टिकवू शकू की नाही याबद्दल जनसंघ कार्यकर्ते पडेल चेहऱ्याने शंका व्यक्त करीत होते तर समाजवादी कार्यकर्ते बांगला देशबद्दलचे भाकीत लोहिया यांनी चौदा वर्षापूर्वीच केले होते असे सांगून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करीत होते आणि निवडणुकीची चर्चा टाळीत होते. शेतकरी कामगार पक्षातला एक गट आधीपासूनच नव-काँग्रेसमध्ये जाण्यास उतावीळ झाला होता. आता तर त्यांची ही ऊर्मी अधिकच वाढली होती. पक्षातले मोठमोठे पुढारी पक्ष विसर्जित करून काँग्रेस-मध्ये समाविष्ट होण्याच्या गोष्टी करीत होते. उजवे कम्युनिस्ट तर उतावीळ प्रेयसीप्रमाणे केव्हा नव-काँग्रेसच्या मिठीत जाऊन पडतो या ईर्षेने कासावीस झाले होते. रिपब्लिकन पक्षाचे दोन्ही गट सत्ताधारी पक्षाची घट्ट सोयरीक पकडण्याची पराकाष्ठा करीत होते. जुनी काँग्रेस तर आत्महत्त्या करण्याच्या बेतात होती.

पण तिकिटांचा ड्रामा सुरू झाला. खादी डगलेवाल्यांचे लाचार मेळे नरीमन पॉईंटवर जमा होऊ लागले नंतर दिल्लीला. सत्तेच्या खुर्च्यांना जळवासारखे चिकटलेले मंत्री विमानो-विमानी दिल्लीला जाण्याचा खेळ करू लागले. (लोक विचारतात कुणाच्या पैश्याने ?) लाचार हसू लागले. आपले पाठीराखे दिल्लीला नेण्याचा फार्म करू लागले. आणि अखेर आतापर्यंत ओरडून सांगितलेल्या कसोट्या

डावलून वाटेल त्यांना तिकिटे मिळू लागली. तेव्हा कुठे विरोधकांमध्ये जान आली.

समाजवादी आणि शे. का. प. एक होऊन १४४ जागा लढविण्याच्या गोष्टी बोलू लागले. निदान आपल्या सध्याच्या जागा तरी राखू म्हणून बिचकत विश्वास व्यक्त करू लागले. जनसंघ कार्यकर्त्यांचे चेहेरे पुन्हा तजेलदार झाले. कम्युनिस्टांनी आपले उमेदवार जाहीर केले. रिपब्लिकनांनी फाईट देण्याचे ठरविले. जुन्या काँग्रेसच्या स. का. पाटलांनी गर्जना केली, ' नवी काँग्रेस कम्युनिस्ट बनत चालली आहे सावधान.'

आता तर खुद्द नव-काँग्रेसमधलेच गट नाराज होऊन सावधानतेच्या गोष्टी बोलू लागले आहेत. वर्षभरापूर्वी काँग्रेसवर जीवघेणा हल्ला करणारे डॉ. दत्ता सामंत त्याच पक्षाच्या तिकिटावर मुलुंडमधून निवडणूक लढवू लागले तर कार्यकर्ते नाराज होणार नाहीत तर काय ? तीच गोष्ट वरळीत आणि इतर अनेक ठिकाणी. कार्यकर्त्यांत भयंकर असंतोष ! कितीतरी कार्यकर्ते या तिकीटवाटपामुळे विरोधी प्रचार करण्याच्या प्रयत्नात आहेत. पण कार्यकर्ते नाराज आहेत याचा अर्थ काँग्रेसला वाईट दिवस आहेत असा नव्हे. कार्यकर्त्यांच्या प्रचारामुळे थोडीच काँग्रेस निवडणूक जिंकणार आहे ? निवडणूक जिंकणार आहेत इंदिरा गांधी. पण या नाराजीमुळे निवडणुकीत धमाल धमाल उडणार आहे हे नक्की.

## सस्पेन्स

आणि कोणत्या मिनिस्टरांनी निवृत्त व्हावे हे ठरविण्यासाठी सगळे मंत्री दिल्लीला गेले. तेव्हा मुंबईत कोण सस्पेन्स ! ज्याच्या त्याच्या हाती यादी. सचिवालयात एकच चर्चा. एकमेकांच्या याद्या पडताळून पाहणे आणि पैजा मारणे याशिवाय उद्योग नव्हता. मंत्री गॅसवर होते म्हणून सचिवालयातले अनेक अधिकारी गॅसवर होते. रात्री–बेरात्री बातमीदारांना फोन ' काय काही आलय का दिल्लीहून ?' आवाज हळवे, थरथरणारे. सचिवालयात नेहमी जाणारे येणारे एकमेकांना बेरकीपणे विचारीत " काय महाराज आता कुणाकुणाला खास नमस्कार करायचा ?' काही सांगत ' सर्वांनाच करा ' काही म्हणत, ' कुणालाच करू नका.'

आमदारांची यादी दिल्लीहून आली तेव्हा एकच खळबळ. संसदीय मंडळाच्या दोन सभासदांच्या निवडणुकीच्या वेळी बाईंनी शंकरराव चव्हाणांच्या बाजूने कौल दिला होता. आणि ही यादी तर चक्क वसंतराव नाईक यांची होती. म्हणजे पारडे परत झुकले की काय ? नमस्कार करणाऱ्यांची पुन्हा पंचाईत. मुख्यमंत्रीपदाची पुन्हा विफल चर्चा. ' बाईंनी ज्या अर्थी या गटाला इतकी तिकीटे...त्या अर्थी... ' छें ! छे ! बाईंनी ज्या अर्थी शंकररावांना...त्या अर्थी...' मुळीच नाही अहो बाई काय एवढया मोठ्या आहेत ' वगैरे वगैरे

पण नाईक गटातले लोक मात्र भेटले, की खुसूखुसू हसत होते. ' बघा आपल्या सारखं होणार.' आणि शंकररावांचे लोक हुप्प. ' बघाल तर खरं. ' बाई आपल्या मनाचा तळ लागू देत नाहीत, यावर मात्र सर्व मंत्र्यांची एकवाक्यता होती.

आणि नाईक एके दिवशी भल्या पहाटे उठून दिल्लीला गेले. तेव्हा मुंबईत अफवांचे कोण पीक? श्यामाचरण शुक्ल, महेंद्र मोहन चौधरी आणि आता? खरे म्हणजे ही साखळी सुखाडिया, रेड्डी, शुक्ला, चौधरी, नाईक अशीच असेही काही लोक सांगू लागले. श्री. नाईक यांनी या अफवांचा दिल्लीहून साफ इन्कार केला, ही गोष्ट वेगळी.

आणि धाम ऽऽऽ धडाड ऽऽऽऽ फुस्स......

एके दिवशी दिल्लीहून आल्या आल्या नाईकांनी सर्व मंत्र्यांना आपल्या 'वर्षा' बंगल्यावर बोलावले आणि कोण कोण मंत्री निवृत्त होणार आहेत हे त्यांनी सांगितले. खेर, याज्ञिक, तिपुरडे, वैराळे, भास्कर, हिरे, नायक आणि अगरवाल–!

फुस्स्......

कारण मुंबईत ज्या याद्या हातोहाती तयार होत होत्या त्यांमध्ये अग्रभागी वर्तकांचे नाव होते. राजारामबापू पाटलांचे नाव होते. अधिकृत यादी आली तेव्हा लोकांचा प्रश्न 'वर्तकांचं काय.' आणि मग 'अरेरे च्-च्...' ही प्रतिक्रिया.

आता तिपुरड्यांसाठी त्यांच्या जिल्ह्यातले काँग्रेस कार्यकर्ते खूप आदळआपट करताहेत वगैरे ठीक आहे, पण मुंबईतली प्रतिक्रिया तरी समाधानकारक आहे. पण मधुकरराव चौधरी यांनी मात्र बाजी मारली. आपण निवडणूक लढविणार नसल्याचे त्यांनी आधी समारंभाने जाहीर करून जोरदार प्रसिद्धी मिळविली. आणि नंतर मात्र 'अगं अगं म्हशी–' म्हणत म्हणत तिकीट स्वीकारले. त्यांनी तिकीट नाकारल्याचे अद्याप तरी ऐकले नाही. अशी एकूण मजा आहे.

मंत्र्यांना म्हणा किंवा आमदारांना म्हणा, तिकिटे देताना काँग्रेसच्या मध्यवर्ती निवडणूक मंडळाने किंवा स्वत: इंदिरा गांधी यांनी कोणत्या कसोटचा लावल्या हा एक वादाचा विषय आहे. महाराष्ट्रातले दोन्ही सोशालिस्ट फोरम याबाबतीत एकदम मूग गिळून आहेत. या विषयावर त्यांची प्रतिक्रिया ऐकण्यात मजा येईल एवढे नक्की.

आतापर्यंत शंकररावांच्या बाजूने कौल देणाऱ्या इंदिराबाई आता एकाएकी वसंतरावांच्या बाजूने कशा झुकल्या याबद्दलही एक स्टोरी मुंबईत चालू आहे. महाराष्ट्राची यादी श्री. डी. पी. मिश्रा यांनी घासूनपुसून स्वच्छ केली. श्री. मिश्रा हे जुन्या मध्य प्रदेशातले आणि वसंतरावजीही मध्य प्रदेशातलेच. दोघेही दोस्त. तेव्हा दिल्लीत आल्यावर मिश्रांनी वसंतरावांना सरळ इंदिराबाईंकडे नेले. मिश्राजींचे आणि श्रीमती गांधींचे घनिष्ट राजकीय संबंध सर्वांना माहीत आहेतच. मिश्राजी म्हणाले, 'मॅडम, आप फिजूल नाराज हो रही हो वसंतरावजीपर. ये यशवंतरावजीके आदमी थोडीही है। ये तो अपने है।' वसंतरावजींनी यावर मान डोलविली आणि इंदिराजी हसून म्हणाल्या, 'अच्छा! तो ठीक है. तथास्तु.'

अर्थात ही स्टोरी टिंगलखोर असली तरी तीमध्ये बिल्कुलच तथ्य नसेल असे कोणी सांगत नाही. पण एवढ्यावरूनही श्रीमती गांधींचे मन कळले असे कोणी समजू नये. निदान शंकरराव तरी समजत नाहीत असे कळते. □ □ □

प्रतिनिधी

# मुंबईकरांना हैराण करणारा प्रश्न

डिसेंबरात भारत-पाक युद्ध चालू असताना एक मित्र तावातावाने मला म्हणाला ' मुंबईच्या काही भागात बॉम्बस् पडले तर फार बरं होईल.' हे काय जीवन आहे? जुनाट इमारती, बाग बगीचे व मोकळी मैदाने नाहीत, सारे वातावरण कोंदट, रस्ते तर इतके चिचोळे की पाच मिनिटांच्या प्रवासासाठी टॅक्सी व बसला अर्धा-पाऊण तास लागतो. वेळेचा अपव्यय होतो. कोठेही वेळेवर पोचणे मुष्किल होते. अगदी वैताग येतो या मुंबईचा.'

त्याचा राग समजण्यासारखा होता. दक्षिण मुंबईतील गिरगाव, काळबादेवी यांसारखे विभाग यासर्व गोष्टींसाठी प्रसिद्ध आहेत. व्यापार आणि नोकरी-व्यवसायाची केंद्रे या भागात व जरा दक्षिणेला बोरीबंदर फोर्ट, चर्चगेट आदी भागांत आहेत. संध्याकाळी कचेऱ्या सुटल्यावर प्रत्येकाला घरी जायची ओढ असते तर रस्त्यावरील वाहतूक खोळंबून पडलेली असते. बसेस येतात त्या काठोकाठ भरून. वेळेवर कधी त्या यायच्याच नाहीत. लोकल ट्रेन्सची अवस्थाही भयानकच. कापूस पोत्यात गच्च कोंबावा तशी माणसे कोंबलेली असतात. ज्यांच्याकडे मोटारी आहेत त्यांना त्या उभ्या करण्यासाठी योग्य जागा नसल्याने, गल्ली बोळात, रस्त्यांच्या कडेला त्या उभ्या केल्या जातात. त्यामुळे पुन्हा वाहतुकीला अडथळा येतो. मुंबईचे रस्ते माणसांनी नि वहानांनी तुडुंब भरून वहात असतात. वाहतुकीचा प्रश्न मुंबईला भेसडवतोय. या प्रश्नाने मुंबई व मुंबईकर हैराण व बेचैन असतात.

यावर काही तोडगे काढले जातात. काही वेळा ते तात्कालिक ठरतात. मुंबईच्या हुतात्मा चौकात ' पैसे भरा व गाडी उभी करा ' या योजनेखालीं नाममात्र पैसे घेऊन गाडी तेथ ठेवण्याची सोय करण्यात आली आहे. परदेशात अशी योजना सर्वत्रच आढळते. तेथे मीटरप्रमाणे पैसे द्यावे लागतात. त्यामुळे आवश्यकतेपेक्षा क्षणभरही गाडी उभी करायला कोणी तयार नसतो. त्यामुळे वाहतुकीचे प्रश्न थोडे सुटतात. शिवाय जमलेल्या पैशांतून मोठ्या इमारती बांधून तेथे गाड्या ठेवण्याची व्यवस्था केली जाते.

गेल्या आठवड्यात सुरू झालेली ही योजना, त्याचप्रमाणे चर्चगेट स्टेशन बाहेर बांधला जात असलेला पूल आणि कालच लोकसत्तेचे दिल्लीचे प्रतिनिधी श्री. गोखले यांनी, मुंबईच्या वाहतुकीवर तोडगा सुचवणारा, नियोजन मंडळासाठी एका अभ्यास

गटाने केलेल्या अहवालाचा वृत्तांत दिला आहे. या सर्व गोष्टींचा एकत्र विचार करून हे लिहीत आहे.

'पैसे भरा व गाडी उभी करा' योजना ओव्हल मैदानाजवळ व लिबर्टी चित्रपट गृहाकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रथम काही महिन्यापूर्वी सुरू करण्यात आली पण ती यशस्वी होऊ शकली नाही. हुतात्मा चौकात यापूर्वीही गाड्या उभ्या केल्या जात असतच. पूर्वी हे सारे फुकट चाले. आता पैसे पडतात. पण दुसरे काही गत्यंतरच नसल्याने हळूहळू का होईना पण गेल्या एक दोन दिवसात यात प्रगती दिसू लागली. काही महिन्यांपूर्वी 'डब्ल्यू. आय्. ए. ए.'ने हॉर्निमन सर्कलमध्ये एक १५ मजली इमारत कार पार्किंगसाठी बांधण्याचे ठरविले होते पण त्या इमारतीच्या मालकी हक्काच्या संदर्भात नगरपालिका, सरकार व डब्ल्यू. आय्. ए. ए. (वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाइल्स असोसिएशन) यांच्यात काही वाद निर्माण झाला. त्यामुळे ही योजना मागेच पडली. ही इमारत उभी राहाती तर फोर्टमधील असंख्य गाड्या तेथे पार्क केल्या गेल्यामुळे रस्त्यावरचा वाहतुकीचा अडथळा दूर झाला असता. अशी इमारत असणे ही त्या भागातील अत्यंत निकडीची गरज आहे. नरीमन पॉइंट ते वांद्रे, समुद्रमार्ग (मध्ये मलबार हिल खोदून तेथे भुयारी मार्ग तयार करण्याचा त्यात समावेश आहे) तयार करण्याची एक अत्यंत महत्वाकांक्षी योजना आहे. यामुळे वाहतूक जलद होऊ शकेल. पण ती खूप खर्चिक आहे व अगोदरच झाडतोडी व उंच इमारतींच्या खोल पायासाठी खोदल्या गेलेल्या व म्हणून खिळखिळ्या झालेल्या मलबार हिलची बोगद्यासाठी खुदाई करणे अनेक तज्ज्ञांना धोकादायक वाटते. पावसाळ्यात मलबारहिलच्या दरडी कोसळणे आता नेहमीचेच झाले आहे. ही योजना होईल तेव्हा होईल पण हे सारे आता झटपट न केल्यास अवस्था फारच गंभीर होणार आहे.

नियोजन मंडळाच्या अभ्यास गटाने, भुयारी व उच्चस्तर (हवेतून जाणारा) लोहमार्ग हे दोन तोडगे सुचविले आहेत.

७१ साली ५९·७ लाख असलेली मुंबईची लोकसंख्या (१९४१ साली ती निव्वळ १८ लाख होती) १९८१ साली ७३ लाखावर असेल व जुळ्या मुंबईची भर पडता ती ८१·६१ लाख होईल; तेव्हा किती भयानक अवस्था निर्माण होईल याची कल्पनाच केलेली बरी.

पश्चिम रेल्वेच्या चर्चगेट, ग्रँटरोड स्टेशन्स दरम्यान दोन जादा लोहमार्ग टाकण्यात आले आहेत. पण हे सारे प्रयत्न अपुरे पडत आहेत. फक्त १८०० लोकांची वाहतूक करण्याची क्षमता असलेल्या ट्रेन्स ३००० लोकांची ने आण करीत आहेत. म्हणजे नव्या लोहमार्गामुळे पश्चिम व मध्यरेल्वेवर दोन्ही दिशांनी मिळून तासाला ३६,००० प्रवाशांची वाहतुक होऊ शकेल, (आज ती क्षमता २०,००० आहे) पण ही क्षमता ४० ते ६० हजारांपर्यंत वाढविणे आवश्यक आहे. मुंबईच्या वाहतुकीची समस्या थोड्या

पृष्ठ ४९ वर

# चाकावरचे विचार

श्री. मा. भावे

## राजकीय पालकत्वाचा शेवट

रानटी पशूंविषयी असे म्हटले जाते, की दोन रानटी पशूंतील संबंध भक्ष्य-भक्षक, परस्पर साहाय्यक अगर स्पर्धक अशा तीनच स्वरूपांचे असतात. विशुद्ध मैत्री ही याहून वरची पातळी. परंतु रानात जीवनसंघर्ष अतिशय तीव्र असल्याने पशूंतील संबंध विशुद्ध मैत्रीचे राहूच शकत नाहीत. जे अरण्य-निवासी प्राण्यांचे, तेच राजकारण्यांचे. दोन राजकारणी एकमेकांविषयी उदासीन राहू शकत नाहीत किंवा त्यांच्यात निर्मळ मित्रत्व निर्माण होणेही दुरापास्त असते. श्रीमती गांधी व श्री. चव्हाण यांच्यातील राजकीय संबंधांना अलीकडे मिळालेली कलाटणी पहाता ही गोष्ट स्पष्ट होते.

विधानसभांच्या आगामी निवडणुकांसाठी काँग्रेस-पक्षाचे उमेदवार ठरविण्यात श्री. शंकरराव चव्हाण यांची सरशी होवो अगर श्री. नाईक यांच्या गटाची प्यादी पुढे सरकोत; हे निःसंशय सिद्ध झाले आहे, की अखेर यात श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यावरच होणार आहे. महाराष्ट्रावर गेली पंधरा वर्षे अबाधित चालत राहिलेले त्यांचे एकछत्री राज्य संपुष्टात येणार आहे. श्री. नेहरू आणि श्री. मोरारजी देसाई यांनी श्री. यशवंतराव चव्हाण यांचा उपयोग श्री. हिरे, गाडगीळ यांचे महाराष्ट्रातील नेतृत्व उखडून टाकण्यासाठी केला. श्रीमती गांधींनी त्याच कित्याची पद्धतशीर नक्कल श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या पुढारीपणाला शह देण्यासाठी उपयोगात आणली.

१९५६ च्या नोव्हेंबर महिन्यात श्री चव्हाण यांची द्विभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रिपदासाठी निवड झाली. त्यावेळी त्यांनी कै. हिरे यांचा ३३३ वि. १११ मतांनी पराभव केला होता. पण ही ३३३ मते गुजरात व विदर्भ भागातील आमदारांची

होती. पश्चिम महाराष्ट्रातील आमदारांचा पाठिंबा हिरे यांनाच होता. १९४७ च्या फेब्रुवारीत झालेल्या निवडणुकापर्यंतही श्री. चव्हाण यांची महाराष्ट्रावरील पकड घट्ट झालेली नव्हती. त्या निवडणुकीत ते स्वत: केवळ १६२६ मतांनी विजयी झाले. या त्यांच्या विजयात त्यांच्या नेतृत्वगुणांचा भाग फारसा नव्हता. 'आपला माणूस मुंबईचा मुख्यमंत्री होत आहे' ही त्यांच्या मतदार-संघात पसरलेली भावना श्री. चव्हाण यांच्या निवडीला प्रामुख्याने कारण झाली.

'आपला माणूस मुंबईचा मुख्यमंत्री होत आहे' या एका भावनेवर श्री. चव्हाण यांनी आपल्यापुढील राजकारणाची आखणी केली. ग्रामीण भागातील जनतेचा सरकारी कामकाजाशी मोठ्या प्रमाणात संबंध येऊ लागून त्या जनतेतील राजकीय आकांक्षा जागृत होत होत्या. सरकारी पैशाचा ओघ ग्रामीण भागाकडे वळून जमीन-धारकांना आर्थिक सामर्थ्य प्राप्त होत होते. त्यामुळे 'आपला माणूस' या शब्दात 'मराठा जातीचा. शेतकरी वर्गाचा आणि ग्रामीण भागातील' या तीन गोष्टी सामावलेल्या होत्या. ५७ नंतरच्या १५ वर्षांतील श्री. चव्हाणांचे नेतृत्व वरील तीन गोष्टी, अधिक मुख्यमंत्रिपदात अभिप्रेत असलेली सत्ता या चार आधारावर स्थिराव-लेले होते.

मराठा जात हा श्री. चव्हाण यांच्या नेतृत्वाचा पहिला आधारस्तंभ. शेतकरी कामगार पक्ष हा १९५७ साली काँग्रेसचा प्रमुख विरोधक होता. या पक्षातील मंडळी काँग्रेसमध्ये आणून श्री. चव्हाण यांनी काँग्रेस पक्ष बळकट केला. शे. का. पक्षाचे मुख्य बळ जातीयवादात होते हे उघड गुपित आहे. बहुजन-समाज या नावा-खाली श्री. चव्हाण यांनी शे. का. पक्षातील याच भावनेला आवाहन केले. श्री. माधवराव बागल स्वत: काँग्रेसमध्ये गेले आणि काँग्रेसमध्ये बहुजन समाजासाठी 'सत्तेची पंगत' यशवंतरावांनी बसविली आहे, तिचा फायदा घ्या असे आमंत्रण त्यांनी दिले. याचा कडवट प्रतिसाद श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्या आत्म चरित्रातही उमटलेला दिसून येतो.

मराठा जात हा श्री. चव्हाणांच्या नेतृत्वातील कमानीचा दगड ठरल्याने त्या जातीतील आपले पुढारीपण अबाधित राहण्यासाठी त्या जातीतील कोणी स्पर्धक आपल्याला उरू नये अशी काळजी श्री. चव्हाण यांना घ्यावी लागली. म्हणून स्वत: दिल्लीस गेल्यावर मुंबईचा मुख्यमंत्री मराठेतर राहील अशी खबरदारी त्यांनी घेतली. श्री. बाळासाहेब देसाई यांचे वजन वाढणार नाही याकडे लक्ष दिले, इतकेच नव्हे तर त्यांना निष्प्रभ केले.

शेतकरी वर्ग आणि ग्रामीण भाग यांचा महाराष्ट्रातील वरचष्मा इतका स्पष्ट आहे, की त्याचे अधिक विवेचन करण्याची जरुरी नाही. शहर-विभागाच्या विकासा-साठी पुरेसा पैसा उपलब्ध होत नाही, तरी शहरी-विभागाने आपले 'प्रेशर ग्रुप्स' तयार करावेत अशी सूचना खुद्द शहर-विकास मंत्र्यांना करावी लागते ही घटना

पुरेशी बोलकी आहे. १९६६ साली मुंबईस पाण्याची विलक्षण टंचाई होऊन वस्ती उठवावी लागणार असे वाटत होते. त्यावेळी 'भातसई योजना' तातडीने हाती घेतली जाईल असे आश्वासन श्री. नाईक यांनी दिले. आज पाच वर्षांनंतरही 'भातसई योजना' पूर्ण झालेली नाही.

श्री. चव्हाण यांच्या नेतृत्वाचा चौथा आधारस्तंभ म्हणजे सत्ता. सत्तेची जबरदस्त आसक्ती श्री. चव्हाण व त्यांनी ज्या समाजाचे नेतृत्व केले तो समाज यांच्यात आहे. श्री. चव्हाण दिल्लीला गेल्यावर अनेक घालमेली झाल्या. पण आपले मंत्रीपद त्यांनी इरेला घातले असे घडले नाही. आपल्या अनुयायांना अधिकाधिक सत्तास्थाने उपलब्ध होतील अशी तरतूदही त्यांनी केली. जिल्हा-परिषदांचे अध्यक्ष-उपाध्यक्ष इत्यादी सुमारे ४५० नवी सत्तास्थाने ग्रामीण भागात गेल्या १० वर्षांत निर्माण झाली आहेत आणि त्यातील बहुतेक मराठा जातीच्या, शेतकरी वर्गाच्या व काँग्रेसमध्ये असलेल्या व्यक्तींच्या हाती आहेत.

श्री. चव्हाण यांच्या राजकारणाचे वरील विवेचन करण्याचा हेतू ते वाईट आहे असे दाखविण्याचा नाही. मराठा जात व शेतकरी वर्ग सत्तेपासून वंचित रहाणे शक्यच नव्हते. राजकीय दृष्ट्या नवजागृत अशा या समाजाला पोक्त राजकारणाचे पहिले धडे श्री. चव्हाण यांनी दिले ही महाराष्ट्राच्या राजकीय विकासातील त्यांची महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. श्री. चव्हाण यांच्या एकछत्री नेतृत्वाला आता मिळालेले आव्हान म्हणजे त्यांनी त्यांची जबाबदारी यशस्वी रीतीने पार पाडली आहे याची पावतीच आहे. श्री. चव्हाण यांनी गेली पंधरा वर्षे स्वीकारलेले या वर्गाचे पालकत्व संपलेले आहे, हा त्यांच्या नेतृत्वाला होणाऱ्या विरोधाचा अर्थ आहे.

□

## भविष्य-विद्या

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या गेल्या पंचवीस वर्षांत पाश्चात्य देशात तांत्रिक ज्ञानाचा प्रसार अतिशय वेगाने झाला. उत्पादनाची नवनवीन साधने अतिशय थोड्या काळात उपलब्ध झाली. त्यामुळे उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाला फार मोठी गती मिळाली. याचे तीन परिणाम झाले. पहिला असा, की समाज जीवनात होणारे बदल फार वेगाने होऊ लागले. कुटुंबसंस्था, विवाहसंस्था इत्यादी सामाजिक संस्था शेकडो वर्षे त्याच स्वरूपात राहिल्या होत्या. तथापि उत्पादनाची साधने व म्हणून आर्थिक स्थितीतील बदल तीव्र गतीने होऊ लागल्याने या संस्थांत बदल अपरिहार्य झाले, इतकेच नव्हे, तर केलेले बदल टाकून देण्याची वेळही लवकर येऊ लागली. दुसरे, नवे शोध आणि त्यांचा उत्पादनासाठी उपयोग यात पूर्वी जेवढा काल जाई त्यापेक्षा अलीकडे कमी काल जाऊ लागला. उदाहरणार्थ, विमानांचा शोध आणि त्यांचे

उत्पादन यात २०–२५ वर्षांचे अंतर होते तर टेलिव्हिजनचा शोध आणि त्याचा सार्वजनिक वापर या दरम्यान ८–१० वर्षेच गेली. तिसरा परिणाम म्हणजे भविष्यकाळ वर्तमानाच्या अधिक जवळ आला. पूर्वी नवे वैज्ञानिक शोध वापरात येण्यास जास्त काळ लागत असल्याने त्या शोधाचे परिणाम काय होतील याचा अंदाज घेण्यास अवसर सापडे. आता शोध लागण्याचा अवकाश, की त्याचे परिणाम जाणवू लागतात. सारांश जीवन अधिक गतिमान झाले.

जीवनाला आलेल्या या वेगामुळे भविष्याचे अंदाज बांधणे सार्वजनिक दृष्टीने महत्त्वाचे ठरले. या गरजेतूनच हल्ली 'भविष्य-विद्या' ही नवी विद्या पाश्चात्य देशांतून अस्तित्वात येत आहे. अजून ही विद्या प्रायोगिक अवस्थेत असून तिचे निश्चित स्वरूप ठरलेले नाही. तथापि विचारांना मिळालेली एक दिशा या दृष्टीने ही विद्या लक्षणीय आहे.

भविष्यात काय घडेल याच्या निरनिराळ्या कल्पना करणे आणि त्या कल्पनांचा अभ्यास करणे हा भविष्य-विद्याभ्यासूचा उद्योग असतो. या निरनिराळ्या कल्पनांना 'संभाव्य भविष्ये' असे म्हणतात. ही 'संभाव्य भविष्ये' ग्रहगणितावर आधारलेली नसून उत्पादनक्षेत्रातील वर्तमान प्रवाह आणि प्रस्थापित समाजव्यवस्थेतील प्रश्न यांचा सखोल अभ्यास करून कल्पिलेली असतात. भविष्य-विद्यार्थी या संभाव्य भविष्यांची उपयुक्तता, त्यांना येणारा खर्च व त्यातून निर्माण होणारे प्रश्न यांचा अभ्यास करून या संभाव्य भविष्यांची प्रतवारी लावतात.

या अभ्यासाच्या तीन पद्धती आहेत. पहिल्या पद्धतीत गणक यंत्राचा उपयोग केला जातो. दुसऱ्या पद्धतीत निरनिराळे समाजशास्त्रज्ञ व विज्ञाननेते यांच्या चर्चेतून स्वीकार्य भविष्य ठरविण्यात येते. तिसऱ्या पद्धतीला Scenario पद्धत म्हणतात. एखाद्या परिस्थितीत कोण-कोणत्या घटना घडण्याची शक्यता आहे. याची तर्कसंगती बसवतात आणि परिस्थितीत होणाऱ्या बदलाच्या प्रत्येक अवस्थेत किती पर्यायी घटना संभवतील याचा अंदाज बांधतात.

या भविष्य विद्यार्थ्यांची The World Future Society नावाची एक संस्था असून ती १९६६ साली स्थापन झाली. या संस्थेतर्फे Futurist या नावाचे एक नियतकालिक प्रसिद्ध होते.

भविष्य-विद्येला नुकतीच सुरवात झाली आहे. नगरविकास संस्था, प्रदेश विकास संस्था, दीर्घकालीन योजना तयार करणारी योजना-मंडळे, विद्यापीठातील विद्या-शाखा यांतून भविष्य-विद्यार्थी आढळतात.

□ □ □

# चिमूरचा उठाव आणि मी



निवेदन :
**गोपाळराव कोरेकार**


शब्दांकन :
**रमेश गुप्ता**

बेचाळीसचा चिमूरचा रक्तरंजित उठाव ही स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाची घटना. या उठावाला मिळालेले हिंसक वळण सर्वथा अनपेक्षित होते. त्यामागे कोणतीही निश्चित योजना नव्हती. तशी ती असती तर पत्री सरकारची एक चांगली आवृत्ती निघू शकली असती. या चिमूर उठावाची ही कहाणी....

मृत्यूशी नजरानजर म्हणजे काय असते, तीन तासांच्या अंतरावरून तो कसा दिसतो, माणसे त्याला सामोरी कशी जातात, तो छातीवर कसा घेतात, एखाद्याला तो कसा देतात ते समजले, तेव्हा मला फारशी समज आली होती असे नाही. तेव्हा मी सोळा वर्षांचा होतो. ४२ साली चिमूरला जो उठाव झाला, त्याला एकाएकीच हिंसक वळण मिळाले. आमचा हेतू विध्वंसक उठावाचा नव्हता. त्या दृष्टीने कोणतीही तयारी केली नव्हती. योजना आखली नव्हती. तसे झाले असते तर कदाचित पत्री सरकारची एक चांगल्यापैकी आवृत्ती निघू शकली असती. पण जे झाले ते कोणाच्या ध्यानीमनी नव्हते.

छत्तीस साली आम्ही सेवादल स्थापन केले. वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ महात्माजींनी सुरू केली त्या वेळी सेवादलातल्या पोरांनी त्यात भाग घ्यायचे





कोरेकर : १९७२

कोरेकर : १९४२

ठरवले. पण आमचे वय कमी म्हणून परवानगी नाकारण्यात आली. आम्ही खट्टू झालो होतो.

४२ च्या ऑगस्टमध्ये वातावरण तापू लागले होते. आम्ही दररोज प्रभातफेऱ्या काढू लागलो. ९ ऑगस्ट रोजी 'चले जाव' चा ठराव पास झाला. आणि आम्ही लगोलग बैठक घेतली. बैठकीत असे ठरले, की कायदेभंगाची अहिंसात्मक चळवळ सुरू करावी. प्रचार करीत खेड्यापाड्यांतून निघावे. गिरफदारीचा मौका आला तर घ्यावे. १६ ऑगस्टला नागपंचमीचा सण आटोपून निघायचे असेही ठरले.

बहुतेक मोठ्या नेत्यांच्या देशव्यापी गिरफदारीनंतर चळवळ जनतेच्या हातांत आली होती. सरकारच्या निर्घृण दडपशाहीचे लोण चिमूरपर्यंत येऊन पोचले होते. आणि पोलिसी अत्याचारामुळे ही ठरलेली योजना बारगळली होती. इन्स्पेक्टर हरिराम शर्मा हे तसे स्वभावाने शांत होते. त्यांच्याबद्दल लोकमत चांगले होते. पण लोकांना दहशत बसवण्यासाठी बाहेरचा जादा फोर्स आला. सर्कल इन्स्पेक्टर जरासंध, एस. डी. ओ. डुंगाजी आणि नायब तहसिलदार सोनवणे यांनी राखीव पोलीसदळासह चिमूरला मुक्काम ठोकला. झडत्या, दमदाटचा, मारपीट इत्यादी अत्याचारांचे सत्र सुरू केले. दहा-बारा जेष्ठ स्थानिक पुढाऱ्यांना त्यांनी कोतवालीत बंद केले. त्यात सेवादल प्रमुख उद्धव खेमस्कार होते.

## प्रभात फेरी

१५ ऑगस्टला सायंकाळी आम्ही सभा घेतली. पोलिसांच्या नाकावर टिच्चून प्रभातफेरी काढायची असे ठरवले. पोलिसांच्या अत्याचारांनी आमची पोरसवदा माथी भडकली होती. पोलिसांना 'घेराव' करायचा, त्यांना गिरफतार करू द्यायचे नाही आणि प्रभातफेरी पूर्ण करायचीच असे आम्ही ठरवले होते.

१६ ऑगस्टची नागपंचमी. त्या दिवशी सकाळी ठरल्याप्रमाणे किल्ल्यावर प्रभात-फेरी काढण्यासाठी आम्ही जमत आहोत तोच आम्हाला पोलिसांनी अडकवले. माझ्या वडिलांना पकडले व सोडून दिले. झेंडा हिसकावून घेतला, आणि पिटाळून लावले. प्रभातफेरी काढायचीच या जिद्दीने पुन्हा आम्ही वस्त्र-स्वावलंबन कार्यालयात जमलो. इकडे आमची बैठक सुरू होती आणि तिकडे पोलिसांनी कार्यालयाला घेरा टाकला होता. आम्ही पोरांनी हातांतील काठ्या बाजूला ठेवल्या आणि 'निहत्थे' होऊन 'व्हाइसरॉय दिल्लीमे जूते खाये गल्लीमे' असे पोलिसांना चिडवणारे नारे देत निघालो. फेरी देवळासमोर आली. इन्स्पेक्टर रमाशंकर याने ती अडवली. मी उपदलनायक होतो. रमाशंकरच्या हुकमावरून कॉन्स्टेबल प्रधानप्रसाद मला धरण्यासाठी सरसावला. मी माझा चार्ज बाबूलालला दिला आणि शांतपणे त्याच्या स्वाधीन झालो. एकट्या मला गिरफदार करून पोलीस फेरी चालू ठेवत असतील तर माझी ना नव्हती.

प्रधानप्रसाद मला घेऊन ठाण्याकडे निघाले. वाटेत तुकाराम चन्ने याने हाक दिली. नाश्ता करून जा म्हणून सांगितले. प्रधानप्रसादलाही त्याने दपटले. एव्हाना चिमूरचे नागरिक फार गरम झाले होते. आणि एकटे दुकटे पोलिस यांना नेहमी दबकून वागायचे. चन्ने यांनी प्रधानप्रसादवर यथेच्छ तोंडसुख घ्यायला सुरुवात केली.

तिकडे मिरवणुकीत दुसराच बनाव घडत होता. पोलिसांनी मिरवणूक हटकून थांबवावी हे काही भडक माथ्याच्या जवानांना खपले नव्हते. 'गांडू आहा कारे ?' म्हणून ते रेटारेटी करीत शिरले आणि पोलिसांना न जुमानता मिरवणूक पुढे निघाली. घोषणांचा वेग, जोश आणि उग्रता वाढली. शिस्तबद्ध फेरीला खवळलेल्या जमावाच्या मोर्च्याचे स्वरूप येऊ लागले. चन्नेच्या उपहारगृहात मी असताना हा खवळलेला जमाव चालून येताना प्रधानप्रसादने पाहिला आणि त्याने सूंबाल्या ठोकला. मला थोडे चमत्कारिक वाटले, हसू आले आणि मी उत्साहाने पुन्हा त्या मोर्च्यात सामील झालो.

## लोक खवळले

जमाव पोलीस कचेरीसमोर आला. यावेळी मोटार-स्टँडवर बाहेरगावी जाणाऱ्या उतारूंची दाटी होती, मीही त्यात मिसळलो. घोषणांचा कल्लोळ उठत होता. लोक पोलिसांना आव्हान देत होते. अशा वेळी सर्कल दरोगा जरासंध याने डेंजरकॉल

दिला आणि पोलिसांचा लाठीचार्ज सुरू झाला. पण लाठी हल्ल्याच्या आवाक्यात येईल असा तो समूह नव्हता. सहनशीलतेने मर्यादा ओलांडली गेली. या तीन-चारशे लोकांनी लाठ्या झेलत असतानाच जरासंघास धरून ठोकले. एका कॉन्स्टेबललाही चौकावर बरीच बत्ती देण्यात आली. पोलीस इतस्ततः पळून गेले. जमाव घोषणा देत देवळासमोर आला तेव्हा तो दीड-दोन हजारांचा झाला होता.

एवढ्यात तुकडोजींची मोटार येऊन पोचली. जमावाला शांत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ' जरासंघाला समजावले आहे. तुम्ही शांतता पाळा ' असे समजावून त्यांची मोटार निघून गेली. कदाचित यानंतर पांगापांग झाली असती. पण तेवढ्यात जमावातून एक अफवा उठली– ' फायरिंगची ऑर्डर देणार आहेत. '

फायरिंगची ऑर्डर देणारे मॅजिस्ट्रेट डाकबंगल्यात होते. तेव्हा जमावाचा मोर्चा साहजिकच तिकडे वळला.

एस. डी. ओ. व मॅजिस्ट्रेट डुंगाजी बंगल्याच्या व्हरांड्यात नायब तहसिलदार सोनवण यांच्यासह बसले होते. जमावाच्या म्होरक्यांनी जरासंधाच्या हडेलहप्पीबद्दल त्यांच्याजवळ तक्रार केली–

' जरासंध जो कुछ कर रहा है, ठीक कर रहा है, चिमूरके लोग बदमाश हैं, ' डुंगाजी ओरडले. एवढेच नव्हे तर ' पिस्तोल लाव ' म्हणूनही त्यांनी हुकूम दिला.

जमाव थबकून पाहात होता. बराच वेळ पिस्तुल आले नाही तेव्हा त्याने चळवळायला सुरुवात केली. गोटामार सुरू झाली. डुंगाजी व सोनवणे जीव घेऊन आत पळाले. डाक बंगल्याची दारे त्यांनी आतून बंद केली.

जमावाचा विजयोन्माद आता अनावर झाला होता. त्यातले शौर्य आणि क्रौर्य उफाळून आले होते. अस्मिता डिवचली गेली होती. बदमाश म्हणून लोकांची संभावना झाली होती. देशप्रेमाने पेटलेले साधेसुधे लोक म्हणे ' बदमाश ' आणि ही पोटभरू कुत्री म्हणे इज्जतदार – मीही त्या झुंडीतला एक होतो आणि झुंडीच्या प्रतिक्रिया माझ्याही मनातून थरारून जात होत्या. झुंडीला चढणारी झिंग मलाही चढू लागली होती. त्या बेफाम अवस्थेत आम्ही डाकबंगल्यावर चालून गेलो. हाती येईल त्या सामानानिशी हाती येईल त्याची मोडतोड करायला सुरुवात केली, अखेर दारे फोडून झुंडीने आपले लक्ष गाठले आणि पहाता पहाता गुलामांच्या त्या दोन मानवी प्रतिकांचा निकाल लावला. त्यानंतर डाकबंगला पेटवून देण्यात आला. तेवढ्यात दुसरी अफवा उठली – ' ज्यांना कोतवालतीत बंद करून ठेवले त्यांना टांगून त्यांचे तुकडे तुकडे करण्यात येत आहेत. ' सत्यासत्यता पडताळून पाहण्याचे, विचार करण्याचे भान यावेळी जमावात राहिले नव्हते. बिन डोक्याच्या कबंधा सारखी त्याची स्थिती झाली होती. ' धावा ' अशी कोणीही हाक द्यावी आणि त्याने धावू लागावे. ' मारा ' असे कोणीही ओरडावे आणि हातून मारणे झाल्यावर काय घडले ते त्याला कळावे अशा जाणीवेत तो होता. ही अफवा उठताच जो तो तडक

ठाण्याच्या दिशेने निघाला.

तिकडून २०–२५ बंदुकधारी पोलिसांची तुकडी येत होती. जमावाची गाठ नागोबाच्या देवळाजवळ पडली. तुकडीच्या अग्रभागी जरासंध, हरिराम शर्मा, प्रधान-प्रसाद आणि कामताप्रसाद असलेले दिसले.

'फायर' जरासंधाचा आवाज घुमला आणि त्या पाठोपाठ काडतुसांची एक फैर झाडली. यांत एका दोघांना चाटून बंदुकीच्या गोळ्या निघून गेल्या. फारसे कोणी दगावले नाही. जमाव पांगला. तसा पोलिसांचा तांडा डाकबंगल्याकडे जायला निघाला. आम्हाला वाटले पोलीस तुकडी डाकबंगल्याला जाईल पण ती सरळ सडकेने निघाली. जमावातील काहींनी शंका प्रगट केली हे पोलिस वरोऱ्याला जातील. जादा पोलीस फोर्स आणतील नि चिमूर बेचिराख करतील तेव्हा यांना वाटे-तच अडविले पाहिजे. जमावाला ही शंका पटली. पोलिसांचा पाठलाग सुरू झाला. समोर पोलीस पळत व त्यांचे मागे जमाव. दोन मैल पाठलाग केल्यानंतर पोलिसांनी मागे वळून दुसऱ्यांदा गोळीबाराला सुरुवात केली. जमावातून गिट्टीचा मारा पोलिसावर होऊ लागला. एका बाजूने बंदुकीतून सुटणाऱ्या गोळ्या व दुसऱ्या बाजूने गिट्टीचा मारा १५ मिनिटे पावेतो जणूकाय घमासान युद्धच सुरू असल्याचा भास होत होता.

जमाव पांगू लागला. आम्ही बाजूला झालो. आडोसे शोधू लागलो. पण माझ्या बाजूला असलेला बाबूलाल झिरे ऐकेना. तो छाती काढून पुढे झाला. सतरा वर्षांच्या त्या पोरातले क्षत्रियाचे रक्त जागे झाले होते.

'चलाव साले गोली' –

गोळी त्याच्या छाताडात बसली तो एकदम खाली पडला. काही काळ तो शुद्धी-वर नव्हता. मी त्याला बाजूला घेतले. तो काहीसा शुद्धीवर आला तेव्हा आपल्याला गोळी लागली आहे हेच काही केल्या पटेना. पुन्हा पुन्हा तो उभा राहण्याचा प्रयत्न करीत होता. तेव्हा त्याचा हात मी त्याच्या छातीवरच्या जखमेवर ठेवला. तो जेव्हा रक्ताने भरून आलेला त्याने पाहिला तेव्हाच त्याला ते खरे वाटले. तेवढ्यातही तो खणखणीतपणे तो उद्गारला – 'पहातोस काय, शर्ट फाड आणि कोंब त्या जखमेत आणि पट्टी बांधून टाक.'

फायरिंग सुरूच होते. बरेचसे मराठी पोलीस हवेतच बार काढत होते. एकाच्या ढुंगणावर जरासंधाने लाथ हाणलेली मी पाहिली – तो म्हणाला असावा – 'साले, हवामे गोली चलाता है.'

तो छोटा बालाजी रायपूरकर. गोळीला चेंडू समजून दोन्ही हातांनी झेलायला गेला त्याची ओंजळ आंगठी फोडून गोळी पलीकडे त्याच्या कोथळ्यांत गेली.

आणि मग एकाएकी फायरिंग बंद पडले. गोळ्या संपल्या होत्या. आता सद्दी जमावाची होती. तो पुढे सरसावला आणि पोलीस माघारे वळले. काहींनी तर

आपले कपडे काढून फेकले. आणि 'वंदे मातरम 'ची गर्जना करीत ते दहा दिशांनी पळाले.

सर्कल इन्स्पेक्टर जरासंधाला जागच्या जागी ठार करण्यात आले. हरिराम शर्मांला त्याच्या सुस्वभावी इतिहासाचा फायदा मिळाला. जमावाने त्याला माफ केले. त्याच्या विनंतीवरून प्रधान प्रसादालाही माफ केले. कॉन्स्टेबल कामता प्रसादला हुडकून काढण्यात आले. त्याला वाचवण्यासाठी जेव्हा मी पुढे झालो, तेव्हा माझ्या हातावरच लाठीचे वार बसले. मी बाजूला झालो आणि जमावाने आपला चौथा व अखेरीचा बळी घेतला.

इन्स्पेक्टर शर्माकडून ठाण्यात बंद असलेल्या लोकांना सोडण्याची चिठ्ठी लिहून घेण्यात आली आणि ती घेऊन एकजण धावत निघाला.

ठाण्यावर दरोगा रमाशंकर होता. फार गुर्मीत होता. आत बसलेल्या लोकांनी चहा मागितला. मूत पिओ ना साले, म्हणून त्याने त्यांना ठणकावले होते. पण ही चिठ्ठी हातात पडली मात्र, 'बचाव' म्हणून त्याने टाहो फोडला आणि तो बाहेरूनच आतल्या लोकांच्या पाया पडू लागला

'आप मेरे माँ बाप है, मै आपका दास हूँ. मैने वहुत गुनाह किया है. लेकिन मेरे बच्चों का ख्याल करो ' माँ बाप मुझे बचाव.'

आतले लोक बुचकळचांत पडले. म्हणाले, 'हम तो अंदर है. फिर कैसे बचाव.'

रमाशंकर पहाऱ्यावरल्या पोलिसांच्या अंगावर खेसकला –

'अबे, देखता क्या है खडा खडा ? अपने बापको खोलना.'

दुसऱ्या एकाला 'अबे, अपने बाप के वास्ते मिठाई ला ना' म्हणून त्याने पिटाळले. सर्वांना मोकळे करून त्याने सर्व पोलिसांचे गणवेष उतरविले आणि पोलीस ठाण्यासह ते पेटवून देण्यात स्वतःच पुढाकार घेतला. तोपर्यंत जमाव तेथे येऊन पोचला होता. मी पुढे होऊन रमाशंकरची दाढी धरली. त्याने पुन्हा गयावया करायला सुरुवात केली. मोठ्या लोकांनी मधे पडून त्याची सुटका केली.

दुपारी बारा वाजेपर्यंत हे सर्व आटोपले. बहुतेक सरकारी इमारती पेटवून झाल्या. गावातले इंग्रजांचे व पोलिसांचे राज्य संपुष्टात आले होते. त्यानंतर हुतात्म्यांचो प्रेतयात्रा काढण्यात आली. पोलिसांच्या मृतदेहानांही भडाग्नी देण्यात आला. जखमी लोकांना दवखान्यात पोचवले. बाबूलाल अत्यवस्थ होता.

यानंतर काय करायचे हा मोठा प्रश्न होता. लोक जोशात असले तरी काहीसे गोंधळले होते. शेवटी प्रमुख नागरिकांची एक बैठक बोलावण्यात आली. कित्येक बंदुका, दारूगोळा आणि खजिना आमच्या ताब्यात आला. करतो म्हटले असते तर आणखी मोठ्या उठावणीसाठी त्याचा उपयोग करता आला असता. पण ती कल्पनाही कोणास शिवली नव्हती. खजिना म्हणजे 'परक्याचा माल' या दृष्टीने आम्ही त्याच्याकडे पहात होतो. अखेर, आहे ती परिस्थिती कायम ठेवावी, रात्री,

गावात गस्त घालण्याचे काम सेवादलातल्या पोरांनी पत्करावे असे ठरले. इंग्रजी फौजा येणार हे निश्चित होते. रात्री गावात वादळ येऊन गेल्यानंतरचा चमत्कारिक सन्नाटा होता. त्या स्मशानशांततेत कुत्र्याचे रडणे भर घालीत होते.

दुसऱ्या दिवशी मिलिटरी येत असल्याचा निरोप आला. वडीलधारे पुढारी आमच्या 'पोट्टेशाही'ला शिव्या देऊ लागले. 'काय होईल ते पाहू. गिरफदार करतील तर होऊ. मारतील तर मरू, या निग्रहाने आम्ही मात्र निर्घोर होतो.

चिमूर पासून वरोड्याकडे जाणारा १७ मैल पर्यंतचा रस्ता लोकांनी मोठमोठी झाडे आडवी पाडून व सर्व पूल उडवून अडवून टाकला होता. एक अवाढव्य पिंपळाचे झाड चार तासात कापून फेकलेले मला माहीत आहे. हा रस्ता साफ करीत कलेक्टर सुब्रह्मण्यम २०० गोरे-सोजीर आणि ३०० हिंदी शिपायांसह चिमूरला येऊन पोचले तेव्हा त्यांची दशा पाहण्यासारखी होती.

दरोगा रमाशंकर याला भोमे यांच्याकडे लपवून ठेवले होते. पुढे मागे तो घातक ठरेल या शंकेने लोकांनी त्याची मागणी केली होती. पण शरणागताला अभय देण्याचे व्रत पाळून गृहस्वामिनीने ही मागणी नाकारली. त्याच्या जवळ नजर म्हणून काही मुलांना ठेवले होते. त्याने त्यांच्याशी गोडीगुलाबीने वागण्याचा आणि इंग्रज सरकारला सपाटून शिव्या देण्याचा अविर्भाव आणला. पोरेच ती त्याच्या साखरपेरणीला बळी पडून त्यांनी घडलेली इत्थंभूत हकीगत पराक्रम गाजवल्याच्या फुशारकीत सांगून टाकली. मिलिटरी आल्याचे कळताच हा रमाशंकर डोळा चुकवून निसटला आणि कलेक्टरला उठावात ज्यांचा प्रामुख्याने भाग होता त्यांची खडान् खडा माहिती त्याने पुरविली. एवढेच नव्हे तर गावभर फिरून त्यांची राहती ठिकाणे दाखवली. एवढीशी फौज परिणामकारक कारवाईसाठी पुरेशी होणार नाही आणि समाज खवळला तर तिची पठणीही पुरणार नाही, असा सल्लाही कलेक्टरला मिळाला. तेव्हा त्याने आणखी फौज बोलावली दरम्यान एकदा आमच्या-पैकी पुष्कळांना गोळा करून सैनिकांच्या पहाऱ्यात गावाबाहेर नेण्यात आले. बंदुका, मशीनगन्स यांच्या प्रदर्शनाने दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करून मग सोडून देण्यात आले. व ता. १९ ऑगस्टला आणखी फौज आली तेव्हा मिलिटरीने खऱ्या कारवाईस सुरुवात केली. साऱ्या गावाला वेढा घालण्यात आला आणि घराघरात शिरून धरपकडीचे सत्र सुरू झाले. कोणतीच इमारत शिल्लक राहिली नव्हती म्हणून पकडलेल्या शेकडो लोकांना एका शेडमध्ये डांबण्यात आले. सर्वत्र मशीन-गन्स घेतलेल्या सोल्जरांचा पहारा होता.

पुढे काही दिवस चिमूरवर सोल्जरांचे राज्य होते. जी एकटी दुकटी सापडली त्या बाईची अब्रू घेतली गेली आणि झडती व मारझोड या वाचूनचे घर शिल्लक राहिले नाही. पुष्कळशा घरातली कर्ती माणसे धरली गेली व घरे उघड्यावर पडली. काम धंदे बंद झाले. मी व वडील दोघेही धरले गेलो होतो. भाऊ लहान होते. माझे

लग्न सहा महिन्यांपूर्वीच झाले होते. मला धरायला मिलिटरी आली तेव्हा पत्नी विहिरीत जीव देण्यास निघाली. तिला आईने सांभाळून आणले. घर सोडताना आता हे आपल्याला पुन्हा पहायला मिळणार नाही या कल्पनेने भावना दाटून आल्या. पण आपली कमजोरी लोकांना दिसू द्यायची नाही असा माझा निश्चय होता. तेवढयातही मी कलेक्टरांशी बाचाबाची करून घेतली.

आम्हा कैद्यांना भरून लॉऱ्या निघालेल्या. तो प्रसंग कृष्णाला अक्रुराने गोकुळातून नेले त्या प्रसंगाची आठवण करून देणारा होता. आया बाया, म्हातारे, चिल्ली-पिल्ली रडत भेकत त्यांना आडवी होती. शिपाई त्यांना बाजूला ढकलीत होते. गावच्या गाव आसवांनी न्हाऊन निघत होता आणि डोळयांत प्राण आणून आम्हाला अखेरचा ठरणारा निरोप देत होता......

## फाशी सुनावली

लोकक्षोभाच्या भीतीने आम्हाला वरोडा स्टेशनवर गाडीत न बसवता, वरोरा स्टेशनपासून ३ मैलांवर नंदोरी जवळ मुद्दाम गाडी थांबवून तेथे बसवण्यात आले. चांपा जेलमध्ये पोचताच खास नेमलेल्या मि. विकेडनच्या कोर्टाने 'समरी ट्रायल' सुरू केली. या कामातली सरकारची तत्परता दांडगी होती. चौघांच्या हत्येसाठी चौघे बळी तिला पुरेसे नव्हते. अखेर तिला राज्य चालवायचे होते. लोक कधीही धजणार नाहीत अशी दहशत निर्माण करायची होती. क. मा. मुंशींनी आमचे वकीलपत्र स्वीकारले होते. आर्ग्युमेंटसाठी त्यांनी आठ दिवस पाहिजेत अशी मागणी केली. विकेडनसाहेब म्हणाले 'हवे तर पंधरा दिवस करा आर्ग्युमेंट. पण माझा निकाल ठरलेला आहे हे लक्षात असू द्या'. तेव्हा मुंशीजींनी दोन दिवसांतच आर्ग्युमेंट आटोपले आणि विकेडन साहेबानी एकवीस जणांना फाशी आणि अठ्ठावीस लोकांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या फाशी बहाद्दरात अर्थातच माझा समावेश होता. मला डबल फाशीची शिक्षा झाली होती.

फाशीची शिक्षा झाल्याबरोबर कैद्याला हातापायात दंडा बेडी ठोकायची असते. पण मी ती ठोकू देण्यास विरोध केला. तो पोरकटपणाच होता. पण माझ्या अकांड-तांडवामुळे जेलर मोहनुद्दीन थोडा घाबरला. पण त्याने खुद्द माझ्या वडिलांना भरीस घातले. तेही त्यावेळी आमच्याबरोबर तुरुंगात होते. त्यांनी व इतरांनीही समजविण्याचा प्रयत्न केला. अखेर तडजोड म्हणून जंजीर बेडी घालण्यास मी परवानगी दिली. तिच्यात थोडा त्रास कमी होता.

'आता आपण मरणार' असे एकदा निश्चित झाल्यावर आमच्या मनावरचा ताण नाहीसा झाला होता. दिवसरात्र आम्ही हसण्या खिदळण्यात घालवीत होतो. आणि ते पाहून बाकीचे मात्र कासावीस होत होते. भगतसिंग, राजगुरू प्रमाणे आम्ही काही संकल्प सोडून झालेले क्रांतिकारक नव्हतो. एकतऱ्हेच्या अपघातानेच

पृष्ठ ५० वर

# कविता

## मन स्मशान स्मशान

बऱ्याचदा वाटतं
मरावं !
जळावं !
मनातल्या मनातच
म्हणजे मन हे स्मशानच की !
हं ! मन स्मशान स्मशान !
आशांची कलेवरं जळतात तिथे
आकांक्षांच्या चिता धुमसतात तिथे
इच्छांची नाचतात भूतं जिथे
दैव असतं हसत
वेताळासारखं...
मी स्तब्ध होतो
मृताच्या नातलगांसारखा...

—प्रसाद पाठक

## वेध लागला दुरीचा

नको चिवचिवू इथे
वेध लागला दुरीचा
रानावनात घुमतो
पायरव बिजलीचा !
मंद सावली मनीची
जाई विस्तारत नभी
नभ लावुनिया ओठी
तृप्त क्षितिजाची नाभी ! !
शब्द शब्दातच नाही
गेला विरुनिया कोठे
मिठी विश्वाच्या कवेची
रूप अरूपात भेटे

—चंद्रकुमार नलगे

## सखी

नक्षत्रांचं भाळ तिचं
सखी माहेराला आली
ओळखीचे रंग सारे
विसावले गोऱ्या गाली
सयांनी बेजार केलं
माय गालात हसली
उरातल्या चांदव्याची
छाया डोळ्यांत दिसली

—उत्तम कोळगांवकर

'मन स्मशान स्मशान' या कवितेत सहजपणे स्फुरलेले एक रूपक प्रसाद पाठक यांनी सांगोपांग फुलविले आहे. संसाराचा ताप सहन करताना मरावं, जळावं, असे वैतागाचे उद्गार अनेकदा मनात येतात. मरण्या-जळण्याचे सारखे विचार करणारे आपले मन म्हणजे स्मशानच आहे असे कवीला वाटते. मग आशांची कलेवरे, आकांक्षांच्या चिता, इच्छांची भुते, दैवरूपी वेताळ अशी अनेक परंपरित रूपके त्या कल्पनेभोवती जमतात. त्यांतून कवीच्या कल्पनाशक्तीला वाव मिळत रहातो. काहीशी भाववृत्तीही आकार घेऊ लागते. 'मी स्तब्ध होतो, मृताच्या नातलगांसारखा... !' या उपमेमध्ये ही भाववृत्ती एकदम कविमनाचा वेध घेते. आपोआप उत्कट बनते. अनुभूतीचे परिवलय वेढून घेते. कल्पनारंजनाला मिळालेले हे भावनेचे अधिष्ठान कवितेला परिणामकारक बनविते.

चंद्रकुमार नलगे यांनी 'वेध लागला दुरीचा' या कवितेत कविमनाला जाणवणारी एक अबोध ओढ चित्रित केली आहे. कुठला तरी दूरचा वेध कवीच्या आतुर मनाला लागलेला आहे; आणि त्यामुळे इथला नाजुक चिवचिवाटही त्याला नकोसा वाटतो आहे. 'रानावनात घुमणारा बिजलीचा पायरव' आणि 'नभी विस्तारत जाणारी मनीची मंद सावली' ही दोन्ही संवेदनाचित्रे फार प्रत्ययकारी आहेत. श्रवण व दृश्य यांच्या द्वारे अरूपाचे रूप रेखण्याचे काम त्यांनी विलक्षण सामर्थ्याने वठविले आहे. नभ ओठी लावून क्षितिजाची 'नाभी' तृप्त होणे ही कल्पना मात्र अर्थदुरान्वयामुळे केवळ यमकपूर्तीसाठी आलेली आहे की काय, असे वाटते. विश्वाच्या कवेच्या मिठीत अरूपाची रूपभेट घेण्याचा हा अनुभव तसा कल्पनेच्या पातळीवरील असला, तरी कवीने तो संवेद्य बनविलेला आहे.

'सखी' या कवितेत उत्तम कोळगांवकर यांनी एक मधुर चित्र अगदी रेखीवपणे रेखाटले आहे. अर्थपूर्ण प्रतिमांची गुंफण हे या कवितेचे एक लोभस वैशिष्टय आहे. 'नक्षत्रांचे भाळ', 'गालावर विसावलेले ओळखीचे रंग', 'उरातल्या चांदव्याची छाया' या प्रतिमा तशा अनेकांनी अनेकदा वापरलेल्या. पण इथली भावपूर्ण घटना कवीने इतक्या हृद्यतेने सांगितली आहे, की त्या प्रतिमा इथे जिवंत, स्वयंभू वाटतात. सूचकता हे यातल्या भावनेचे वैशिष्टय आहे. त्यामुळे यातील भावनेचे नाटय दृश्यातून आकार घेताना फार नाजुकतेने खुलत जाते. दोन कडव्यांच्या या कवितेत एक मोहक प्रसंग आणि त्या प्रसंगात फुललेले सहजभाव कवीने परिणामकारक रीतीने रेखाटलेले आहेत.

— रसिक

दवाखाना बंद करायच्या वेळी कुणी आलेलं मला खपत नाही. बाहेरच नर्स म्हणा किंवा शिवू कंपौंडर रोग्याला उद्या किंवा संध्याकाळी यायला सांगतात. आता कुणी येतही नाही म्हणा, कारण 'शेतवडं' नावाच्या या नकाशात ठिबाचंसुद्धा महत्त्व नसलेल्या या खेडयात सगळयांना हे कळलं आहे, की डॉक्टर तापतो, अवेळी गेलं की. वीस वर्षं खूप झाली मला समजून घ्यायला. ठीक आहे...

पण अशा वेळेला नेमकी ती आली. शिवूचं वैतागणं माझ्या कानावर आलं तरी मी आत संथ बसून होतो... कुणी आत येण्याची अपेक्षा नव्हतीच. पण दुसऱ्याच क्षणी दरवाज्यात आवाज आला .. "डॉक्टर..."

नवीन दिसत होती. कारण गावातलं कुत्रंसुद्धा मला भैय्यासाहेब म्हणून ओळखतं, ही आपली गंमत हं. पण गावात मला डॉक्टर म्हणणारं कुणीच नाही. वीस वर्षांपूर्वी आलो तेंव्हाही नाही आणि आता तर नाहीच नाही. मला




कु. राजश्री ठकार

आवडत नाही, आपल्या धंद्याच्या नावानं हांक मारलेलं. धंदा म्हणजे पेशा! त्याचा विपरीत अर्थ घेऊ नका. तर, आवाजाचा मालक पाहिला, आवाजावरूनच कळलं मालकीण होती. संथ आवाज, येऊ नये त्या वेळेला आल्याचं ध्यानातच नसल्याप्रमाणं, मग मीही जाणीव दिली नाही. कुठल्यातरी इंग्रजी पुस्तकातल्या मिष्किल आजोबाच्या खेळकरपणानं 'या' म्हटलं... नाहीतरी मी आजोबाच आहे. ती आली. डॉक्टरी नजरेला जाणवलं की, तिच्या जरा उंचावल्या आहेत. चार किंवा पाच महिने झाले असावेत.

"बसा ! बाळाच्या आगमनाची तयारी दिसतेय्..." तिनं थंडपणे माझ्याकडे पाहिलं. या गावात राहून सलगीनं बोलायची मला फार वाईट खोड जडलीय् !

"आगमनाची तयारी दिवसा दिवसांनी होतेच आहे. डॉक्टर, पण त्याची..."

"भीती वाटतेय. होय ना ?" नेहमीची काळजी. पहिलटकरीण असावी.

"होय डॉक्टर भितीच वाटतेय..." काहीतरी मिष्किल बोलायला चटावलेल्या



मला नजरेनं थांबवत तिचं वाक्य पूर्ण झालं. " भीतीच वाटतीय त्याच्या जन्माची! माझं अॅबॉरशन करा ! गर्भपात !!"

मी चमकलोच. अॅबॉरशन! हसलेले ओठ तसेच राहून नजरेत पहिल्यांदा कडवटपणा आला आणि मग मी ओठही घट्ट मिटून घेतले. मी अशा केसेस घेत नाही. खूप पैसे मिळत असून घेत नाही. माझा हळवेपणा आहे की न्यायीपणा आहे कोण जाणे. पण मला पटत नाही.

" You are at the wrong place. तुम्ही जागा चुकलात. मी अशा केसेस घेत नाही मिसेस्..."

" डॉक्टर. या बाळाला मी कशी जगात आणू ? कशाला आणू ? मला भिती वाटते. हो डॉक्टर. मला नाही त्याला या जगात आणायचं..."

" म्हणजे तुम्हाला काय म्हणायचंय ? तुम्ही मार्ग चुकला आहात का ? लोकांची भीती वाटतीय का ? मुलाचे वडील, तुमचे पती नाहीत का ?..."

" डॉक्टर मुलाचे वडील माझे पतीच आहेत..."

" तुम्ही आधीच प्रिकॉशन घ्यायला पाहिजे होती... आता मी तरी काहीच करणार नाही. "

" डॉक्टर, विचार करा, कुठल्या आधारावर त्याला या जगात आणू ?"

" तुमच्या, तुमच्या नवऱ्याच्या..."

" तेवढा आधार त्याला बास नाही डॉक्टर. "

" मग आणखी कोणता आधार पाहिजे तुमच्या मुलाला..."

" माझ्या मुलाला माणुसकीचा आधार पाहिजे... तो कुठून देऊ डॉक्टर ? तो कुठून देऊ...आज ऐकलेत स्फोटाचे आवाज ? त्याच्या जन्मापासून मी त्याला अशा आवाजात वाढवू ? माणुसकीहीन जगात त्याला वाढवू ? आमच्या मायेची पाखर त्याला पुरेशी होणार नाही डॉक्टर... कुठल्या क्षणाची शाश्वती मी त्याला देऊ की त्या क्षणी तो भीतीपासून मुक्त असेल. ही परीक्षित राजाची भीती आहे डॉक्टर, कुठल्या क्षणी साप येऊन चावेल त्याची कल्पना नाही, म्हणून रहा एखाद्या समुद्रात घर बांधून आणि मग फळातल्या अळीचा साप होतो डॉक्टर; डॉक्टर ही भीती असह्य आहे. आपण सगळे आज परीक्षित आहोत डॉक्टर, सदैव भ्यायलेले... या भीतीच्या अवारणाखाली कशाला जगायचंय्. देवाच्या प्रयोगासाठी ? कसे भिऊन मरतात बघा !...

तिची असहाय्यता एकेरीवर यायला पुरेशी होती.

" शांत हो मुली, अग सगळे भीतीनं कुठं मरतात ? आपल्या मरणानं मरतात. "

" नाही डॉक्टर, लोक मरतात ते या भीतीनं ! रात्री अंथरुणावर पडलं, की डॉक्टर एखादं विमान घरघरत डोक्यावरून गेलं तरी मन कासावीस होतं. कुठं युद्ध नसेल ना सुरू झालं ? युद्ध स्थायी भाव झालाय् डॉक्टर, दोन राष्ट्रांत, दोन जमातींत, दोन भाषांत, दोन गटांत, दोन माणसांत. सगळ्यांचा शेवट युद्ध आहे का डॉक्टर ? मी सहन करतेय ते बास आहे डॉक्टर निदान माझ्या पोराला ते सोसायला लावू नका. डॉक्टर मारून टाका त्याला. जोपर्यंत भीती म्हणजे काय हे त्याला कळत नाही तोपर्यंत मारून टाका. डॉक्टर ते माझंच मूल आहे पहिलंच आहे डॉक्टर, तरी मारा त्याला .. तुम्हाला आठवतं डॉक्टर, इथल्या पूलाच्या बांधकामासाठी आणलेल्या सिमेंटच्या पोत्यांची चोरी होत असताना माझ्या मिस्टरांनी, लेबर युनियनच्या सदस्याला पकडलं. दोनच दिवसांनी डॉक्टर, या सत्कृत्यासाठी त्यांना लाठ्या खाव्या लागल्या... फार लागलं होतं हो त्यांना, मी पहाताच घाबरले, मलमपट्टी केली... पण हृदयात भीती ठसून राहिली डॉक्टर, मी कशी आणू या मुलाला जगात ?"

" च्...मुली तू फार विचार करतेस, असं कुठं आयुष्य वर आलंय् का

माणसाचं ? हे बघ ! देवाची दुनिया बघ ! पाऊस बघ ! वारा बघ !"

"हं...डॉक्टर, तुम्ही आशावादी आहात पण डॉक्टर, तुम्हाला सांगू ? परवा मी दोन लहान मुलांना बोलताना ऐकलं...' आता हा पाऊस काय करील त्याच्यावर आहे नाहीतर मागा भीक..." त्या छोटया पोराच्या चेहऱ्यावर भीती होती. डॉक्टर त्या पोराला कशाला पाहिजे होती काळजी...पावसाची, दुष्काळाची, पण भीती हा मूलमंत्र आहे डॉक्टर या दुनियेतला...डॉक्टर ..

"अग हे पूर्वीपासूनचं आहे, पाऊस कमी जास्त पडणं, पूर येणं, माणसं नष्ट होणं..."

"पण तेव्हा 'माणसं' मरायची डॉक्टर. आता मरतात किडा-मुंगी पेक्षाही क्षुद्र प्राणी...त्यांना काही स्थान नाही ! ते मेले तर, कुणी मनापासून रडत नाही. सगळे निर्विकार असतात डॉक्टर...उद्या आपली पाळी आहे, हे त्यांना माहीत असतं ! हे त्यांना माहीत असतं. मला माहीत आहे."

मी तिच्या जवळ गेलो. तिच्या पाठीवर हात ठेवला...हसलो मनाशीच. तिला कसं हंसू, सगळं खरं होतं...तरीसुद्धा जगणं क्रमप्राप्तच होतं, मरता येत नाही म्हणून...ही खरी धैर्यवान् होती. पण मीच तितका धैर्यवान नाही, अजून जीवन हे सुंदर आहे असं मी म्हणतो. अजूनही म्हणीन. "हे बघ !"

"डॉक्टर, मला फसवू नका. तुमच्या आयुष्यात तुम्हीसुद्धा घाबरलेले आहात, सतत अस्वस्थ आहात डॉक्टर."..."मुळीच नाही ! या धंद्यात अस्वस्थपणा नाही. कुणाचं अॅबॉरशन नाही केलं मुली, कुणाचे फुकट पैसे घेत नाही. पाण्याची इंजेक्शनस् देत नाही. काही नाही. It is a noble profession. I am doing it nobly." "कीव येते मला डॉक्टर तुमची, कुठलं नोबेल प्रोफेशन ! सत्य सांगायला घाबरताय् तुम्ही. तुमचं मन एकीकडे खात असतं ! तुमचा प्रत्येक रोगी म्हणजे नवीन प्रयोग. नवीन आशंका. एवढं ज्ञान घेऊन डॉक्टर तुम्ही शेवटी अपूर्णच ! रोगी मेल्यावर चूक समजणार डॉक्टर तुम्हाला. तुम्हीपण खचणार. भीती तुमच्याही मनात भरलेली आहे डॉक्टर, मला फसवू नका. कुणी कुणीसुद्धा मोकळं नाही भीतीपासून ! डॉक्टर, या जगाचं अॅबॉरशन करून भीती काढून टाका ! जमेल तुम्हाला ! मग मी माझ्या छकुल्याला वाढवीन, सोनेरी ऊन भीतीच्या छायेत नसेल तेव्हा. पण हे तुम्ही करू शकणार नाही. कुणीच करू शकणार नाही, कराल तुम्ही जगाचं अॅबॉरशन ? हा गर्भ वाढला तर काय होईल माहीत आहे डॉक्टर 'तिसरं महायुद्ध' सर्वसंहार ! मनुष्य जात शिल्लक रहाणार नाही ! डॉक्टर मला नाही हे सहन होत...माझ्या बाळाला मारून टाका ! माझा तरी, गर्भपात करा.

मी काय बोलू ? काय आठवतंय् या मुलीला ! कधी न केलेलं आज करावं लागणार मला...हिला नाही कसं म्हणू ?...डोळ्यापुढं धुकं का सलतेय ! अरे

बापरे डोळे पाण्यानं भरलेत...

" म्हातारपण पोरी म्हातारपण, डोळ्याला पाणी येतं वेळी अवेळी "

" तुमचं आयुष्य तुम्ही जगलात डॉक्टर, पण आता पुढचा प्रत्येक क्षण भयानक आहे. पॅरेशूट मधून उडी टाकल्यावर, छत्री न उघडता खाली आदळण्याचं हे अटळ भविष्य आहे. आपण मात्र हवेत तरंगतोय् याचा अभिमान बाळगतोय्. डॉक्टर, देवसुद्धा परत जन्म घ्यायला भितोय्. अर्जुनानी हतबल होऊन धनुष्य खाली ठेवूनसुद्धा कित्येक हजार वर्षं लोटली डॉक्टर. श्रीकृष्णसुद्धा स्वतःच्या अचानक अप्रत्यक्ष मरणानं कलीयुगाचं भविष्य लिहून गेला डॉक्टर, आता उपाय नाही. मला फार भिती वाटतीय्. मला माझं आयुष्य जगू द्या. आणखी कुणाला आयुष्य देण्याची माझी इच्छा नाही. नाहीतर डॉक्टर तुम्ही त्याला Insane करू शकाल का? Insane? एकदम वेडा. काही विचार करू शकणार नाही तो. मग तो आनंदात राहील. नाहीतरी L. S. D. पिऊन तसच पडायचं आहे सगळ्यांना आता. आत्ताच त्याच्या मेंदूवर आघात करा. पूर्ण वेडा होईल तो. मग मला काळजी नाही. त्याच्यावर जे अन्याय होतील ते त्याला समजणार नाहीत. एवढंच मला बास आहे. त्याला न्याय अन्याय समजणार नाही. बुद्धिवंतांवर होणारे अत्याचार कळणार नाही. अणूयुद्ध पेटेल हे त्याला कळणार नाही. लोकांचं रक्त नासायला लागलंय हे कळणार नाही. निर्बुद्धपणे तो मजेत आयुष्य जगेल. निदान एवढं तरी करा डॉक्टर, एवढं तरी करा, माझ्या बाळासाठी करा..."

माझचं डोकं फुटायला लागलंय. अस वाटतंय ही इतकं सत्य का बोलतीय्? एवढं सत्य सांगून हिला काय साधायचंय? सहन करण्याची ताकद माझी मुळीच नाही. सत्य हे इतकं हिडीस केव्हापासून दिसायला लागलं? आमच्या वेळी सत्य 'यदा यदा ही धर्मस्य' म्हणत यायचं. आत्ताचंच सत्य इतकं सत्य का वाटतंय?



" डॉक्टर, तुम्ही 'बाकी इतिहास' पाहिलंत का हो ?

" पाहिलं, त्यात पण शेवटी तो आत्महत्त्या नाही करत मुली..." हेच, हेच मला त्या मुलीवर ठसवायचं होतं. बहुतेक, माझा विजय झाला. मी अत्यंत प्रेमानं, सहानुभूतीनं तिच्याकडे पाहिलं. पण ती हंसली. असमंजस माणसाकडे पाहून हसावं तसं "

" तो तुमच्याच पंथातला डॉक्टर. किती पट्कन स्वतःच्या कोषात शिरता तुम्ही. कसं शिरू शकता ? तुम्हाला जरासंध जन्माला आलाय् हे कसं दिसत नाही ?"

" जरासंध ?"

" हो डॉक्टर, निसर्गतः भिन्न असलेली दोन जगं एकत्र आणताहेत. मग राक्षशिणींनी निर्माण केलेला जरासंधच निर्माण होतो. आत्ताच कुठं त्यांनं आळोखेपिळोखे द्यायला सुरवात केली आहे. हा जरासंध सगळं जग नासवणार आहे. मग शुद्धतेची लाज वाटू लागेल, माणसांना त्या वेळेला. माणुसकीवर बलात्कार करील हा जरासंध, आणि डॉक्टर, याच्यापासून वाचवायला कुणीसुद्धा नाही हो. माझं बाळ या जरासंधाच्या तावडीत देऊ मी ? नाही, मुळीच नाही. माझं ॲबॉरशन करा डॉक्टर. नाहीसा करा हा गर्भ, नाहीसा करा... "

" Stop it, ओरडू नकोस. असलं भयानक बोलू नकोस. माणसं...माणसं... घाबरतात. हसू नकोस. जरासंधाला मारायला देव येतो. "

" आधी पापाचा घडा भरेपर्यंत लोकांची त्यानं चालवलेली गंमत पहात बसणारा. याला काही अर्थ नाही डॉक्टर, कशाला काही अर्थ उरला नाही डॉक्टर. 'यदा यदा ही धर्मस्य' ही पोकळ वल्गना आहे डॉक्टर. भित्रं मन सावरायलासुद्धा आता त्याचा उपयोग नाही डॉक्टर. धीट व्हा. सत्याला सामोरे जा ! हा गर्भ कुणाला नकोय्. कदाचित् हापण त्याच्यातला एक होईल... "

" मी ॲबॉरशन करणार नाही. मी मूल्यांना जपणारा आहे. माझ्या लेखी सत्य सुंदर आहे. मी ते सुंदर आहे असंच म्हणणार आहे. मी गर्भपात करत नाही. ते माझ्या पेशाच्या नैतिक मूल्यांच्या विरुद्ध आहे. मी गर्भपात करणार नाही. जरासंध निर्माण झाला तरी करणार नाही. मुळीच नाही. माझ्या मागे लागू नकोस. चालती हो. तू नकोस माझ्या डोळ्यांसमोर. नाहीतर, नाहीतर मला मोह होईल. तू जा... जा...शिवू ऽ शिवू ऽ ऽ ... "

" नाही भैय्यासाहेब, आपले इंजिनियरसाहेब आलेत भेटायला. पेशंट नाही. "

" शिवू !"

" काय भैय्यासाहेब ?"

" शिवू, सांग त्यांना, आपल्या बायकोला सांभाळा म्हणून. मी काहीही करू शकलो नाही. "

" नमस्कार डॉक्टरसाहेब...माफ करा, त्रास दिला आपल्याला, मी आनंद. पुलाच्या कामाला आलोय. तीन-चार महिने झाले. पण कामामुळे वेळच मिळाला

नाही. पण, म्हटलं आज निमित्तानं तरी ओळख होईल. माझी पत्नी...बाळंत झाली. मुलगा झाला...आज तार आली."

मला काही समजेना! आत्ता कोण आलं होतं मग? माझा गोंधळ संपणार नाही. तोंड वासून त्यांच्याकडे बघत बसल्याचं लक्षात आल्याक्षणी मी मिष्किल म्हाताऱ्याचं हसू हसलो. मला सवय होती. "चला, म्हणजे जगाचं ऑब्झरवेशन करायची वेळ आली...तोच पर्याय होता माझ्यापुढे तिनं ठेवलेला..."

"काय?" तो बावचळला असलं विचित्र बोलल्यावर तेच होणार.

"काही नाही. विसरून जा...पेढे द्या पाहू! मला नेर्ल्यांची सुमा म्हणत होतीच. नेर्ले हो, तुमच्या हाताखालचे सुपरवायझर, इथलेच ते. त्यांची छोकरी, सुमा सांगत होती, की पुलावरच्या इंजिनिअरसाहेबांच्या बाईचं पोट मोठ्ठं झालंय्, त्यात बाळ लपवलंय् देवानं. हा! हा! हा! बसा हो इंजिनिअरसाहेब, थोड्या वेळ बसा! काय हो, मार नाही ना खाल्ला परत, बायको परत येईपर्यंत तुमची काळजी घ्यायला हवी."

"शिवू म्हणत होता ते खरं आहे डॉक्टर..."

"भैय्यासाहेब म्हणा, भैय्यासाहेब..."

"आईच्या मायेनं तुम्ही गावाला जपता भैय्यासाहेब..."

"हे बघ पोरा, त्याला इलाजच चालत नाही, हे म्हातारपण बरं."

"काहीतरीच भैय्यासाहेब! तुम्हाला म्हातारं कोण म्हणेल?"

"अरे, कुणी म्हणायच्या आधी स्वतःच म्हटलेलं बरं असतं. तेवढंच मन तयार होतं..."

"बरंय्, मी निघतो डॉक्टर...भैय्यासाहेब...आता दोन-तीन महिन्यांनी बाळाला सांभाळायला तुम्हालाच द्यायला हव, मीही पहिल्यांदाच बाप झालोय्..."

"हो ऽ हो ऽ जरूर. अरे, आता त्यांच्या हातात उद्याचं जग आहे. विलक्षण धीट बनवला पाहिजे त्याला. भीतीचा मागमूस त्याच्या मनात रहायला नको..."

"हो...हो..."


त्याचं लक्षच नव्हतं माझ्या बोलण्याकडे...दवाखान्यातून बाहेर पडता पडता, सहज आवाजात विचारावं तसं मी शिवूला विचारलं...

"अरे हो, शिवू, साहेबांच्या आधी कुणी आलं होतं का रे माझ्याकडे..."

"नाही भैय्यासाहेब...कुणीसुद्धा नाही."

शिवू किंवा मी फारच झपाट्याने म्हातारे होत चाललो आहोत, झालं...

□ □ □



"....या लाटेत
न सापडता
आपण
आपला
सूर
शोधीत
जायचे
या
वृत्तीने
मी
कविता
लिहिली"

शंकर वैद्य

मुलाखत
केशव मेश्राम

# 'कालस्वर'च्या निमित्ताने

पाप्युलर प्रकाशनाने प्रसिद्ध केलेला 'कालस्वर' हा प्रा. शंकर वि. वैद्य यांच्या निवडक कवितांचा संग्रह. शंकर वैद्य हे शालेय जीवनापासूनच कवितालेखन करीत आहेत. त्या वयापासून या माध्यमाशी लडिवाळपणा करीत असूनही आणि बरीचशी कविता प्रसिद्ध होऊनही त्यांनी फक्त 'बासष्ट' कवितांचीच आपल्या संग्रहासाठी निवड केली ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे.

आपल्या लेखनावर शालेय आयुष्यात संस्कार करणाऱ्या कै. वि. रा. नगरकर आणि श्री. वा. ज्यो. देशपांडे या दोन शिक्षकांविषयी त्यांना आदर वाटतो व कृतज्ञताही वाटते.

वस्तुत: शंकर वैद्य इतकी वर्षे लेखन करीत असूनही त्यांचे प्रत्यक्ष लेखन व त्यांची प्रसिद्धी या गोष्टी त्यांच्या हातून वेळच्या वेळी घडल्या नाहीत. कौटुंबिक

गुंते आणि व्यक्तिगत अडचणी यांचाही या गोष्टीत अडथळा आला. पण त्यामुळे कवी म्हणून रसिकांच्यापुढे आपली एक प्रतिमा ते उभी करू शकले नाहीत. पण यामुळे आपला फायदाही झाला असे श्री. वैद्य यांना वाटते. त्यांच्या आविष्करणात त्यामुळे अधिकाधिक पक्वता येत होती. त्यावेळी बोलबाला झालेल्या आणि आताही अंतर्मुख करणाऱ्या, 'खाष्ट म्हातारा', 'बादली' व ''परीटदादा' या कविता एकटाकी आणि झपाटल्यासारख्या लिहिल्या गेल्या.

लेखन करीत असताना प्रसिद्धी लाभत गेली तर लेखनावर बराच अनुकूल परिणाम होतो व हुरूपही येतो, हे श्री. वैद्य यांनी मनमोकळेपणाने सांगितले. त्याच-प्रमाणे स्थलांतरामुळे कधी अनुकूल तर कधी प्रतिकूल असा परिणाम होऊ शकतो. केव्हा जमलेली बैठक पार विस्कळित होते तर कधी नवनव्या अनुभवांची भर पडल्यामुळे लेखनाला वेगळा असा बहरही आल्याचे दिसते.

'कालस्वर' या त्यांच्या संग्रहाबद्दलची त्यांची प्रतिक्रिया सांगताना ते म्हणाले. 'बऱ्याच दिवसांपासून काव्यलेखन करीत होतो. चांगल्या प्रकाशकाकडून सुबक संग्रह निघाला याचे समाधान तर आहेच. पण त्याशिवाय म्हणजे मराठी कवितेची सर्वच बाबतींत वरची पट्टी लागली असताना, इतकेच नव्हे तर, तशी परंपराच तयार झाली असताना; या लाटेत न सापडता, आपण आपला सूर शोधीत जायचे या वृत्तीने मी कविता लिहिली.'

'कालस्वर' या शीर्षकाबद्दल विचारणा केली असता ते म्हणाले, "प्रत्येक क्षणी माणूस बदलत जातो, नवा होत जातो. प्रत्येकाचेच असे होते. निर्मितीच्या क्षणीही माझ्या अंतर्मनात असलेला अभ्यासक व आस्वादक, स्वतःचीही याच दृष्टीने छाननी करू लागतो. अशाच शोधात माझ्या असे लक्षात आले, की आपल्या बहु-संख्य कवितांत कालाची जाणीव प्रकर्षाने प्रकट होते. त्याची विविध रूपे माझी कविता अधिक सहजपणे शब्दबद्ध करू शकते. इतकेच नव्हे तर कथासंग्रहाचेही नाव 'आला क्षण...गेला क्षण...' असेच आहे व टीकालेखनही (छंद अंकातील) 'अनुभवाची गतिमानता' अशाच शीर्षकाने. हे माझ्या उशीरा लक्षात आले, पण म्हणून 'कालस्वर' हे शीर्षक सहज सुचले.

आपले अनेक अनुभव कालाच्या जाणीवेनेच बांधलेले असतात. एकटेपणाची व्यथा, एकांतातील असोशी, प्रीतिभावनेतील गुंतागुंतीच्या छटा, वाट पहाणे, हातातून निखळून गेलेल्या क्षणांबद्दल खंत करणे, मृत्यू, समय, कालचक्र अशा कितीतरी गोष्टींच्या साहाय्याने जाणवणारा कालाचा गूढगंभीर सूर अंतःकरण व्यापून टाकतो. एक अनामिक धुके मनाभोवती पसरू लागते. एकांताची नशा हे गूढ अधिक गडद करते. सखीच्या आठवणी, तिचा दुरावा, तिचे विभ्रम, तिचे नसलेपण मनाला हळुवार बनवते. कितीतरी ज्ञात अज्ञात, छोट्यामोठ्या प्रसंगांनी, क्षणांनी मनोभूमिकेत आमूलाग्र बदल होत जातो. कधी कोवळीक, कधी सुन्नता,

कधी सर्वसमावेशकता, तर केव्हा अस्तित्वाचाच शोध. कालाच्या संदर्भात ही अदृश्य पडझड सातत्याने चालूच असते. माझ्या बहुसंख्य कविता अशा आहेत, या जाणीवेनेच मन दुथडी भरून येते आणि मुळातील काव्यात्म भूमिकेत नवनवी भर पडत जाते. मनात घडणाऱ्या अनुभवविश्वाच्या घडामोडीतच काही सुचत जाते, शब्दरूप घेऊ लागते आणि 'कालस्वर' बाह्य शब्दाकार धारण करू लागतो."

'तुम्ही निवडक कवितांचाच संग्रहात अंतर्भाव केल्यामुळे ही जी काळाची जाणीव तुम्ही व्यक्त करू पहात होता, त्यात काही विक्षेप तर आला नाही ना ? की निवडक कवितांतूनही तुम्ही हे साध्य करू शकलात ?'...माझ्या या प्रश्नावर

---

## तू : वेळा

तू : वेळा : भूतकाळची निसटुनिया गेलेली
छायामय झालेली
शांत जळातुन दिसे द्वारका
जळामधी बुडालेली

तू : वेळा : अशी आजची, घनतेतून भरलेली
अंगांगी भिडलेली
अर्ध झाकली, निरभ्र अर्धी
स्वादास्वादातुन कळणारी, उलगडणारी
क्षणाक्षणांच्या गंध-कळांतून फुलफुलणारी
दोन दिशांच्या आरस सरशी
बिंबुन अनंतलेली

तू : वेळा : दूर उभीशी मुग्ध मानिनी
धुक्याआड दडलेली
झुळझुळणाऱ्या विरल अंबरी लपेटलेली
उरात ठेउन अद्भुत काही अबोलणारी
गूढ कामिनी !
उसळे रक्तमधले मीपण हात लांबवुन
विवस्त्र करण्या निऱ्यास झटुनी घेता ओढुन
निरीनिरी उकलते क्षणांची
आणि तरीही तुला पुरवितो
वस्त्रे कुणितरी गूढ क्षणांची...

तू : वेळा–

'कालस्वर' (पृष्ठ ११).

---

शंकर वैद्य एखादी समस्या स्वतःशीच उकलावी अशा संथ आवाजात म्हणाले, " एकतर सगळया कविता घेण्यात काही गंमत नव्हती. म्हणजे संग्रह कदाचित ' मोठा ' झाला असता पण नुसताच आकाराने ' मोठा ' झाला असता." या कालाच्या जाणीवेची प्रा. वैद्यांच्या कवितेतून जी स्वरूपे आढळली, मला स्पर्श करून गेली, त्या कालगतीचा मी उलगडा करतो. तो असा–

काळ हा विविध स्वरूपात आपल्या व्यक्तित्त्वाला लपेटून असतो. पण त्याची काही प्रमुख रूपे तरी श्री. वैद्य त्यांच्या कवितांत धरू शकले आहेत.

काळ म्हणजे मृत्यू. या अपरिहार्यतेला प्रत्येकाला सामोरे जावेच लागते. ' परीटदादा ' आणि ' आधार ' या दोन कविता प्रामुख्याने मृत्यूची झेप, आणि अप्रतिहत गती व्यक्त करणाऱ्या आहेत.

> " एका फांदीच्या बारीक देठाला सूर्यमालेचा तुरा
> आकाशाची अनंत प्रतिबिंबे पहावी एका नजरेत "
>
> एवढे मोठे ! अबब !'
>
> " माझे शरीर चपापले आहे
> ' गंजीफ्रॉकवरील ' तीन अक्षरे
> दोघांनीही हेरली आहेत !"

' परीटदादा ' मधल्या या ओळी अधिक सूचकतेने निराळयाच पद्धतीने ' आधार ' कवितेतूनही अभिव्यक्त होतात.

काल म्हणजे ' वेळ ' (Time) या अर्थाने, खूप कवितांतून शब्दबद्ध केला गेला आहे. ' तू वेळा ', ' एक भयाचे नगर ',' कुहूकुहू ', ' एक खाष्ट म्हातारा ',' कितीक वर्षे ' आणि ' बोहारीण ' या कवितांचा खास करून निर्देश करावा लागेल.

भवतीभोवतीचे सगळे विश्व या नव्या जाणीवेने चैतन्यमय झालेले दिसते. ' क्षणाक्षणाच्या गंध-कळांतून फुलफुलणारी ' आणि ' उरात ठेवून अद्भुत काही अबोलणारी ' सखी ' गूढ कामिनी ! ' वाटते. ' एक भयाचे नगर ' ' डोंगरावरून टांग टाकून ' येणाऱ्या ' अदृश्य पहारेकऱ्याच्या पाऊलठशासोबत मनात मडद गडद भिनत जाते. ' कुहूकुहू 'च्या ' सतत ताला 'तील लाट ' आर्त मनाचा काठ भिजवित येते ' आणि जाणवते ती केवळ ' काळाची चव गोडच गोड. ' कधी ' बोहारणी ' च्या वेषात तर केव्हा ' खाष्ट म्हातारा बनून हा काल आपल्यावर सतत जागता पहारा करीत असतो.

कालगती (Speed) या अर्थाने ' बादली ' आणि ' यायची तू ' या दोन कवितांचा आस्वाद घेता येईल. अनेक जन्म ही ' बादली ' ओढण्याचे काम चालू असते. ' शेवटी ' ' काय ' भरून येणार आहे, वरती ' काय ' वरती अजून लक्ष खिळलेले ! असते. ' अंदाज पुरते हुकतात ' आपल्या हातातून ' मीही निसटलेला ' ही जाणीव

विकल करते आणि ' स्वप्नामागून स्वप्ने मावळली सारी ' एवढा कल्लोळ तेवढा उरतो. पण या गतीला डौल आहे. उरात कळ असावी-नसावी, अशा वेळी;

" यायची तू : फुले मंद कालाचे कमल
माझ्या मनाचाच मला आला परिमल "

अशा तृप्त ओळी कविहृदयातून स्फुरतात.

काळाचा एक आणखीही खास अनुभव आहे आणि तो म्हणजे प्रतीक्षा (Awaiting) करणे. ही प्रतीक्षा भंग होणाऱ्या स्वप्नांच्या साधण्याची असेल, आपल्या प्रिय व्यक्तीची असेल किंवा ' कसची असेल ' त्याचे भानही नसेल; ... जेव्हा एकाग्रतेने बघण्याचे काम चाललेले असते, तेव्हा ' बघता बघता माझे डोळे खिडकी होतात. '

" उन्हे उडवतात केशराची बोटे माझ्या खिडकीवर
चंद्र उगवतो सायंकाळी जुळवीत दुवे अंगभर "

अशा विलक्षण अनुभवातून मन जात असते. ' आणि अस्तित्वास जाणवत राहतो. धरण फुटलेल्या कालाचा रंग-रूचिहीन प्रवाह..." टर्फलातून ' कणी-कोंडा ' वेचावा तसे मन वाट बघते पण " प्रत्येक क्षणी निराशेवाचून आत कुणी आले नाही. " हेच सत्य उलगडते आणि उद्‌गार येतात,

" वाट पाहता पाहता पुन्हा जन्म हा ओसरे,
वाट पाहता, शिणले-पुन्हा मागे मन उरे "

काळाची जाणीव म्हणजे ' भूतकाळ ' या अर्थानेही होते. गेलेल्या क्षणाची एक स्मरणसाखळी मनात सांधत जाते. मन आत गुंततच जाते आणि ' तिळा उघड ' म्हणण्याचा मंत्र विसरावा अशी ती सांज मनातला कप्पा नि कप्पा व्यापून टाकते.

शंकर वैद्य यांच्या काही कवितांत स्त्रीपुरुषाच्या अंगलगीच्या—कामभावनेच्या आविष्करणाच्या—आहेत. ' अभिषेक ', ' ती न्हाते ', ' नावाडी ', ' तो एक अनुभव स्वप्नातला ', ' विस्तवापरीस होतो धुमसून ' यांचा उल्लेख करावा लागेल. अत्यंत तन्मयतेने आणि कलात्मकतेने एका अवघड अनुभवाला वैद्यांनी शब्दरूप दिले आहे. (' थेंब ' आणि ' पक्षी ' या कवितांतूनही या अर्थाची सूक्ष्म सूचना येऊन जाते.) कसा तुला जपू, मला मी सांभाळू ! आता जळू-जाळू एकठाया ! ' ही ठाय ' लय ' हीच त्या कवितांच्या खरेपणाची व उत्कटतेची निशाणी आहे.

' तोल ' ' दोन ' ' नाव न घेताच ' या कविता कोडयाच्या पद्धतीच्या उखाणेवजा आहेत. त्यातही तोल कविता अत्यंत बंदिस्त आहे. बुद्ध किंवा महावीराची मूर्ती पाहिल्यानंतर ' त्रिकोणावर त्रिकोण उभे तीन ' या उद्‌गारातील रंगत त्या कवितेच्या सूक्ष्म वाचनानंतर जाणवते आणि मनातील सौंदर्याच्या तारा झंकारून उठतात.

## खिडकी

त्या उंच इमारतीवरली ती तुझी खिडकी
वाटते तू तेथे येशील ... दिसशील
पहाटेचे धुके तुझ्या खिडकीभोवतीच घोटाळते
उन्हाची दृष्टी तिष्ठते कवडसे होऊन
चंद्राचे कबूतर घुमत राहाते वळचणीत;
अंधाराच्या डोहातून –
पूर्वेचे तांबडे फुटते अनिवार पोटतिडिकेने
वाटते तू येशील ... दिसशील
मी बघत असतो एकाग्र
बघता बघता माझे डोळे खिडकी होतात
पहाटेचे धुके तिच्या काचांवर ओलावते
चंद्र उगवतो खिडकीभर घासत बुबुळांवर
साचून अडतो अंधार पापण्याभरून, क्षितिजेभरून
तडकणाऱ्या काचेवरल्या रेघेसारखी
सकाळची पूर्व या डोळ्यांतच उकलते
मी बघत असतो एकाग्र
आणि कधी तू खिडकीत येतेस माझ्या–माझ्यासाठी
पहाटेचे लडिवाळ धुके भोवती भोवती करते माझ्या
उन्हे उडवतात केशराची बोटे माझ्या खिडकीवर
चंद्र उगवतो सायंकाळी जुळवीत दुवे अंगभर
साचलेल्या अंधाराला गोड कळा कमल-जन्मला
पहाटेच्या
तू नसतेस ...
मी बघत असतो एकाग्र, विस्कटतानाही
अवकाश उरतो एक घारा डोळा आक्षितिज
भावली नसलेला !
आणि अस्तित्वास जाणवत राहातो
धरण फुटलेल्या कालाचा रंग-रुचिहीन प्रवाह
झोंबणारा
जन्मांचा थर थर धुवून नेणारा ...

'कालस्वर' पृष्ठ १९–२०

## पान

जन्मलो आपण भिन्न भिन्न काळी
कसर राहिली मुळातच
आगेमागे केव्हातरी तुटायाचे
मरण उद्याचे आज ठाके
पेरताना बीज मनही पेरले
जीवाने वाढले दोघे एका
कशी तोडायची नाजूक मुळे ही
लागता बोटही कासाविशी
बारावर काटा पडे त्याचा टोल
निसटे आभाळ उरातुनी
नको होता क्षण दिसे दौड त्याची
नजर वैऱ्याची दुरूनिया
एका क्षणापोटी देठ उगवला
वाढता जुळला सुटा काळ
तोच क्षण आज दैव मागो आले
प्राणाशी पोचले हात त्याचे

आवंढयाच्या आड जीव हा अडला
करून मोकळा किती दावू ?
शब्दाच्या, गळ्याच्या शिरा दाटलेल्या
पोटीचा उमाळा पोटी उरे
दाटले उरी ते शब्दावीण पंगू
भाव ऊर लंघू जाता द्रवे
उरल्या शब्दांच्या लक्तरांमधून
ओल घे जाणून अतरीची–
दूर सार पृथ्वी सूर्य ग्रह तारे
नेत्रां दिसणारे सारे सारे
तळहाताचे या उरो फक्त पान
त्यात माझे मन स्पंदणारे
हातावरी ये त्या सानुली बनून
शरीर घेऊन इवलेसे
म्हणीन ना तुला तेव्हा फक्त 'बाळ' ?
... अर्थाचे आभाळ त्यातले घे

'कालस्वर' पृष्ठ ३८–३९.

---

प्रा. शंकर वैद्यांसोबत रंगलेली ही बैठक तीन तास पसार झाल्याचे सांगत होती. 'तुम्हाला आवडणाऱ्या तीन कविता कोणत्या व का ?' असा शेवटचा प्रश्न मी वैद्यांना विचारला. थोडाही विलंब न लावता ते म्हणाले– ' 'तू : वेळा', 'खिडकी' आणि...' पुढे बोलू न देताच मी त्यांना थांबविले व म्हटले, 'पान'...!' त्यांनीही टाळी देत, 'तीच कविता मी सांगणार होतो' म्हणतच मी अडवलेले वाक्य पूर्ण केले. एका कवितेबाबत आमचे एकमत झाले होते. माझ्या प्रश्नाचा उत्तरार्ध तेवढा अनुत्तरित उरला होता. 'का आवडतात ?' माझे औत्सुक्य लक्षात घेत ते म्हणाले, 'घेऊ द्या ना रसिकांना त्यांचा आस्वाद प्रत्यक्षातच !' आणि हे मलाही पटले.

बैठक संपली. झालेल्या गप्पा अजून आठवत होत्या. मलाही विशेष आवडलेल्या त्यांच्या 'पान' या कवितेमधील–

" उरल्या शब्दांच्या लक्तरांमधून
ओल घे जाणून अंतरीचो. "

या ओळी घोळवीतच मी बाहेर पडलो. □

कालस्वर : शंकर वि. वैद्य : पॉप्युलर प्रकाशन मुंबई : किंमत ३ रुपये

# द डेझर्ट फॉक्स



**झुंजार सेनानी रोमेल याच्या वाळवंटी युद्धाची ज्यूल्स आर्चर यांनी सांगितलेली कथा...**

## निवेदन : अनंत भावे

जिकडे पहावे तिकडे वाळूच वाळू पसरली होती. आकाशात वाळूचे स्तंभ उभारले जात होते. सारे वातावरण धूसर झाले होते. त्या वाळूच्या लोटांमधून एक विचित्र प्राणी रोरावत पुढे चाल करीत होता. अर्धमानव आणि अर्धरणगाडा असे त्याचे स्वरूप होते. रणगाड्यात उभा असलेला देह अर्विन रोमेल या विख्यात जर्मन सेनाधिकाऱ्याचा होता.

रोमेलच्या रणगाड्यापाठोपाठ, नव्यानेच उभारलेल्या आफ्रिका कोअरमधील पाचव्या रणगाडा तुकडीचे एकशेवीस रणगाडे धडाडत येत होते. लिबियाच्या या वाळवंटात, वेव्हेलच्या नेतृत्वाखालील आठव्या ब्रिटिश सेनेची ससेहोलपट केली होती त्यांनी. ब्रिटिश सेना त्वरेने काढता पाय घेत होती.

रोमेलच्या रणगाड्याभोवती ब्रिटिश तोफगोळे अविरत बरसत होते. जनरल रोमेलला त्यांची कदर नव्हती. नुकत्याच जर्मन फौजा, भरतीच्या लाटांसारख्या फ्रान्समध्ये घुसल्या होत्या. पहाता पहाता फ्रान्सचा त्यांनी पाडाव केला होता. या मोहिमेतच रोमेलच्या पराक्रमाला महत्कथेचे अद्भूत वलय प्राप्त झाले. रोमेल अजिक्य आहे, अशीच आख्यायिका निर्माण झाली.खुद्द रोमेलचा या आख्यायिके-

वर गाढ विश्वास होता. एकदा तो आणि जनरल फॉन लांज जोराच्या तोफमाऱ्यात सापडले असता रोमेल लांज याला म्हणाला होता, " शक्यतो माझ्याजवळ रहा; कारण गोळ्यांचा काही परिणामच होत नाही माझ्यावर. " त्यामुळे रणगाड्याच्या युद्धात आपला रणगाडा आघाडीवर ठेवण्याची, इतकेच नव्हे तर ऐन धुमश्चक्रीत रणगाड्यात ताठ उभे राहून लढाईचे सूत्रचालन करण्याची यत्किंचित् भीती रोमेलला वाटत नसे.

पळणाऱ्या या ब्रिटिश सेनेला आपण उत्तर आफ्रिकेतून हुसकावून काढू, सुवेझ कालवा काबीज करू, असा आत्मविश्वास रोमेलला वाटत होता. वास्तविक ही जबाबदारी हिटलरने मुसोलिनीवर सोपविली होती. कारण हिटलर स्वतः त्यावेळी, झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, फ्रान्स पादाक्रांत करण्यात आणि आक्रमण करण्यापूर्वी बाँबफेक करून ब्रिटनची चाळण करण्यात गुंतला होता.

परंतु मुसोलिनी ही जबाबदारी पार पाडू शकला नाही. त्यामुळे हिटलरचे सारे वेळापत्रक बिघडले. मार्शल ग्राझिआनीच्या फौजेचा पाठलाग करून ब्रिटिशांनी तिला इजिप्तमधून हुसकावले होते. तिची लिबियामध्येही पीछेहाट झाली होती. एक लाख तीस हजार इटालियन सैनिक ब्रिटिशांनी कैद केले होते. मुसोलिनीने हिटलरकडे मदत मागितली. कारण आता वेव्हेलची नजर ट्रिपोलीकडे वळली होती; आणि रसद पुरवठ्याच्या दृष्टीने ट्रिपोली हे अत्यंत मोक्याचे ठिकाण होते.

हिटलरने रोमेलला आमंत्रण पाठविले आणि विचारले, " मुसोलिनीवर सोपविलेली आणि त्याला न पार पाडता आलेली, कामगिरी तू पार पाडू शकशील काय ? काही उत्तर देण्यापूर्वी एक गोष्ट मी आधीच स्पष्ट करतो–उत्तर आफ्रिकेमध्ये दोन किंवा तीन डिव्हिजनपेक्षा अधिक सैन्याची दीर्घ काळ व्यवस्था ठेवणे शक्य होणार नाही. "

" मला फक्त पाचवी पँझर तुकडी आणि पाचवी लाइट डिव्हिजन द्या. " रोमेलने लगेच उत्तर दिले, " शत्रूकडून लुटलेल्या ज्वलनावर, रणगाड्यांवर आणि अन्नावर सहज मोहीम चालवू शकेन मी. "

१९४१ सालच्या बारा फेब्रुवारीत रोमेल विमानाने ट्रिपोली येथे आला. तोपर्यंत वेव्हेलने बेंघाझी काबीज केले होते. इटालियन सैन्याचा धुव्वा उडविला होता. आणि ट्रिपोलिटानियापर्यंत दौड मारली होती. ग्राझिआनीच्या सैन्याचे नीतिधैर्य संपूर्ण लयाला गेले होते. परंतु त्रेचाळीस वर्षांच्या रोमेलचे आगमन झाले आणि त्यांना नवा हुरूप लाभला.

## झंझावाती लढाई

आल्याआल्या रोमेलने ब्रिटिशांची विजयी आगेकूच थांबविली–आणि तीदेखील केवळ एक हूल देऊन. त्याच्या जर्मन तुकड्या यायला अजून अवधी होता. तेव्हा ट्रिपोलीपासून तीन मैलांवर असलेल्या इटालियन कारखान्यांना त्याने प्रचंड संख्येने

बनावट रणगाडे बनविण्याचा हुकूम सोडला. हवाईमार्गे टेहळणी करणाऱ्या ब्रिटिशांना हे रणगाडे रोमेलच्या आफ्रिका कोअरचेच आहेत असे वाटले आणि दूरदृष्टीने त्यांनी आपली आगेकूच थांबविली !

त्यानंतर पाचव्या लाइट डिव्हिजनचे थोडेसे रणगाडे येताच रोमेलने एकदम आक्रमक पवित्रा घेतला. त्यामुळे प्रचंड जर्मन चढाईला लवकरच प्रारंभ होणार आहे, अशी ब्रिटिशांची समजूत झाली. इटालियन सैन्याचा पाठलाग करत करत ब्रिटिश फौजा इतक्या दूर आल्या होत्या, की त्यांच्या पुरवठ्याची मोठीच समस्या उभी राहिली होती. त्यामुळे संभाव्य जर्मन चढाईला प्रतिकार करण्याचा विचार सोडून ब्रिटिशांनी पाऊल मागे घेतले.

वास्तविक वेव्हेलविरुद्ध चढाई मेपर्यंत करू नये, अशी सूचना हिटलरने रोमेलला दिलेली होती. कारण त्या सुमारास रोमेलने मागितलेल्या दोन डिव्हिजनच्या मदतीला पंधरावी पँझर डिव्हिजनदेखील हिटलर पाठवू शकणार होता. परंतु बेदरकार रोमेलने, अवघ्या दोन डिव्हिजननिशी, एकतीस मार्चलाच वेव्हेलविरुद्ध जोराची चढाई सुरू केली.

रोमेलच्या चढाईने जर्मन युद्धनेते चकित झाले; इतकेच नव्हे तर खुद्द ब्रिटिशांनाही आश्चर्य वाटले. आपल्या कृतीचे समर्थन कधीतरी रोमेलने पुढीलप्रमाणे केले होते– " ब्रिटिशांना विरोध झाला नसता तर, मला वाटते, कदाचित् त्यांची आगेकूच चालूच राहिली असती. परंतु आणखी लढाई करावी लागेल असे दिसताच आक्रमक पवित्रा घेण्याऐवजी, थोडे थांबून पुरवठ्याची व्यवस्था ते पक्की करतील असे मला वाटले. यामुळे मलादेखील आपली ताकद वाढवायला वेळ मिळणार होता. "

रोमेलच्या झंझावती चढाईला कल्पनातीत यश आले. भयचकित झालेल्या ब्रिटिशांनी जिंकलेली ठाणी भराभर सोडून दिली. रक्ताची चटक लागलेल्या रोमेलने ब्रिटिशांना थोडीदेखील उसंत मिळू दिली नाही. त्याने ब्रिटिशांना लिबियामधून हुसकावून लावले.

रोमेलच्या तडफदार विजयाने सारे जग विस्मयचकित झाले. १९४० सालच्या फ्रान्सवरील चढाईत रणगाड्याच्या युद्धाचा मोजके तीन महिने अनुभव मिळालेल्या या तरुण जर्मन सेनानीने रणगाडा दलाच्या हालचालींवर एवढे प्रभुत्व मिळवावे याचे जर्मन आणि ब्रिटिश लष्करी तज्ज्ञांना आश्चर्यच आश्चर्य वाटले.

रोमेलच्या या यशाची गुरुकिल्ली फ्रान्सची मॅजिनो तटबंदी उध्वस्त करताना त्याने काढलेल्या उद्‌गारात पहायला सापडेल : " खरं तर गोष्ट अगदी साधी आहे. मुख्य म्हणजे भरपूर आग ओकायला पाहिजे. तोफा, बंदुका, बाँबगोळे असा सर्व दिशांना अग्निवर्षाव झाला पाहिजे. आणि तो होताना सारखे पुढे आणि पुढेच जायला पाहिजे. आपल्या रणगाड्यांवर मारा होऊन त्यातले काही निकामी होण्याआधीच शत्रूच्या ताब्यात असलेल्या प्रदेशावर जोराचा हल्ला चढविला तर बहुधा विजय मिळण्याची शक्यता असते. "

रोमेलच्या यशाचे आणखी एक रहस्य म्हणजे कसल्याही अडचणींची तमा न बाळगण्याची त्याची वृत्ती. आपल्या अधिकाऱ्यांनी आपल्यासारखे असावे अशी त्याची इच्छा असे. त्याच्या स्वतःच्या गरजा अत्यल्प होत्या. धैर्य अफाट होते. सोशिकपणाला सीमा नव्हती. विजयासाठी कितीही किंमत द्यावी लागली तरी ती कमीच असते, अशी त्याची श्रद्धा होती. आपल्या हाताखालच्या माणसांकडून अशक्य ते शक्य करण्याचा त्याचा प्रयत्न असे. या बाबतीत तो स्वतःचाही अपवाद करीत नसे. असे कडवे नेतृत्व लाभल्यामुळे आफ्रिकेतील युद्धाचा रंग एकदम पालटला.

वाळवंटातून आगेकूच करताना, आपली रणगाड्यांची मर्यादित संख्या शत्रूला फार मोठी भासावी यासाठी रोमेलने एक साधी युक्ती योजली होती. तो कृत्रिम रीतीने वाळूचे प्रचंड लोटच्या लोट उठवीत असे. त्यावरून बांधलेला रोमेलच्या रणगाड्यांच्या संख्येबद्दलचा ब्रिटिशांचा अंदाज चुकत असे, हे सांगायलाच नको. रोमेलला घाबरून वेव्हेल पळत सुटला. ज्या ठिकाणी ब्रिटिशांनी प्रतिकार करण्याचा यत्न केला त्या ठिकाणी रोमेल एखाद्या बिंदूवर आपली शक्ती केंद्रित करीत असे; तेथे धडक मारून वेगाने पुढे घुसत असे; आणि ब्रिटिशांचा प्रतिकार उधळून देत असे.

## अनेक आख्यायिका

रोमेलच्या अद्भुत पराक्रमामुळे त्याच्याबद्दल अनेक सुरस आणि चमत्कारिक आख्यायिका निर्माण झाल्या होत्या. त्यातील एका आख्यायिकेप्रमाणे रोमेल मुळी कधी झोपतच नसे. आदल्या दिवशीच्या घनघोर लढाईनंतरही सकाळी साडे सहा वाजता आपल्या आणि शत्रूच्या परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी रोमेल न चुकता हजर रहात असे. कधी कधी ही टेहेळणी स्वतःच उडविलेल्या विमानातून तो करीत असे. प्रसंगी होणाऱ्या वाळूच्या वादळातून विमान उडविणे ही गोष्ट सोपी नव्हती. इतरवेळी एका ब्रिटिश रणगाड्यात बसून टेहेळणी करण्याची त्याची पद्धती होती. त्याच्या नजरेतून काही सुटत नसे.

एखादा मोर्चा व्यवस्थित बांधलेला नसला किंवा सुरुंगपेरणी नीट केलेली नसली तर संबंधित अधिकाऱ्यांना रोमेलकडून जबरदस्त तंबी मिळत असे. शत्रूला आपले सैन्य कसे दिसते हे जाणून घेण्यासाठी कधी कधी तो शत्रूच्या अगदी समीप जाऊन आपल्या सेनेची पाहणी करीत असे. त्याच्या विमानावर आणि रणगाड्यावर पुन्हा पुन्हा मारा होत असे; पण त्याची पर्वा न करण्यात त्याला एक वेगळेच समाधान मिळत असावे. त्याच्याशेजारी बसणारे साथीदार, शत्रूच्या माऱ्याला नियमितपणे बळी पडत असत; परंतु त्यामुळेदेखील रोमेलचे धैर्य जरासुद्धा विचलित झाले नाही. युद्धाच्या ऐन धुमश्चक्रीतही, सावधगिरी म्हणून रोमेल कधी पिछाडीला राहिला नाही. त्याच्या बेपर्वाईबद्दल तक्रार करणाऱ्या अधिकाऱ्यांना तो सांगत असे, "कोणत्याही दर्यासारंगाला एकही नाविक युद्ध किनाऱ्यावरून जिंकता आलेले नाही."

परिस्थितीवर पक्की हुकमत असल्यामुळे धाडसी आणि तत्पर निर्णय घेणे रोमेलला शक्य होत असे. त्या उलट स्थिती ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांची होती. सल्ला-मसलतीमध्ये त्यांचा बहुमोल वेळ खर्च होई. तोपर्यंत रोमेल संधीचा फायदा घेत असे किंवा आमिष चुकवत असे. लढाई ऐन भरात असताना तो तोंडीच हुकूम सोडत असे; आणि त्याचे हे हुकूम रेडिओवरून इतर अधिकाऱ्यांना प्रक्षेपित केले जात.

रोमेलच्या पोतडीत अनेक युक्त्याप्रयुक्त्या होत्या. कधी कधी वेव्हेलच्या सैन्यावर एकाच वेळी अनेक ठिकाणी तो फसवे हल्ले चढवीत असे. या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी वेव्हेल आपल्या तुकडीची छोट्या छोट्या गटात विभागणी करी. असे झाले म्हणजे मात्र रोमेल अकस्मात, सर्व शक्तीनिशी एका गटावर तुटून पडत असे, आणि मग क्रमाक्रमाने एकेका गटाचा फडशा पाडत असे.

प्रबळतर सेनेविरुद्ध लढण्याचा प्रसंग अकस्मात आलाच तर पहाता पहाता अदृश्य होण्याचे कसबही रोमेलला साधलेले होते. परिस्थिती त्याला प्रतिकूल असेल त्यावेळी तो सरळ लढाई टाळत असे. एकदा युद्धाचे आव्हान स्वीकारल्यानंतर आपल्या रणगाड्यांपुढे तोफांची एक प्रचंड फळी तो उभारीत असे, या तोफांनी ब्रिटिश रणगाड्यांवर आघात केले म्हणजे पुढे सरकून रोमेलचे रणगाडे तोफांचे अपुरे कार्य पुरे करीत असत. या प्रयत्नात जखमी झाल्यास तोफांचा आडोसा घेणेही त्यांना शक्य होत असे.

रोमेलच्या चढाईपुढे बाकीची ब्रिटिश ठाणी धडाधड कोसळली तरी नवव्या ऑस्ट्रेलियन तुकडीच्या स्वाधीन असलेले टोब्रुक बंदर मात्र रोमेलशी दोनशे वीस दिवस झुंजत राहिले. या अवधीत जर्मन विमानांनी टोब्रुक शहराची दुर्दशा केली. एका बावन्न दिवसांच्या कालखंडात तर जर्मन आणि इटालियन सेनेने १४३१ लहानमोठे हल्ले टोब्रुकवर केले. त्यात साठ रणगाड्यांनी केलेला एक भीषण हल्ला होताच. परंतु ऑस्ट्रेलियन तुकडीने कशालाही दाद दिली नाही. आश्चर्याची गोष्ट अशी, की ऑस्ट्रेलियन तुकडीने हा प्रतिकार आधी हिरावून घेतलेल्या इटालियन शस्त्रास्त्रांनी केला होता.

" आपले सगळे शत्रू ऑस्ट्रेलियन नाहीत ही प्रभूची कृपाच समजली पाहिजे " रोमेलने उद्गार काढले होते.

## वेव्हेलने केलेला गौरव

या ऑस्ट्रेलियन तुकडीने ज्या स्थिर पद्धतीच्या युद्धाची सक्ती रोमेलवर केली होती त्या युद्धपद्धतीचा त्याला तिटकारा होता. तो म्हणे, " या युद्धपद्धतीत स्पर्धा असते ती मनुष्यनाशाची; उलट धावत्या युद्धात शत्रूची साधनसामग्री नष्ट करण्यावरच सारा भर असतो." शत्रूचा डाव उलटवून त्याची रणगाड्यांची फळी उध्वस्त करण्यासाठी आपल्या रणगाड्यांनी बेगुमान दौड व चतुर हालचाल करणे यात युद्धाची खरी अद्भुत मौज आहे, असे रोमेलला वाटत असे.

सत्तावीस मे १९४१ रोजी रोमेलने इजिप्तच्या सरहद्दीपलीकडील हाल्फाया खिंड काबीज केली. या ठिकाणी वेव्हेल प्रतिहल्ला करील हे त्याने ओळखले होते. त्याला तोंड देण्यासाठी व्यवस्थित दडविलेल्या तोफांची फळी रोमेलने उभी केली. श्वास घेण्याइतपत फुरसत काढणे आता त्याला शक्य होते; कारण दोन महिन्यांहून कमी काळात उत्तर आफ्रिकेच्या एक हजार मैल प्रदेशातून, एक टोब्रुक सोडता, ब्रिटिशांचे संपूर्ण उच्चाटन त्याने केले होते.

परंतु अतिमानवालादेखील प्रश्न आणि अडचणी असतातच. ट्रिपोलीपासून आघाडीपर्यंत रसद आणणे ही रोमेलची सर्वांत मोठी डोकेदुखी होती. पाणी आणि अन्नधान्यासकट पंधराशे टनांची सामग्री त्याला दररोज लागे. टोब्रुक टाळून त्याच्या आघाडीकडे येणारे सामानाचे ट्रक्स् वाळवंटात अनेकवेळा फसत असत. त्यामुळे आवश्यक ती सामग्री शत्रूकडून हिरावून घेण्यावाचून रोमेलला गत्यंतर नव्हते.

इतरही लहानमोठे अनेक प्रश्न होते. कामुक इटालियन सैनिकांनी अरब स्त्रियांवर केलेल्या बलात्कारांचा सूड घेण्यासाठी अरब टोळीवाले इटालियन सैनिकांना ठार मारीत असत. अरबांच्या या अपराधाबद्दल शिक्षा म्हणून साऱ्या अरब जमातींचेच शिरकाण करावे असा हुकुम रोमहून मुसोलिनीने रोमेलला पाठविला. हुकूम पाहून रोमेल क्रोधाविष्ट झाला. जर्मन आघाडीजवळ अरबांनी सशस्त्र उठाव करू नये म्हणून त्यांना पुरेशा मानाने वागविले गेले पाहिजे, अशी सक्त ताकीद इटालियन अधिकाऱ्यांना रोमेलने दिली.

अपेक्षेप्रमाणे वेव्हेलने प्रतिहल्ला चढविला. पंधरा जून रोजी दोनशे पन्नास ब्रिटिश रणगाडे रोमेलची संरक्षक फळी फोडून त्याच्या दीडशे रणगाड्यांवर घसरले. हा संग्राम आठवडाभर चालला आणि त्यात अखेर वेव्हेलचा धुव्वा उडाला. कधी धाडसी आक्रमण, कधी चतुर पलायन, कधी हल्ल्याचा देखावा, कधी छुपे हल्ले, कधी कावेबाज माघार, अशा वेगवेगळ्या पवित्र्यांनी रोमेलने पंच्याहत्तर टक्के ब्रिटिश रणगाडे निकामी केले. त्यासाठी रोमेलने अवघ्या पंचवीस रणगाड्यांची किंमत मोजली होती.

आफ्रिकन कोअरच्या या नेत्याचा 'पराक्रमी, उमदा आणि चतुर शत्रूसेनानी' असा गौरव वेव्हेलने नंतर केला होता. वेव्हेल स्वत: एक कर्तबगार सेनानी होता; परंतु रोमेलच्या विलक्षण कावेबाजपणापुढे त्याचा अगदीच निभाव लागला नाही. रोमेलच्या कावेबाजपणावरून त्याला 'द डेझर्ट फॉक्स' असे टोपण नाव लाभले होते. वेव्हेल अनेक वेळा रोमेलने रचलेल्या सापळ्यात अडकला होता. उलट रोमेलने केलेल्या आकस्मिक हल्ल्यांना तोंड देणे त्याला जमले नव्हते. ज्यावेळी आक्रमण करणे वेव्हेलच्या हिताचे असे त्या वेळी रोमेल त्याला इतका घाबरवून सोडत असे, की वेव्हेल बिचारा आक्रमणाचा बेत रद्द करीत असे.

रणगाड्यांची आपली मर्यादित संख्या लपविण्याची कला रोमेलला चांगलीच

# ए सी सी सीमेंट द्वारा भविष्याची दीर्घकालीन सुखसोय

ए सी सी सीमेंटचा वापर म्हणजे दीर्घकालीन टिकाऊपणाची व काटकसरीची हमीच. ए सी सी सीमेंटने बांधलेले घर कसे स्वच्छ, कोरडे नि आरामप्रद राहते.

पुढील खेपेस बांधकाम करते वेळी ए सी सी सीमेंटचा वापर करा आणि तुमचेसाठी व कुटुंबियांसाठी दीर्घकाल सुखाने राहण्याची खात्रीची सोय करा.




तुम्हांला लाग[illegible] मिळविण्यासाठी तुमच्या नजीकच्या ए सी सी स्टॉकिस्टचा अथवा दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षि कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचा संपर्क साधा.

तज्ञांची मोफत तांत्रिक मदत दि कॉंक्रीट असोसिएशन ऑफ इंडिया, १२१, महर्षि कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचेकडून मिळेल.

**दि ॲसोसिएटेड सीमेंट कंपनीज लिमिटेड**
**दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड**

**ACC**
शेतकऱ्यांचा सखा

CMI 1935

अवगत होती. त्यामुळे शाही विमानदळाच्या टेहळचा विमानांनी केलेल्या हवाई छायाचित्रणावरूनही रोमेलच्या ताकदीचा अचूक अंदाज ब्रिटिशांना लागत नसे. एकदा एका विभागाचे दुबळेपण लपविण्यासाठी रोमेलने आपली वाहने वाळवंटात चोवीस तास फिरती ठेवली, त्यामुळे चाकोऱ्यावर चाकोऱ्या तयार झाल्या. वेव्हेलने याचे छायाचित्र पाहिले आणि रोमेलकडे पुष्कळच रणगाडे आहेत अशी समजूत करून घेऊन त्या विभागापुढील आपल्या विभागाला काढता पाय घेण्याची सूचना दिली.

दुसऱ्या वेळी, रोमेलने एका रणगाड्यांच्या छोटचा तुकडीला आक्रमणाचा आदेश दिला. नंतर त्याच्या लक्षात आले, की या चकमकीत तुकडीतील सहा सोडून सारे रणगाडे निकामी झाले आहेत. पण रोमेल डरला नाही; तो म्हणाला, " आपण वाळूने हल्ला चढवू. " त्याने उपलब्ध प्रत्येक वाहन वाळवंटात गरगरत ठेवले. परिणामी आसमंतात वाळूचे लोटच्या लोट उठले. त्यांच्या आड लपून समोर तोफा डागत हे सहा रणगाडे चाल करून गेले. फार मोठ्या तुकडीने आपल्यावर हल्ला चढविला आहे अशा समजुतीने ब्रिटिशांनी माघार घेतली.

एकदा रोमेल हसत म्हणाला, " मी बहुधा, खऱ्या रणगाड्यांनी जितक्या लढाया जिंकल्या आहेत त्यापेक्षा अधिक लढाया बनावट रणगाड्यांनीच जिंकल्या असाव्यात. "

रोमेलची आणखी एक लाडकी युक्ती म्हणजे काबीज केलेल्या ब्रिटिश वाहनांचा आपल्या दळात केलेला मुक्त उपयोग आणि त्यामुळे उडालेला ब्रिटिशांचा गोंधळ. एकदा असाच ब्रिटिश रणगाड्यात आरूढ होऊन पाहणी करत असता रोमेल चुकून ब्रिटिश रणगाड्यांच्या एका समुदायात जाऊन पोचला. यावेळी रोमेल नेहमी-सारखा रणगाड्यात उभा नव्हता तर आत बसलेला होता.

एक ब्रिटिश सैनिक जवळ आला आणि त्याने हातातील थाळी रोमेलच्या रणगाड्याच्या चिलखतावर आपटली. आपल्याच सेनादळात आपण आलेलो आहो अशा समजुतीने रोमेलने डोक्यावरची झडप उघडली आणि तो उभा राहिला. रोमेल आणि तो ब्रिटिश सैनिक या दोघांचे डोळे एकमेकांना भिडले. मग तो ब्रिटिश सैनिक किंचाळला, " बाप रे ? हा तर साक्षात रोमेल आहे ! " भयाने आणि विस्मयाने तो आपोआप मागे सरला. रोमेलने झडप बंद केली; आणि चालकाने, ब्रिटिशांनी काही हालचाल करायच्या आतच, रणगाडा सुसाट सोडला.

## नवा ब्रिटिश सेनानी

वेव्हेलचा, १९४१ सालच्या उन्हाळ्यात केलेला हा प्रतिहल्ला फसला. तेव्हा चर्चिलने वेव्हेलच्या जागी ऑचिनलेकची नेमणूक केली. नव्या ब्रिटिश सेनानीने प्रथम हालचाल करण्याची वाट पहात रोमेल स्वस्थ बसला. आपल्या सेनेच्या व्यवस्थेकडे त्याने अधिक लक्ष पुरवले. भयानक उन्हाळा, विषारी माशा, ढेकूण,

वाळूची वादळे, यांमुळे सैनिक त्रस्त झाले होते. स्वत: रोमेल त्रस्त होता. त्याचे कारण टोब्रुकचा पाडाव अजून होऊ शकला नव्हता. त्यामुळे पाठीमागून हल्ला होण्याची सतत शक्यता होती. जणू अस्तनीत निखारा ठेवूनच रोमेल वावरत होता.

१७ नोव्हेंबर १९४१ रोजी शेलक्या ब्रिटिश सैनिकांनी रोमेलच्या कार्यालयावर छुपा हल्ला चढवून रोमेलला ठार मारण्याचा यत्न केला. परंतु धूर्त रोमेलने दूरदृष्टीने आधीच आपले कार्यालय बदलले होते. त्यामुळे या प्रयत्नात दुय्यम अधिकारीच मृत्युमुखी पडले.

दुसऱ्याच दिवशी ब्रिटिशांनी प्रचंड चढाईला सुरुवात केली. रोमेलला नष्ट करणे, टोब्रुकमधील सैन्याला साहाय्य करणे आणि ट्रिपोलिटानिया पुन्हा काबीज करणे, ही या चढाईची उद्दिष्टें होती. रोमेलजवळ एक इटालियन आणि दोन जर्मन रणगाडा–तुकड्या होत्या, तर ब्रिटिशांनी पाच चिलखती ब्रिगेडस् युद्धात उतरवल्या होत्या. परंतु ऑचिनलेकने आपल्या तुकड्या विभागण्याची ब्रिटिशांची नेहमीची चूक याही वेळी केली. रोमेलने मात्र आपले बळ एकवटले होते. त्यामुळे ऑचिनलेकची धूळदाण झाली. ब्रिटिश सैन्य पळू लागले. रोमेलने त्याचा पाठलाग आरंभला.

पाठलाग करताना रोमेलचा रणगाडा बंद पडला. रोमेल खाली उतरला. हात दाखवून त्याने आपल्या दळातील एक ब्रिटिश रणगाडा थांबविला आणि त्यात तो स्थानापन्न झाला. ज्या ठिकाणी ब्रिटिश रणगाड्यांचेच प्राबल्य होते. अशा ठिकाणी हा रणगाडा नेण्याचा हुकूम त्याने चालकाला केला. हा आपलाच रणगाडा आहे अशी ब्रिटिशांची समजूत झाली. त्यामुळे हवी तशी भ्रमंती करून उपयुक्त पाहणी रोमेलला करता आली. दरम्यान त्याचे रणगाडे पुढे जाऊन ब्रिटिशांची दाणादाण उडवत होते.

या दुर्दैवी पराभवामुळे, या प्रतिचढाईचे नेतृत्व करणारा सर ॲलन कनिंगहॅम हा ब्रिटिश सेनानी इतका खचला, की आपण थेट ॲलेक्झांड्रियापर्यंत माघार घ्यावी असे त्याला वाटू लागले. त्यामुळे ऑचिनलेकने तत्परतेने कनिंगहॅमच्या जागी सर नील रिची यांची नेमणूक केली, आणि प्रतिचढाई जारी ठेवण्याचा आदेश दिला. रोमेलच्या आफ्रिका कोअरची पुरवठ्याची व्यवस्था व दळणवळण विस्कळीत झाले असावे हा ऑचिनलेकने केलेला तर्क सर्वस्वी खरा होता.

त्यामुळे सर्व शक्तीपणाला लावण्याचे त्याने ठरविले. टोब्रुकमधून बाहेर पडून तुकड्यांनी रोमेलच्या पिछाडीवर मारा करावा असाही आदेश त्याने दिला. दोन्हीकडून होणाऱ्या हल्ल्यांच्या चिमटचात पुरता सापडण्यापूर्वीच रोमेलने चपळाईने आपले सैन्य मागे घेतले. या वेळी, एकदा, रोमेलचा रणगाडा कुशीवर कलंडला आणि जळू लागला. रोमेलचे भाग्य संपले, हा मृत्युंजय सेनानी मृत्युमुखी पडला, असेच लढाईच्या धाईगर्दीत, काही काळ सर्वांना वाटले. परंतु रोमेल सुखरूप होता.

रोमेलने ऑचिनलेकच्या प्रतिचढाईला शर्थीने तोंड दिले. पण त्याचे बळ मर्यादित

होते. अनेक दिवस, अपुऱ्या विश्रांतीनिशी केलेल्या लढाईमुळे त्याचे सैनिक दमले होते. उलट ऑचिनलेक ताजेतवाने ब्रिटिश सैन्य रणांगणावर उतरवत होता. त्यामुळे माघार घेण्यावाचून गत्यंतर नाही हे रोमेलला कळून चुकले. ब्रिटिशांकडून जिंकलेला सारा वाळवंटी प्रदेश पुन्हा त्यांना परत देताना रोमेलच्या मनाला असंख्य यातना झाल्या. परंतु युद्धामध्ये कधी पडतेही घ्यावे लागते हे सूत्र रोमेल जाणत होता. त्यामुळे माघार घेताना हानी कमीत कमी कशी होईल याकडे त्याने लक्ष पुरवले.

सोळा डिसेंबर १९४१ रोजी आफ्रिका कोअरच्या या माघारीला सुरुवात झाली. हे मोठे कठीण, धोकादायक आणि जोखमीचे काम होते. रोमेलजवळ ज्वलन आणि दारुगोळा तुटपुंजा होता. हवाई साहाय्य बिलकुल नव्हते. त्याउलट आवश्यक त्या साऱ्या गोष्टी ब्रिटिशांकडे होत्या. रोमेलचे बहुतेक दुय्यम अधिकारी मारले गेले होते, जखमी झाले होते वा काविळीने टेकीला आले होते. अन्नाचा तुटवडा होता. इटालियन सैन्य मोठ्या संख्येने शरणागती पत्करत होते. माघार घेणाऱ्या जर्मन आणि इटालियन सैनिकांवर ब्रिटिश विमाने बॉंबवर्षाव करीत होती.

अकरा जानेवारीपर्यंत रोमेलची थेट एल् अघीलापर्यंत पीछेहाट झाली होती. जर्मन व इटालियन संयुक्त सैन्यापैकी साठ टक्के सैन्य गारद झाले होते. आफ्रिका कोअर मात्र सुदैवाने अर्धेअधिक बचावले होते. इटालियन सैनिक जर्मन सैनिकांवर संतापले होते. माघार घेताना, जर्मन सैनिकांनी सारी वाहने बळकावली होती, आणि त्यामुळे इटालियन सैनिकांना पायी फरफटत यावे लागले होते, असा इटालियन सैनिकांचा आरोप होता. रोमेलच्या ४१२ रणगाड्यांपैकी ३८६ भस्मसात झाले होते. १००० पैकी ८०० विमाने त्याने गमावली होती.

**[ पूर्वार्ध समाप्त : उत्तरार्ध पुढील अंकी ]**

---

## मुंबईकरांना हैराण करणारा प्रश्न

पृष्ठ ११ वरून

प्रमाणात का होईना सोडविण्यासाठी नियोजन मंडळाने काही योजना आखली आहे पण त्यासाठी प्रचंड पैसा लागणार आहे. त्यात अनेक वर्षे जाणार काहीतरी तावडतोबीने योजना कार्यान्वित केल्या गेल्या पाहिजेत तरच तरणोपाय आहे. याबाबत एक कल्पना येते ती अशी. कोचीन, वेलिंग्टन बेट व अर्नाकुलम या एकाच शहराचे भाग असलेल्या पण पाण्याने विभागलेल्या शहरात फेरी बोट वाहतूक उपलब्ध आहे. ही वाहतूक कार्यक्षमपणे चाललेली आहे. हे तिन्ही भाग निरनिराळ्या पुलांनी जोडलेले आहेत पण त्यासाठी वळसे घेऊन जावे लागते वेळ जास्त जातो. समोरासमोर असलेल्या ठिकाणी जाण्यासाठी त्यामुळे बराच वेळ लागतो पण फेरी बोट वाहतुकीमुळे थोड्या पैशात पाच दहा मिनिटांत तेथे पोचता येते. मुंबईच्या पूर्व किनाऱ्यावरील काही भागातून फोर्टकडे येण्यासाठी अशी काही योजना शक्य झाली तर ती वाहतूकीचा ताण कमी करून त्यात जलदपणाही आणू शकेल. □ □ □

चिमूरचा लढा आणि मी.... पृष्ठ २३ वरून

आम्ही क्रांतिकारक बनलो होतो. त्यामुळे मृत्यूचे दुःख तर आम्हास होतेच; पण दुःख जास्त वेळ उगाळत बसणे आमच्या वयाला, प्रकृतीला आणि त्यावेळच्या हवेला कबूल नव्हते. तिसऱ्या की चौथ्या दिवशी चांद्याचे कोतपल्लीवार–तेही त्या-वेळी जेलमध्ये होते–यांच्याकडून जेलरच्या खास परवानगीने आम्हाला 'निरोपाची मेजवानी' देण्यात आली. आमच्या पाच तुकड्या करून त्या नागपूर, जबलपूर, रायपूर, अकोला व अमरावती येथील कारागृहांत फाशी व जन्मठेप भोगण्यासाठी पाठविण्यात यावयाच्या होत्या. मला नागपूर तुरुंगात फाशी देण्यात येणार होती. रेल्वेच्या खास डब्यातून आमची रवानगी झाली ही वार्ता कानोकानी सर्वत्र पसरली होती. आणि लोकांच्या झुंडीच्या झुंडी प्रत्येक स्टेशनवर लोटल्या. लोकांनी इतकी फळे व मिठाया दिल्या, की खाणे झाले नाही. 'तुम भी खाव' म्हणून पहारेकऱ्यांना आम्ही अक्षरशः जबरदस्तीने पोट फुटेतोवर भरवले 'आधी खाऊन घ्या' वरती तुमच्या नशिबी नाही.' अशी तंबीही दिली.

## फाशीच्या खोलीत

नागपूर जेलमध्ये आल्यावर मला फाशीच्या खोलीत ठेवण्यात आले तेव्हाच तुरुंग म्हणजे काय असते याची कल्पना आली. त्या ठिकाणी भकास भिंती, वेडावणारा तो एकच एक जाळीदार झरोका आणि मध्ये मरणाच्या सावलीबरोबर एकटे एक आपण. आपण जगावेगळ्या ठिकाणी येऊन पडलो याचे भान खरे तेव्हा झाले. अन्न आले. भातात अळ्या, भाजीत किडे, किटकूर. मला भडभडून आले. हे खायचे नाही असा निश्चय करून मी ते बाजूला सारले.

जेलरला उमजले तेव्हा तो आला. 'असे न खाणारे पुष्कळ पाहिले आहेत. किती दिवस खाणार नाहीस, पाहातो ! असे त्याने दरडावले. त्याचे म्हणणे खरे ठरले. एक दिवस गेला. दोन दिवस गेले आणि भूक आपला प्रभाव गाजवू लागली. मनाचे बळ माघारे सरू लागले. वाटू लागले की अरेरे, खरोखरीच आपल्या हातून वाईट झाले. कोवळ्या वयात लग्न होऊन सहा महिने होतात न होतात तोच जीवनाच्या भरल्या पानावरून उठावे लागले.

दोन दिवस उपास पडल्यावर मुकाट्याने मी जेवू लागलो डोळे मिटायचे आणि कष्टाने एकेक घास गिळायचा. पाहून खातो म्हटले तर एक घास गेला नसता. पुढे या अन्नाचा आणि त्या खोलीचा सराव झाला. आणि मी सपाटून जेवू लागलो.

## माझी तपःसाधना

आमचे अपील हायकोर्टात गेले होते. त्यामुळे फाशीचा ठरलेला दिवस पुढे ढकलला गेला होता आणि 'देव करो व मरण टळो' अशी मी प्रार्थना करू लागलो.

एका हवालदाराने सांगितले, 'भगवान का नाम लेव, फासी नही होगी.' आणि मी 'ओम नमः शिवाय', चा एक लाख जप करून टाकला. तीनत्रिकाळ भजन, पूजन, कीर्तन सुरू केले. पोथ्या बोलावल्या. शिवलीलामृत, विष्णुसहस्त्रनाम वाचू लागलो. सतीमहानंदेचा अध्याय वाचल्याने मृत्यू टळतो असे कोठेतरी ऐकले होते. त्याचे पठण सुरू केले. बुद्धीला पटत नव्हते तरी, 'मरता क्या न करता' या न्यायाने माझी आर्तभक्ती सुरू झाली. मनःशांतीसाठी गीताही अभ्यासू लागलो. आणि या वाचनाने म्हणा अथवा मनाच्या एका उसळीने म्हणा माझ्या विचारात फरक पडू लागला. भीती बाळगावी असे खरोखर मरणात काय आहे? गोळी लागून मेलो असतों तर? समजा येथून सुटून गेलोच तर मृत्यू टळणार आहे काय? ते मरण आणि हे मरण यात काही फरक आहे की नाही? या मरणात काही विशेष आहे. 'हतो वा प्राप्यसे स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' असे आश्वासन देणारे हे मरण आहे. त्याचे स्वागत का करू नये? पण मरणाच्या वेळी ज्या अपेक्षा असतात त्यापुढील जन्मी मूर्त स्वरूपात येतात म्हणून 'मरण कसे टळेल' यापेक्षा 'मरताना समाधान कसे वाटेल' याची चिंता वहावी असे वाटू लागले. एकाने मनःशांतीसाठी 'हनुमंत कवचा'चा जप करण्याचे ६३ दिवसांचे अनुष्ठान करावे असे सांगितले. याप्रमाणे ते आरंभले. दररोज एक वेळ जेवण दोनदा स्नान रात्रौ १२ वाजता जप करायला सुरुवात करायची.

एकविसाव्या दिवशी एक अघटित प्रकार घडला. ऐकणाऱ्यांचा विश्वास बसणार नाही, बुद्धिवाद्यांना हसू येईल आणि जन्मात विसरू शकणार नाही असे ते अद्भूत दृष्य होते. जप आटोपून एकाग्रतेच्या गुंगीतच मी बाहेर पडतो न पडतो तोच हनुमंताची अक्राळ विक्राळ प्रचंड मूर्ती समोर उभी राहिली. उग्र भव्य तो, केवळ दृष्टिमय नव्हता असे शपथेवर आणि अक्कल हुशारीने मी सांगू शकेन. परमेश्वराचे विराट रूप पाहून अर्जुनाची कशी गाळण उडाली असेल याची कल्पना त्या एका प्रसंगावरून मला आता करता येते. भीतीच्या आकस्मात आघाताने मी किंकाळी फोडून उठलो आणि त्यानंतर पुन्हा हनुमंत कवचाला हात लावला नाही. मला अनुष्ठाचाचा सल्ला देणाराने पुष्कळ गळ घातली. 'तुमपर हनुमानजी प्रसन्न हो गये हैं पहले पहले वे ऐसी ही लीला दिखाते हैं' असे त्या महायाग पुरभय्या पोलिसाने मला समजावले. पण माझी हिंमत झाली नाही. पुन्हा म्हणून हनुमानजीच्या फंदात पडलो नाही.

दुसऱ्या वर्षी मगनलाल बागडी आमच्या तुरुंगात आल्यानंतर त्यांच्या सल्ल्याने योगसाधना सुरू केली. त्यांनी स्तंभन क्रिया शिकवली. ध्यानधारणा सुरू असताना तिच्यामुळे आपोआप. श्वासोच्छ्वासातून ओंकाराचा ध्वनी उमटू लागतो. माझे हे रात्री अपरात्री चालणारे उपद्व्याप कन्हैयालाल नावाच्या एका जेलरला खपले नाहीत. एक दिवस त्याने पहाटेच एका पोलिसाला पाठवून हा प्रकार बंद करण्या-

बद्दल सांगितले. मी त्याचे ऐकले नाही, तेव्हा तो स्वत: तावातावात आला. त्यावेळी मी पुन्हा ध्यानमग्न झालो होतो. कन्हैयालाल आला आणि ' ये क्या तमाशा है. असे उद्गारता उद्गारताच ओंकारांचा घुमणारा ध्वनी ऐकून स्तब्ध झाला. त्याचा पारा एकदम उतरला. तो बराच काळ तसाच उभा राहिला. मी डोळे उघडले तेव्हा त्याने विचारले. ' छूटने के लिये ये सब कर रहे हो ?' यावर मी म्हटले ' छूटने की उम्मीद कब की छोड दी है. मरने के पहले मन:शांति चाहता हूँ. ' या प्रकारानंतर त्याच्याकडून कोणताही त्रास झाला नाही. फाशीचा दिवस जवळ येत होता. एक दिवस आई वडील बायकोला घेऊन भेटावयाला आले. आजोबा मन:स्तापाने वेडे झाल्याचे त्यांच्याकडून समजले. तिघेही रडत होते. बायको रडता रडता मुर्च्छित होऊन पडली. मी मन कठोर करून हसलो.

त्यांना समजावले. पुष्कळ तत्त्वज्ञान सांगितले. तुमचे हे अश्रू वैतरणी नदी पार करताना मला अडवतील असा पुराणाचा दाखला देऊन त्यांना सांगितले. मनुष्य मेल्यानंतर बाकीचे लोक गरुडपुराण वाचतात. मी आधीच वाचून टाकले आहे. समजा मी सुटलो आणि म्हातारपणी तुम्हाला सुख दिले नाही तर, वगैरे वगैरे,– या तत्त्वज्ञानाचे फोलपण त्यांना व मलाही कळत असले तरी मी मनावर पुष्कळसा ताबा मिळवला होता खास.

## कारागृहाच्या भिंती

नागपूरच्या तुरुंगात आम्हाला सकाळ-संध्याकाळ मिळून एक तास बाहेरच्या हवेत व प्रकाशात फिरायला मिळत असे. बाकीचे तेवीस तास फाशीची खोली हीच आमची सोबतोण असे. उन्हाळ्यात या खोलीत भयंकर गरमी व्हायची. दुपारी अंगातून घामाचे पाझर फुटून जमीन चिंब व्हायची. अशा वेळी डोळे मिटून मी कल्पना करीत असे– आम्र वृक्षाच्या थंडगार छायेखाली आपण पहुडलो आहोत. बाजूने झुळझुळ नदी वाहात आहे. पक्ष्यांचा मधुर किलबिलाट सुरू आहे. या कल्पनेतच झोप यायची. खोलीत मच्छर इतके होते की रात्री मी घोंगडीने भिंतीवर बसलेल्या त्यांच्या सैन्यावर हमल्यावर हमले करीत असे आणि भिंत पांढऱ्याची लाल होऊन जात असे. त्यांच्या जोडीला ढेकूण होते. कुबट अंधार होता. अशा वेळी कल्पनेतले जग सुरम्य रंगानी रंगवल्यावाचून गत्यंतर नव्हते. मी घरी पत्र लिहिताना वर ' मुक्काम पर्ण कुटी ' असे लिहायचा. कधी नव्हे ती मी कवितासुद्धा करू लागलो होतो.

बागडी त्रेचाळीस साली जेलमधे आले. त्यांनी मला खरी क्रांति-दीक्षा देण्यास सुरुवात केली. त्यांच्या बरोबर शामलाल श्रीवास हेही होते. त्यांना ८० वर्षांची शिक्षा झाली होती. तुला फाशी झाली तर मी शिरणी वाटीन, असे ते म्हणत.

' यह फंदाही हमारा गहना है. हम छूट गये तो कोई हमको पूछनेवाला नहीं है. हम गहना पहन कर चले गये तो जमाना हमारी पूजा करता रहेगा. '

या क्रांतिकारकांच्या सहवासात देशाच्या स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिधारेची ओळख झाली. भगतसिंग, राजगुरू आणि जतीनच्या धीरोदात्त चरित्रांनी मनाचा ताबा घेतला. 'वाढू दे कारागृहाच्या भिंतीची उंची किती। मन्मना नाही क्षिती।' असे प्रत्ययास येऊ लागले. कुसुमाग्रजांच्या कवितेच्या ओळी मी प्रत्यक्षात जगू लागलो. माझ्या रडणाऱ्या आईच्या डोळ्यांत मला माझ्या भारतमातेचे भव्य दर्शन होऊ लागले–

कशास आई भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल
नाचविता ध्वज तुझा गुंतले शृंखलेत हात
तुझ्या यशाचे पवाडे गाता गळ्यात येतात
सरणावरती तव पुत्रांची पेटताच प्रेते
उठतील त्या ज्वालातुन भावी क्रांतीचे नेते...

फाशी व्हायच्या आदल्या दिवशी बायको भेटावयास आली. तिची महात्मांजींशी भेट झाली होती. त्या दिवशी त्यांचे मौन होते. पण माझ्यासाठी त्यांनी ते तोडले असे ती म्हणाली. बापूजी म्हणाले होते. 'तुम देशकी वीरांगना हो. माझी परमेश्वराला प्रार्थना आहे. तो तुझे सौभाग्य अढळ ठेवील.'

"उद्या फासावर जायाचे" म्हणून मी गीतेचे पठण सुरू केले. फासावर जातांना "भारत माता की जय" असा उद्‌घोष करीत तख्तावर चढायचे, कानटोप मारेकऱ्यांना घालू द्यायचा नाही, फाशीचा फंदा, तो स्वतःच गळ्यात घालायचा असे आम्ही ठरवले. अगोदरच एक मृत्युपत्र करून ठेवले होते. अंगावर तिरंगा झेंडयाचे कफन टाकून आमचे शरीर जाळण्यात यावे असे लिहिले होते. पण जेलरने ते नामंजूर केले होते.

फाशीसाठी तीन तास उरले होते आणि एकाएकी रात्री 'पुढील कोर्टाने अपील स्वीकारल्याने फाशी पुढे ढकलण्यात आली आहे' अशा हुकुमाची तार आली. महात्माजींचा आशीर्वाद खरा ठरला होता तर. असे तीनदा झाले.

## तुरुंगातील धंदे

तुरुंगाच्या काळ्याकभिन्न भिंतीआडही बाग भानगडी चाललेल्या असतात. एक वेगळेच वैचित्र्यपूर्ण जग अस्तित्वात आलेले असते. जेलर हा तेथील हुकुमशहा. त्याची नजर चुकवून अथवा त्याच्या नजरेखालीही हातभट्टी, जुगार वगैरे धंदे चालतात हे मला नव्यानेच समजले. तुरुंगाच्या कडेकोट बंदोबस्तातही अनेक फटी असतात आणि त्यातून सर्रास देवाणघेवाण सुरू असते. पैसा सगळे काम करतो आणि कैद्यानाही आपला एक सवतासुभा स्थापन करता येतो हे तेथेच मला कळून आले.

या फटीतूनच एकदा आजचे 'चव्हाटा'चे संपादक श्री. सावजी यांनी आमच्याकडे

पार्कर पेन आणि कागद पाठविले. तुरुंगातील कदान्न आणि इतर जुलूम जबरदस्ती यांच्या विरुद्ध डी. आय. जी. ला एक अर्ज लिहून पोलिसांना चिरीमिरी चारून तो गुप्तपणे रवाना केला. भिंतीआड काय चालले आहे. हे 'प्रॉपर चॅनल' मधून तुमच्याकडे लिहून पाठवले तर ते पोचणारच नाही म्हणून हा मार्ग स्वीकारीत आहोत, असे आम्ही लिहिले होते. याच तक्रार-अर्जाची एक नक्कल आम्ही राजरोस-पणे जलरला दिली. जेलर यांग हा अँग्लो-इंडियन होता. त्याने ती वाचून फाडून टाकण्याचा बेत केला. 'निदान सुपरिटेंडेंट समोर तरी ठेवा' असे आम्ही त्याला म्हटले. त्याने ते कबूल केले. सुपरिटेंडेंट मासूमअली त्याच्याहून कडक होता—त्याने टरकावले. 'बेवकूफ, क्या तुम समझते हो की इसे हम भेज देंगे?' त्याने अर्ज फाईल केला. गंमत अशी झाली की मोरे नावाच्या, त्याच्यावर काही कारणाने खप्पा असलेल्या एका कैदी कारकुनाने, त्याच्या टेबलावरून तो लंपास केला.

फाईलीतून कागद हरवणे ही लहानसहान घटना नव्हती. साऱ्या हुकूमशहांचे धाबे दणाणले. सुरुवातीला 'पुन्हा तसाच एक अर्ज लिहून द्या. तो आम्ही वर पाठवतो' असे त्यांनी गुर्मीत बजावले. पण काय घडले ते आम्हाला माहीत होते. आणि त्यांची थोडीफार मौज करायचे मी ठरवले. 'कोरेकार...गोपाळराव' अशा हाका मारीत जेलर बाहेर उभा होता. मी झोपेचे सोंग घेतले होते. बऱ्याच वेळाने डोळे चोळीत जागा झालो. त्याची शिस्त, कडकपणा यांची मनसोक्त टर उडवली. आणि 'अर्ज पुन्हा लिहून देत नाही. कारण तो तुम्ही वर पाठवणार नाही, हे मला माहीत आहे.' असे शेवटी स्पष्टपणे सांगितले.

"साले, अपने आप को क्या समझता है? टिकटिकीपर चढाके कोडे लगाऊंगा और मिटोमें सीधा कर दूंगा—"

"उसमें क्या बहादूरी है? हिंमत है तो मुझे खुला छोडके देखो, मैं तो मरने-वाला ही हूँ—और फांसी भी मुझे एक बार होंगी." त्यावेळी मी वासुदेव बळवंता-सारखी दाढी वाढवली होती. चेहरा रागात अक्राळ विक्राळ दिसायचा, तो जो मान खाली घेऊन गेला तो पुन्हा परतला नाही. माझ्या खोलीत झडती करायला शिरायचे असले म्हणजे मग सात माणसांचे टोळके शिरे. एकटयादुकटयाची हिंमत होत नसे.

कधी चित्रविचित्र स्वप्ने पडायची, फावल्या वेळच्या उद्योग म्हणून मी 'स्वप्न मीमांसा' नावाचे पुस्तक बोलावले आणि अभ्यास सुरू केला. एकदा स्वप्नात म्हैस व्याली आणि तिला गाईचे पिल्लू झाले. आम्ही अर्थ असा काढला की म्हैस अशुभ आणि गाय शुभ आहे. म्हणजे आपण अशुभातून शुभाकडे जाणार, म्हणजेच मृत्यू टळणार. ज्योतिषशास्त्राचा व हस्तसामुद्रिकाचाही मी अभ्यास सुरू केला होता.

ज्यांना फाशी व्हायची त्यांना मिठाई खायला घालण्याची प्रथा आहे. माझ्यासाठी

ही मिठाई आली. मी ती नाकारली. मी संतापाने म्हणालो, 'बळीच्या बोकडाची पुजा करतात आणि मिठाई खाऊ घालतात. आम्ही बळीचे बोकड नाही. देशासाठी मरणारे लोक आहोत. या मिठाईऐवजी, दररोज आम्हाला चांगले जेवण दिले असते, तरी समाधान वाटले असते. पण तुम्हाला काळीज नाही. तुमची पापी मिठाई मी खाणार नाही' आणि झर्रकन मिठाई मी पोलिसांच्या तोंडावर फेकली. तो बोंबलत गेला.

सारेच पोलीस आणि अधिकारी क्रूर हृदयी होते असे नव्हे. बरेचसे प्रेमाने वागायचे. त्यावेळी बाहेर अन्नधान्याचा दुष्काळ होता. घरचे लोक अक्षरशः तुरीच्या घुगऱ्या खाऊन जगत होते. अशा वेळी पोलीसही आमच्या उरलेल्या भाकरी पोराबाळांसाठी घरी न्यायचे. आमच्या छोटया मोठया मागण्या ते पुरवायचे. एक पंजाबी जेलर तर फाशीचा दिवस जवळ येत असताना चोरून रात्री बॅ. कंदारांच्या बंगल्यावर गेला. ज्या कोर्टाने फाशीची शिक्षा दिली तेच शिक्षा अंमलात येत असताना हजर पाहिजे. पण विकेंडनचे स्पेशल कोर्ट ज्या अर्थी विसर्जित झाले आहे. त्या अर्थी दुसऱ्या कोणत्याच न्यायालयाला ही शिक्षा अंमलात आणता येणार नाही या मुद्यावर हायकोर्टात मॅंडामस करावा अशी सूचना त्याने केली. त्याप्रमाणे मॅंडामस दाखलही करण्यात आला. पण जस्टिस डिग्बीने तो फेटाळून लावला.

## फाशी निवारक समिती

अपील करण्यास पैसे नाहीत म्हणून आमच्या पैकी एक राजबंदी शंकर फाशी गेला. कायद्याची मदत मिळाली असती तर कदाचित तो सुटला असता, निदान त्यांची शिक्षा लांबणीवर पडली असती. ही बातमी पसरली तेव्हा लोकांत खळबळ उडाली. त्याचा परिणाम होऊन डॉ. खरे यांच्या अध्यक्षतेखाली देहांत शासन झालेल्या बंद्यांना सार्वजनिक खर्चाने कायद्याची मदत मिळावी म्हणून ७ फेब्रुवारी ४३ रोजी 'फाशी निवारक समिती'ची स्थापना करण्यात आली. पुढे डॉ. खरे व्हाईसरॉयच्या कार्यकारणीचे सदस्य झाले. तेव्हा समितीचे अध्यक्षपद श्रीमती अनसूयाबाई काळे यांच्याकडे आले. या समितीच्या प्रयत्नाने हायकोर्टाच्या अपीलात काही सुटले. दिल्लीच्या फेडरल कोर्टात व लंडनच्या प्रीव्ही कौन्सिलमध्येही काहींची सुटका झाली. तरी चिमूरचे पाच व आष्टीचे दोन यांची फाशी कायम राहिली. त्यात मी होतो. कायद्याचे सर्व मार्ग कुंठित झाल्यावर ब्रिटिशांच्या दयाबुद्धीला आळवण्यात येऊ लागले. गव्हर्नर आणि गव्हर्नर जनरल यांच्याकडे २ लक्ष सह्यांचे दयेचे अर्ज पाठवण्यात आले. सुमारे ६०० सार्वजनिक संस्थांनी दयेचे ठराव केले.

प्रत्येक जागरूक माणूस चिमूर-आष्टीच्या 'सप्त चिरंजिवांसाठी' काहीना काही करण्यास आतुर होता. बळी पडलेले खुद्द डुंगाजी यांची माता आणि सोनवण्यांची पत्नी यांनीही गुन्हेगारांना माफी द्यावी असे प्रार्थनापत्र पाठविले. पण त्या साऱ्यांचा काही उपयोग होईल असे दिसेना.

अनसूयाबाई महात्माजींना भेटावयास गेल्या. 'प्रयत्न करून थकले' असे हताश उद्गार त्यांनी काढले. त्यावेळी सिमला कॉन्फरस व्हायची होती. ब्रिटिशांनी 'विसरा व क्षमा करा' असे उभयपक्षी आवाहन केले होते. त्याला अनुलक्षून महात्माजींनी लॉर्ड वेव्हेला पत्र लिहिले. त्याचा परिणाम झाला आणि फाशीची शिक्षा रद्द करून आम्हाला जन्मठेप देण्यात आली. मृत्यू हूलकावण्या देत देत अखेर पळून गेला आणि जन्मठेप भोगून झाल्यानंतर काय करायचे याचे बेत आम्ही आखू लागलो.

## रायपूर जेल

जन्मठेप भोगण्यासाठी आमची रवानगी नागपूरवरून रायपूरला व्हायची होती. निरोप देतांना जेलर मंडलोई यांनी बराच हितोपदेश केला. यापुढे तरी वर्तणूक सुधारा असा 'पोक्त सल्ला' माझ्या भल्यासाठी त्यांनी दिला. 'मी माझे पाहून घेईन, तुमचा सल्ला तुमच्याजवळ ठेवा' असे गुरकावून मी माझ्या रेकॉर्डवर त्याचा आणखी एक रागीट शेरा दर्ज करून घेतला. रायपूर स्टेशनवर आम्ही उतरलो. जेलपर्यंत पायी जायचे होते. 'मी पायी चालणार नाही' असे पहाऱ्यावरच्या दोघा शिपायांना मी बजावले. अखेर बऱ्याच बाचाबाचीनंतर नाइलाजाने त्यांनी मला उचलले. घामाघूम झालेले ते दोन पोलीस आणि त्यांच्या हातावर आरामात विराजमान झालेला असा मी अशी शोभा प्लॅटफॉर्मवरून निघाली. लोक बेसुमार हसत होते. पोलिसांनी जेलवर फोन करून गाडी पाठवण्यास सांगितले, पण अशी सोय नाही असे त्यांना सांगण्यात आले. मुकाट्याने दोघांनी आपल्या पैशानी टांगा केला व मला जेलपर्यंत पोचवले.

जेलरच्या टेबलासमोर मी उभा राहिलो. तो माझा हिस्ट्रीशीट वाचत होता. तो वाचून झाल्यावर त्याने माझ्याकडे पाहून मान तुकवली. 'इसको गुन्हाखाने मे डालो' असा हुकूम त्याने फर्मावला.

रायपूर जेल बदमाश कैदी आणि त्याहून बदमाश अधिकाऱ्यांसाठी प्रसिद्ध होता. एखाद्याला 'अद्दल घडवायची असली म्हणजे त्याची तेथे रवानगी करण्यात येत असे. दुसऱ्या दिवशी माझ्याकडे गहू दळावयास आले. वीस शेर गहू संध्याकाळपर्यंत दळून झालेच पाहिजेत अशी चक्कीवाल्याने तंबी दिली. उभ्या चक्क्या होत्या. मुकाट्याने दळू लागलो. जेलच्या दोन वर्षांच्या आरामशीर मुक्कामात माझी तब्येत बाळतिणीसारखी नाजूक झाली होती. चार वाजेपर्यंत पाचेक शेर दळून झाले. हातावर टरारून फोड उठले संध्याकाळी जमादार आला. गव्हाचा ढीग जसाचा तसाच त्यानं पाहिला. — 'क्यो रे साले, मस्ती गई नहीं क्या ? दिनभर क्या कर रहा था ?'

'दद्दा, कल पीस देऊंगा' मी पडल्या आवाजात म्हणालो. तो पुन्हा तंबी देऊन निघून गेला.

दुसऱ्या दिवशी बुधवार होता. दळण्याच्या मेहनतीने खाल्लेले अन्न केव्हांच पचून गेले आणि दुपार उतरता उतरताच सपाटून भूक लागली. भुकेच्या सपाट्यात शेरभर कच्चेच गहू मी खाऊन टाकले. त्या दिवशी दहा एक शेर दळून झाले. संध्याकाळी जमादार पुन्हा येऊन उभा ठाकला.

शिव्याची खैरात पुन्हा सुरू झाली.

मी त्याच्याकडे रोखून पाहात होतो. 'क्या देख रहा है बे ?'

'आहाहा दद्दा क्या चेहरा है, क्या आयुष्य है – तुम्हारी तकदीर देख रहा हूँ वाहवा – क्या जोरदार किस्मत है.'

दद्दा जरा खुलला. थोडे नरम दिसले आणि मी कोपराने खणायला सुरुवात केली.

जेलमधे थोडेफार वाचलेले सामुद्रिक पडताळून पाहू लागलो.

'दद्दा, क्या तुम्हारे बाये कंधेपर चोट है.'

दद्दा आश्चर्यचकित झाला. 'अरे, क्या तुम यह विद्या भी जानते हो ? सचमुच मेरे कंधेपर चोट है, लडाई में गोली लगी थी.'

और दद्दा, तुमको तीन लडके है, बडे दो तो साले गद्दार है, तीसरा लडका अच्छा है – क्यों ठीक है ना.

दद्दा पुरताच विरघळला. त्याला आणखी काही आडाखे सुनावले. तेव्हा गहिवरून म्हणाला – 'अरे, कितना अच्छा लडका है, कौनसे गधे ने यहाँ डाला ?'

मग तो म्हणाला, 'देख बेटा, जितना पीसना हो उतना पीस. मैं दुसरोंसे पिसवा दंगा.' मी दद्दाला एकदम 'पायलागी' केली.

दुसऱ्या दिवशी दद्दाने माझे उरलेले गहू दळण्यासाठी कोणी कैदी सापडतो का ते पाहिले. तो सापडला नाही तेव्हा आजूबाजूला कोणीच नाही असे पाहून तो चक्क स्वतःच दळायला बसला. 'अरे दद्दा दद्दा रहने दो' असे मी म्हणालो. आणि 'अबे, तू ठैर' असे म्हणत तो भराभर किती वेळ तरी दळत होता.

दुसऱ्या दिवशी त्यानेच जेलरची मनधरणी करून गुन्हा-खान्यातून माझी बदली 'बच्चोंकी बरॅक'मध्ये करायला लावली.

मुलांच्या बरॅकमध्ये आमच्यावर 'जौहरसिंग' नावाचा जबलपूरकडील एक डाकू वार्डर नेमण्यात आला होता. कैद्यांवर फार क्रूरपणा करायचा. कैद्यांवर सूड उगवायचा असला म्हणजे अधिकारी त्याचा उपयोग करायचे. एकदा तर मारझोडीने एक कैदी मेलाच. जेलर पाध्ये फार क्रूर होता. 'फेक दो उठाकर, जेल का कुत्ता मर गया है.' असे तो म्हणाला.

दसऱ्याचा सण कैद्यांत फार प्रेमाने साजरा व्हायचा. आपापसात तंटे भांडण विसरून ते भेटायचे त्या दिवशी हा जौहरसिंग मला भेटावयास आला. मी त्यांला धिक्कारले. 'मैं तुमसे नही मिलूंगा.'

'क्यों ?' तो हबकून म्हणाला.

'तुम हैवान हो, अरे तुम भी कैदी, हम भी कैदी, इन कैदियोंकी तुम इतनी बेरहमीसे मारते हो, शर्म नही आती ? याद रखो की वहाँ जबलपूर में तुम्हारे नन्हे नन्हे बच्चोंपर भी कोई हाथ चलाता होगा और वे हमारी तरह ही तडपते होंगे. क्या ये जेलर तुम्हारा साथ देनेवाला है ?'

तो एकदम माझ्या पायावरच पडला. 'आप मेरे गुरू बन गये है. अब ऐसा कभी नही करूंगा.' कान धरून त्याने शपथ घेतली आणि त्याच्या मनात काय आले कोण जाणे, तो दुसऱ्या दिवसापासून माझे कपडे धुवून देऊ लागला.

'पोरांच्या बॅरक'मध्ये आणखी काही विचित्र अनैसर्गिक प्रकार चाललेले माझ्या लक्षात आले. प्रत्येक वॉर्डरचा एक 'लौंडा' 'ठेवलेला' असे आणि त्याला दुसरा कोणी हात लावू शकत नसे. या वार्डरांना जेलरचीही फूस होती आणि तुरुंगात चालणाऱ्या जुगार–दारू वगैरे गुप्त धंद्याची 'भुवनं' त्यांच्या खिशापर्यंत पोचती करण्याचे काम हे वॉर्डर लोक करीत असत. त्यामुळे त्यांच्या असल्या उपद्व्यापांकडे कानाडोळा करण्यात येत असे.

एकदा एक कोवळा पोरगा माझ्याकडे आला. 'भैय्या, मुझे बचाव.' अशी गयावया करू लागला. सुफेदसिंग नावाचा एक बदमाश वॉर्डर त्याच्या मागे लागला होता आणि भलतीच मागणी करीत होता. जेलर आणि वार्डर या दोघांचीही खोडकी जिरवायची असे ठरवून मी त्याला एक बनाव घडवून आणण्याचा सल्ला दिला. 'घाबरू नकोस, आम्ही तुझ्या पाठीशी आहोत' असा धीर देवून त्याला तयार केले. आय. जी. गाढेवाल इन्स्पेक्शनसाठी आला. कैद्यांना समोर उभे करण्यात आले आणि एकाएकी तो पोरगा धावत जाऊन त्याच्या पायांवर कोसळला.

एकच खळबळ उडाली. सुफेदसिंगाच्या बदमाशीबद्दलची आपली तक्रार त्याने आय. जी. ना सांगितली. पाध्येच्या भ्रष्ट कारभाराबद्दलही सांगितले. त्याप्रमाणे जमिनीत गाडून ठेवलेले हातभट्टीचे सामानही काढून दिले. इतर कैद्यांनाही धीर आला आणि तक्रारींचा ओघच सुरू झाला. सुफेदसिंग वार्डरचे कपडे तियल्या तिथे उतरवण्यात आले. चोवीस तासांत त्याची व जेलरची बदली झाली.

त्यानंतर जो जेलर आला त्याला ही हकीकत समजल्याबरोबर त्याने मला बोलावले. 'आजपासून तुमची सर्व बंधने तुटली असे समजा. तुम्हाला काय पाहिजे ते मला सांगत चला.' असे दोन्ही हात जोडून तो उद्गारला,

आणि एक दिवस देशात कांग्रेसचे राष्ट्रीय सरकार स्थापन झाले. सर्व राज कैद्यांची सुटका होणार अशी बातमी कानांवर आली व आमच्या सुटकेची ऑर्डर आली आणि आम्ही निघालो. तेव्हा सर्व कैदी आम्हाला पोचविण्यासाठी जमा झाले. प्रत्येकाच्या डोळ्यांत आसवे गोळा झाली होती. गुन्हेगारांनाही हृदये असतात व ती कदाचित अधिकच भावनाक्षम असतात असा माझा अनुभव आहे.

४६ सालच्या एप्रिल महिन्यात आम्ही सुटलो. रायपूरला कांग्रेस कमिटीतर्फे आमचे भव्य स्वागत झाले. मी कधी स्टेशनवर बोललो नव्हतो. त्या दिवशी पाचच मिनिटे मुश्किलीने बोललो. पण लोकांना ते आवडले. काही पत्रकारांनी आम्हाला घेरून विचारले, 'यापुढे काय करणार ?' वेगवेगळ्या लोकांनी वेगवेगळी उत्तरे दिली. मी दिलेले उत्तर अजून आठवते. मी म्हणालो होतो—'प्रत्येक मनुष्य जन्मास येताना तीन ऋणे डोक्यावर घेऊन येत असतो. मी पुनर्जन्म मानतो. आईवडिलांची सेवा करण्याची संधी या जन्मी मिळाली नाही. याचा अर्थ त्यांचे ऋण मी मागील जन्मी फेडून टाकले असावे. राहता राहिले देशऋण. या ऋणाचे मुद्दल फाशीच्या शिक्षेने मी फेडले. आता राहिले ते पुढील व्याजाचे जीवन. ज्या जनताजनार्दनाने सती सावित्रीच्या निष्ठेने यमाच्या दरबारातून परत आणण्यासाठी तनमन धनाने चिकाटीचा प्रयत्न केला आणि अखेर यश संपादिले, त्याच्या अखंड सेवेत या व्याजाची मी फेड करणार आहे.'

नागपूरला आलो. स्व. कन्नमवार कडकडून भेटले. मी रडायला लागलो. 'अरे, सुटल्यावर रडतोस ?' ते म्हणाले.

'मला माझ्या हरपलेल्या सोबत्यांची आठवण येते. त्यांचे काही स्मारक झाल्याशिवाय मला समाधान वाटणार नाही.'

'आपण त्यांचे स्मारक उभारू.' दादासाहेबांनी पाठीवर हात फिरवीत अभिवचन दिले.

दुःखाची गोष्ट अशी, की आपल्या हयातीत शक्य असूनही त्यांनी ते पूर्ण केले नाही. माझे हे असमाधान अजून शिल्लक आहे. व्याजाची फेड अजून सुरूच आहे. गोव्याच्या होमकुंडात पुन्हा एकदा जीवन झोकून देऊन त्यापैकी काही फेडले. तेथेही मृत्यू सामोरा येऊन परतला. व्याजाची फेड अजून माथ्यावर शिल्लक आहे. ४२च्या हुतात्म्यांचे स्मारकाचे स्वप्न चिमूर येथे पूर्ण झाले. १० जून १९७१ ला स्मारकाचे उद्घाटन झाले.

## समाप्त

१२ फेब्रुवारी १९७२

म. ग. पटवर्धन

## क्रीडांगण

जानेवारी महिन्यात रत्नागिरी येथे पार पडलेला

# महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव

दि. ६, ७, ८ व ९ जानेवारी या चार दिवसांत महाराष्ट्र राज्याचा दहावा क्रीडा महोत्सव रत्नागिरी येथे झाला. १९५४-५५ साली अशा प्रकारचे क्रीडा महोत्सव त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. मुरारजी देसाई यांनी सुरू केले. सुरुवातीचे काही क्रीडा महोत्सव द्विभाषिक महाराष्ट्र राज्यात झाले. त्यानंतर मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याचे क्रीडा महोत्सव झाले. या सर्व क्रीडा महोत्सवांत शाळा व कॉलेजमध्ये जाणारे विद्यार्थी बहुसंख्येने भाग घेत असत. ग्राम पातळीवरून तालुका पातळीवर तेथून जिल्हा पातळीवर व शेवटी राज्य पातळीवर अशा तऱ्हेने हा क्रीडा महोत्सव गेली कित्येक वर्षे चालू आहे. मागील वर्षी यात एक फार महत्त्वाचा बदल करण्यात आला. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना खेळण्याची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असल्याने त्यांना यातून वगळण्यात आले आहे. नव्या नियमाप्रमाणे जे युवक शाळा व महाविद्यालये यात नाहीत अशांनाच फक्त या महोत्सवात भाग घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. पूर्वी ज्याप्रमाणे २१ वर्षावरचे लोक खोटी नावे व अन्य सर्टिफिकिटे देऊन भाग घेत असत. आता त्याप्रमाणे अनेक विद्यार्थी दडपून यात भाग घेताना दिसतात. पण हा दोष शोधून काढून घालविणे फारसे अवघड नाही. शाळा, कॉलेजात न जाणाऱ्या अनेक युवकांची शक्ती काहीतरी विधायक कार्याकडे आकर्षिली जावी हा उद्देश काही प्रमाणात आता सफल होईल असे दृष्य तरी मला दिसून आले.

गेली अनेक वर्षे मी या क्रीडा महोत्सवास जात आहे. पंचाची कामे करीत आहे, सर्व क्रीडा महोत्सवांचे बारकाईने निरीक्षण करीत आहे, तेव्हा त्यात काही सुधारणा सुचतात का? काही बदल आवश्यक आहेत का? वगैरे विचार या लेखाद्वारे मांडावेत हा विचार आहे.

कोकणात झालेला हा दुसरा क्रीडा महोत्सव. पहिला ठाण्यास झाला होता, पण खऱ्या अर्थाने ज्याला कोकण म्हणता येईल त्या दृष्टीने कोकणातला हा पहिलाच क्रीडा महोत्सव.

रत्नागिरीचे तरुण व उत्साही कलेक्टर श्री. देसाई यांच्या उत्साहामुळे हा क्रीडा महोत्सव रत्नागिरीत चांगल्या रीतीने पार पडला. खेळाडूंची राहण्याची, जेवणाची व इतर सोयी रत्नागिरीच्या लोकांनी त्यांच्या परीने खूपच चांगल्या केल्या होत्या. जवळ जवळ २००० खेळाडू व पंच यांची सोय करणे खासच इतके सोपे नाही. प्रत्येक निवासाच्या ठिकाणी केलेल्या सॅनिटेशनच्या सोयी तर खरोखरच व्यवस्थित वाटल्या. रत्नागिरी शहरात फिरतानादेखील एकप्रकारे बरे वाटे. छोटेसे, टुमदार, निसर्गरम्य असे शहर सगळयांना आवडले. रत्नागिरीतील माणसेदेखील बोलायला वागायला फारच चांगली वाटली. त्यांनी प्रेक्षकांची जबाबदारीदेखील चांगली पार पाडली.

स्थानिक मंडळी निवासाच्या ठिकाणावरच बहुसंख्येने अडकून पडली व त्यामुळे मैदानावर रत्नागिरीची स्थानिक मंडळी कमी पडली. काही ठराविक लोकांवरच मैदानावरचा ताण पडला. स्वयंसेवक संघटना फारच तोकडी होती व त्यामुळे काही ठिकाणी पंचांनाच दोन्ही स्वरूपाची कामे करावी लागत.

उद्घाटन व समारोप समारंभाच्या बाबतीत रत्नागिरीचे कार्यकर्ते जास्त काटे-कोर वागतील असे वाटले होते. पण या बाबतीत फार निराशा झाली. उद्घाटनाचा समारंभ नऊच्याऐवजी पावणेदहाला झाला व समारोपाच्या दिवशीच्या स्पर्धा दुपारी दोनऐवजी चारला सुरू झाल्या. त्यामुळे उद्घाटनाला उन्हाचा त्रास व समारोपाला अंधाराचा त्रास. बक्षीस समारंभ त्यामुळे घाईघाईत उरकावा लागला. भाषण बाजांनी दोन्ही प्रसंगी फार वेळ घेतला. आभाराचा कार्यक्रम तब्बल २० मिनिटे चालला होता.

उद्घाटनाच्या समारंभातील इतर टामटुम कमी करून शपथविधीला जास्त महत्त्व दिले पाहिजे. खेळांतून जसे मनोरंजन होते तसेच काही शैक्षणिक फायदे होतात. पण दुर्दैवाने या गोष्टीचा अनेकांना विसर पडू लागला आहे. 'खिलाडू वृत्तीने वागून मी पचांचे निर्णय मानीन' अशा प्रकारच्या शपथेतील वाक्यांचा अर्थ खेळाडूंच्या मनावर बिंबवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न झाला पाहिजे. वास्तविक ३।४ वाक्यांचीच असलेली शपथ खेळाडूंकडून पाठच करून घ्यावी. या दृष्टिकोना-तून या विधीकडे पाहून शपथविधीचा कार्यक्रम वेगळया प्रकाराने व आणखी जास्त परिणामकारक कसा करता येईल याचा सर्वच कार्यकर्त्यांनी विचार करावा. याच कार्यक्रमातील ज्योत आणण्याच्या बाबतीतदेखील ऑलिंपिक कमिटीने पाठविलेल्या आदेशावरून ज्योत आणण्याचे स्थानिक स्वरूपाचे कार्यक्रम बंद होणे बरे नाही का?

## खेळांचा दर्जा

एकंदरीत क्रीडा महोत्सवाच्या खेळांचा दर्जा वाढतो आहे की नाही यासंबंधी लिहिणे धाडसाचे ठरणार आहे. व्हॉलीबॉल, अॅथलेटिक्स या खेळांचा दर्जा वाढतो

आहे असे म्हणता येईल. अॅथलेटिक्समध्य या वर्षी तीन नवे उच्चांक झाले हे त्याचे गमक मानता येईल. व्हॉलीबॉलच्या खेळाचा दर्जा निश्चित वाढत आहे. ग्रामीण भागांतून येणाऱ्या खेळाडूंची संख्या वाढत जाणे हेदेखील एक खेळांचा दर्जा वाढत असल्याचेच चिन्ह आहे. या बाबतीत एक सूचना द्यावीशी वाटते. या क्रीडा महोत्सवातून मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर या चार शहरांना एक-दोन वर्षे वगळून प्रयोग करून पहावा. त्यामुळे खेळात सुधारणा होते, की दर्जा घसरतो हे एकदा प्रयोगाने पहावे. अर्थात या माझ्या सूचनेला अनेकांचा विरोधच राहील याची मला पूर्ण कल्पना आहे पण पुढे मी जे खेळांचे निकाल दिले आहेत त्यावरून या माझ्या विधानाची सत्यताही पटेल.

दर तीन वर्षांनी नियमांचा फेरविचार करावा. क्रीडा महोत्सवाच्या नियमांच्या पुस्तिकेतील नियमांतच असा एक नियम असावा, की त्यामुळे सर्व नियमांची फेररचना दर तीन वर्षांनी आवश्यक वाटल्यास करता यावी. कारण काही अप्रमाणित (Non Standard) खेळांचे नियम जसेच्या तसेच कित्येक दिवसांपासून राहून गेले आहेत. उदा. पुरुषासाठी १२पौंडी गोळा वापरणे किंवा ११०मी. हर्डल्स्च्या ताटयांची उंची ३ फूट असणे. वास्तविक पाहता पुरुषासाठी १६ पौंडी गोळा वापरला गेला पाहिजे व हर्डल्स्ची उंची ३॥ फूट असली पाहिजे. त्याशिवाय या क्रीडा महोत्सवातील अॅथलेटिक्सच्या बाबी प्रमाणित (Standard) मानल्या जाणार नाहीत.

ग्रामीण भागांत जे खेळ शक्य आहेत त्यांना प्राधान्य द्या.

वास्तविक पहाता थाळीफेक किंवा भालाफेक यांसारखे विषय प्रथम ठेवायला हवेत व त्यानंतर हर्डल्स्सारख्या विषयाचा विचार करायला हवा. गेली कित्येक वर्षे मी पहात आहे, की हर्डल्स्करिता प्रत्यक्षात सहा किंवा आठ स्पर्धकच भाग घेतात. पण त्यासाठी कमीत कमी २ ते ३ हजार रुपयांपर्यंत खर्च करून हर्डल्सच्या सेटची व्यवस्था करावी लागते. तेव्हा जे विषय लहान गावांतून शक्य आहेत त्यांना प्राधान्य द्यायला हवे व त्यानंतर हर्डल्ससारख्या विषयाचा समावेश करावा.

वरील मुद्यांतूनच या विषयावर जास्त प्रकाश पडू शकतो. सांघिक स्पर्धेत गेल्यावर्षीपासून लेझीम या विषयाचा समावेश केला गेला आहे. त्यात ग्रामीण संघ मोठ्या तयारीनिशी भाग घेऊ लागले आहेत. लेझमीची चुरस छान झाली. महाराष्ट्राचे खरे लोकनृत्य कोणते ? याही दृष्टीतून लेझमीकडे बोट दाखविता येईल. मी तर थोडासा एका टोकाला जाऊन असे सुचवीन की या राज्य क्रीडा महोत्सवांतून कबड्डी–अॅथलेटिक्स, व्हॉलीबॉल यासारखे प्रकार. कमी करून त्याऐवजी लेझीम, मल्लखांब, कुस्ती, दांडपट्टा, कसरतीचे विषय, आसने यांसारखे विषय घालून या क्रीडामहोत्सवाचे रूपच पूर्णपणे पालटवून टाकावे. कारण या खेळांची प्रगतीच होत नाही, त्यांना संधी नाही. या उलट कबड्डी वगैरेसारखे खेळ अनेक स्तरांतून खेळले जात आहेत.

## कबड्डी व खोखोच्या पंचांची संघटना

कबड्डी व खोखो खेळांचे पंच, संघभावनेने काम करताना दिसले. त्यांनी एका विशिष्ट प्रकारचा पोषाख केला होता. त्यामुळे ते दृश्य दिसायलाही चांगले दिसत होते. त्यांच्या राज्य संघटना, त्यांचे पदाधिकारी यांचे कौतुक करायला हवे. या उलट हॉलीबॉल व अँथलेटिक्समधील पंचाची कामे म्हणावी लागतील. मी स्वत: अॅथलेटिक्सच्या विभागाचा तांत्रिक साहाय्यक म्हणून गेलो होतो. मला आमच्या अॅथलेटिक्सच्या विभागातील पंचांचे संघटन अजून जास्त व्यवस्थित व्हायला हवे आहे. याची जाणीव प्रकर्षाने झाली, व्हॉलीबॉल हा खेळ खेडयापाडयातून खेळला जात आहे. आज सर्व महाराष्ट्रात जास्तीत जास्त प्रिय खेळ कोणते असे विचारले तर व्हॉलीबॉल व कबड्डी यांची नावे घ्यावी लागतील. व्हॉलीबॉलमध्ये साधे पंचांची परीक्षा पास झालेले पंच पुरेशा संख्येत मिळू नयेत याचे आश्चर्य वाटते. अर्थात यालाही व्हॉलीबॉल संघटनाच जबाबदार आहे असे स्पष्ट म्हणावेसे वाटते.

## शिवछत्रपती पदके क्रीडामहोत्सवात द्यावीत

शिवजयंतीला–शिवछत्रपती अॅवॉर्ड मिळविणाऱ्या खेळाडूंची नावे जाहीर करावी परंतु त्यांचे वाटप मात्र क्रीडामहोत्सवात करावे. गव्हर्नरच्या निवासात हा समारंभ घेण्याऐवजी ज्या ठिकाणी व ज्यावेळी सर्व महाराष्ट्रातील खेळाडू एकत्र जमतात अशा वेळी त्यांचा सत्कार होणे जास्त चांगले. याशिवाय महाराष्ट्रातील ज्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धा किंवा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांत विशेष कामगिरी केली असेल अशा सर्वांना यावेळी खास आमंत्रण देऊन त्यांचाही सत्कार यावेळी करावा. त्यांना पहाण्याचा योग त्यानिमित्ताने सर्व खेळाडूंना येईल.

कोल्हापूर व सोलापूर या ठिकाणी पूर्वी ज्यावेळी क्रीडा महोत्सव साजरे झाले, त्यावेळी अनुक्रमे "आरोग्य म्हणजे काय" व "खेळांतून राष्ट्रीय एकात्मता" या विषयांवर परिसंवाद झाले होते. खेळाडूंना खेळांवर विचार करायला लावावा, नुसतेच खेळणे, कौशल्य आत्मसात करणे व बक्षिसे मिळविणे याने शिक्षण साधले जात नाही. खेळाडूंनाही बोलते केले पाहिजे. त्यातूनही अनेक गोष्टी साधता येतील.

| खेळ | पुरुष विजेता जिल्हा | स्त्रिया विजेता जिल्हा |
|---|---|---|
| कबड्डी | पुणे शहर | मुंबई शहर |
| व्हॉलीबॉल | पुणे शहर | – |
| खोखो | मुंबई शहर | मुंबई शहर |
| लेझीम | कोल्हापूर जिल्हा | – |
| लोकनृत्य | – | नागपूर शहर |
| कुस्ती | सांगली जिल्हा | – |
| अॅथलेटिक्स | मुंबई शहर | ठाणे |
| चँपिअनशिप | मुंबई शहर | मुंबई शहर |

मी यंदाच्या वर्षीचे निकाल वर दिले आहेत.

वरील निकालांचा अभ्यास केला असता असे दिसून येते, की पुणे, मुंबई, नागपूर व सोलापूर अशा शहरी विभागातच ही सर्व बक्षीसे विभागली जातात. या चारही शहरांना जिल्ह्याचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे या शहरांचे संघ व शिवाय ही शहरे ज्या जिल्ह्यांत मोडतात तो जिल्हाही राज्य क्रीडा महोत्सवात भाग घेतो. ग्रामीण भागातील जिल्ह्याना शहरी जिल्ह्याशी स्पर्धा करावी लागते. त्यातून गेली अनेक वर्षे शहरी भागांनाच जनरल चॅम्पियनशिप मिळत आल्याचे दिसते. यंदाचे निकालही तेच दर्शवितात. म्हणून काही वर्षे या शहरांना वगळण्याचा प्रयोग करून पहावा. त्याने जर खेळांचा दर्जा घसरतो आहे असे दिसून आले तर पुन्हा पूर्वीची पद्धत अंमलात आणावी.

विभागीय पातळयांवर प्रथम सामने व नंतर राज्य क्रीडा महोत्सवांवर अशा प्रकारचा बदल होण्याची शक्यता आहे. याचा उल्लेख श्री. रा. गो. साळवी यांनी केला. काही जिल्ह्यांचा मिळून एक विभाग करावा, प्रथम विभागांचे सामने होऊन विजयी विभाग फक्त राज्य क्रीडा महोत्सवासाठी येतील. हा प्रयत्नही चांगला ठरेल असे वाटते. यातच जर चारही शहरांचा एक विभाग केला तर जास्त बरे होईल.

विभागांना ठराविक रंगाचे पोषाख ठरवून द्यावेत. त्यांचा झेंडा ठरविण्याचा अधिकार या जिल्ह्याला द्यावा, म्हणजे निदान त्यात तरी काही नाविन्य पहायला मिळेल. सध्याच्या पद्धतीप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याच्या अधिकाऱ्यालाच त्यांचा झेंडा कोणता ते ओळखू येत नाही.

पुढील वर्षापासून उत्कृष्ट संचलन करणाऱ्या संघाला वेगळी ढाल देण्याची कल्पना आहे तीही स्तुत्य वाटते. त्यामुळे खेळाडूंना उत्तम संचलन, उत्तम पोषाख करायची संधी मिळेल.

३ ते ५ वर्षांनी नियमांची उजळणी करण्याच्या नियमाची तरतूद करावी या विषयाचा पुन्हा एकदा शेवटी उल्लेख करतो.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुण ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलाची
सर्व [illegible]
नीट करायला
नको का?



[illegible] शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा [illegible] श्रेयस्कर नाही का!

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ही परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलण्यासाठी निरोध वापरून तुम्हालाहि हे साध्य करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे संतति-प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध. अनेक पित्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत!

कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांना 3 (सरकारी मदतीने).




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

## निरोध

लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक

केमिस्ट, वाणी, जनरल स्टोअर्स, [illegible] आणि अनेक ठिकाणी [illegible]